
शनिवार । २४ मार्च १९७९
७५ पैसे

# माणूस





सप्रेम नमस्कार।

सोबत पाठविलेली सुनीताच्या पुनर्जन्माची कहाणी सत्यघटना आहे. मी स्वतः तिची माहिती लिहिली आहे. 'दै. तरुण भारत, नागपूर 'मध्ये प्रथम दि. ३०-११-७८ ला ती प्रकाशित झाली. त्यानंतर 'बेलगाम'ला मी स्वतः गेलो होतो व फोटोसुद्धा मीच घेतले. त्याप्रमाणे दि. ३-३-७९ च्या 'दै. तरुण भारत, नागपूर' व दि. १०-३-७९ च्या 'नागपूर टाइम्स 'मध्ये त्याबाबतच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

वृत्तपत्रातील बातमी त्रोटक असते. जरी त्यांनी ह्या बातमीला २ ते २॥ कॉलमची जागा दिली आहे तरी वाचकांना, विशेषतः वैज्ञानिकांना अभ्यासासाठी सविस्तर माहिती मिळावी म्हणून सत्य आधारावर संपूर्णपणे कहाणी लिहिली आहे.

१२ मार्चः पद्माकर शंकर जोशी
वार्ताहर, धामणगाव रेल्वे.

## कहाणी : शांता-सुनिताची

मुखपृष्ठ : २

छायाचित्रे :

१ : डावीकडून : सुनीता व अनीता चांडक

२ : डावीकडून : अनीता, किसनलालजी टावरी, चंद्रभानजी काळमेघ, सुनीता, सौ. जानकीबाई व मदनलाल चांडक

## साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे-अंक त्रेचाळीसावा
२४ मार्च १९७९
मूल्य ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४ ५९


# एक पुनर्जन्मकथा


पद्माकर शंकर जोशी
वार्ताहर, नागपूर टाइम्स व तरुण भारत, नागपूर


यवतमाळ जिल्ह्यात वेणी (कोठा) नावाचे लहानसे खेडे–धामणगाव रेल्वेस्टेशनपासून १६ मैलावर आहे. तेथील लहान व्यापारी व शेतकरी श्री. मदनलाल चांडक व सौ. जानकीदेवी यांना २१ वर्षांच्या दीर्घ संसारानंतर यवतमाळच्या दवाखान्यात, दि. १२–१०–७३ शुक्रवारी सकाळी ९–३० ला अनीता व ९–४५ ला सुनीता अशा दोन जुळ्या मुली झाल्या. यापैकी सुनीता ही मार्च १९७८ पासून म्हणू लागली, ' मी बेलगावची आहे, मला बेलगावला घेऊन चला. ' यासाठी ती रडायची व हट्ट करायची. सुरूवातीला खेड्यातील समजुतीप्रमाणे बाहेरची भूतबाधा असावी म्हणून मंत्रतंत्र–झाडफूक करण्यात आली. मात्र सुनीताचा हट्ट कमी होण्याऐवजी वाढला. इतकेच नव्हे तर पुढे पुढे बेलगावची जास्त माहिती ती देऊ लागली. तेव्हा मदनलालजींना शंका आली की, तिची पुनर्जन्माची स्मृती जागृत होत असावी. तेव्हापासून त्यांनी प्रेमळपणे प्रश्न–प्रतिप्रश्न विचारून सुनीताकडून अधिकाधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला.

दि. २५–११–७८ ला श्री. मदनलालजी कापसाची गाडी घेऊन धामणगावी सुनीता व अनीतासह आले. कापूस विक्री झाल्यावर मुलींना घेऊन ते प्रस्तुत लेखकाचे घरी आले व सुनीताने आपल्या मागील जन्माचा वृत्तान्त सांगितला. मारवाडी घराण्यात जन्म घेतलेली सुनीता सर्व माहिती शुद्ध खेडवळ मराठीतून स्पष्टपणे देत होती.

सुनीता म्हणाली, ' नदीच्या काठावर टेकडीशेजारी तिचे बेलगाव आहे. ती घरची गरीब होती. दूध विकत आणीत असे. घरी कोणतेही गाय-बकरी इत्यादी जनावर नव्हते. गावात शाळा नव्हती म्हणून शिक्षण घेतले नाही. ' ( त्यामुळे ती बेलगाव कोणत्या तालुक्यात वा जिल्ह्यात आहे हे सांगू शकली नाही. ) ती म्हणाली, ' साडी किंवा लुगडे कधीच नेसली नाही. फ्रॉक नेसत असे. ' ( म्हणजे ती लहानपणीच मृत्यू पावली असावी ! ) तिने म्हटले, ' बेलगावात माझी एक बहीण आहे– तिचे नाव सुमित्रा. मला तिचे पाच रुपये देणे आहेत. ' ( तिची आठवण काढून ती रडत असते. ) गावात एकच किराणा दुकान असल्याचे तिने सांगितले. ' घरी वडील व आईला (अनुक्रमे) नानाजी व नानीजी म्हणायचे. '

अशा प्रकारे तिने पुष्कळ गोष्टी सांगितल्या. त्या वर्णनाचे वृत्त दै. तरुण भारत, नागपूरच्या दि. ३०–११–७८ च्या अंकात पहिल्या पानावर प्रसिद्ध झाले. त्यावरून पुण्या-मुंबईकडील वर्तमानपत्रात ही बातमी प्रसिद्ध झाली. ती वाचून श्री. भाऊसाहेब काळे, संशोधक, पुणे, यांनी पत्राने महाराष्ट्रातील ' बेलगाव ' नावाच्या २८ गावांची व वर्णनानुरूप ९ बेलगावची संपूर्ण भूगोलासहित माहिती पाठवली.

त्याचप्रमाणे अनेक वाचकांनी आपापल्या बेलगावची माहिती मदनलालजींना पाठविली.

त्याप्रमाणे 'बेलगावच्या शोधात' सुनीताला घेऊन वडील मदनलालजी– आई जानकीबाई– अनीता या दुसऱ्याही मुलीला घेऊन निघाले. चाळीसगावचे रामदेवबाबांचे भक्त 'बापजी' यांच्या कृपेमुळेच 'अनीता व सुनीता' हा प्रसाद मिळाला म्हणून, त्यांचे दि. २९–१–७९ ला दर्शन घेऊन दोन दिवसांनी हे लहानसे पथक बेलगाव ता. मेहेकर जि. बुलढाणा येथे पोहोचले. सुनीताला पाहण्यासाठी गर्दी झाली. तरीही न गडबडता तिने स्पष्टपणे म्हटले की, 'हे माझे बेलगाव नाही.' सर्वजण घरी वेणी कोठघाला परतले.

थोड्याच दिवसानंतर पुन्हा हे पथक बेलगावसाठी निघाले. दि. २२–२–७९ ला छिंदवाडा जिल्ह्यातील सौंसर तालुक्यातील बेलगावात सुनीताला फिरविले. तेव्हाही हे बेलगाव माझे नाही, असे तिने ठामपणे म्हटले.

दि. २४–२–७९ रोजी वर्धा जिल्ह्यातील सेलूवरून २ कि. मी. अंतरावरील बेलगाव पाहण्यास हा परिवार गेला. तेथेही वकील, पत्रकार, फोटोग्राफर व शेकडो नागरिकांची गर्दी झाली. परंतु 'हे माझे बेलगाव नाही', असे म्हणून सर्वांना तिने निराश केले.

आता मोर्चा चवथ्या बेलगावकडे वळला. वर्धा जिल्ह्यातच कारंजा (घाडगे) वरून ४ मैल अंतरावर नारा गावचे लहानसे खेडे आहे. तेथील सरपंच श्री. ब्रिजमोहनजी टावरी व त्यांचे वडील श्री. किसनलालजी टावरी यांनी श्री. मदनलालजींना शेजारच्या बेलगावची माहिती देऊन आग्रहाने बोलाविले होते. चांडक कुटुंब नाराला पोहोचले व दि. २६–२–७९ रोजी बैलगाडीने जंगलातील बेलगावकडे निघाले.

जुनाट घरांच्या लहानशा नारा खेड्यापासूनच डोंगराळ भाग सुरू होतो. लालसर उंच–निंच पातळीच्या शेतातून जागोजागी पाण्याच्या प्रवाहामुळे नाल्या पडल्या आहेत. लहान-मोठ्या वाटोळ्या दगडांचा सुकाळ आहे. थोडेसे खणल्यावर दगड लागतो. नाराहून ४ कि. मी. वर सावरडोह नावाचे गाव लागते. तेथील नदीचे पात्र खोल असून बारमाही पाणी भरपूर असते. येथून वनश्रीचे सुंदर रूप आता डोळ्यात भरू लागते. पुढे ५ कि. मी. गेल्यावर लहान लहान डोंगरांच्या–टेकड्यांच्या सान्निध्यात, हिरव्या वृक्षांनी वेढलेले निसर्गरम्य खेडे दिसते. १५० घरांची वस्ती असावी. लहानशा टेकडीवरील हे खेडे म्हणजे सुनीताचे बेलगाव! सुनीताने म्हटले होते की, तिच्या बेलगावजवळ सडक नाही. मोटार जात नाही. या डोंगराळ भागात इतक्यात ५–१० वर्षात सडक झाली. पूर्वी नव्हती. आता बस जाते. मात्र वर्षातून ४–५ महिनेच.

बेलगावात शिरताना सुनीता प्रथम गांगरली. तिला गावामधून विरुद्ध बाजूला नेण्यात आले. त्या बाजूला टेकडी होती. जवळच पायथ्याशी लहानशी नदीही वाहात होती. स्वच्छ पाणी झुळझुळ वाहात होते. नदीकाठाने सुनीता पुढे पुढे जात होती. एव्हाना खूप गर्दी झाली. तिच्या मागे सर्वश्री ब्रिजमोहनजी, किसनलालजी, मदनलालजी, आई जानकीबाई, बेलगावचे पोलिसपाटील दिवाकर श्रावणजी सोनारे, सरपंच राघोजी बकाराम धुर्वे, कृष्णरावजी वाघ, पुंडलीकराव सोनारे, शामरावजी खवशी, नारायणराव देशमुख या गावातील प्रतिष्ठित मंडळींबरोबर शेकडो तरुण, म्हातारे, लहान मुले, स्त्रियांची गर्दी झाली होती. सुनीता पुढे पुढे, मागे गर्दी वाढतच गेली आणि...

सुनीताने वडाचे झाड पाहून आनंदाने किंचाळून म्हटले, 'येथे मी खेळत असे. हीच माझ्या गावची नदी.' ती पुढे गेली. तिने एक दगड दाखविला. 'याच दगडावर धुणे धुवायची!' (हा दगड अनेक वर्षांपासून तेथेच आहे!) ती अनीताला म्हणाली, 'येथे पाण्यात गुंजा आहेत.' सुनीताने फूटभर पाण्यात हात घालून रेती वर काढली आणि त्यातील गुंजा वेचून अनीताला दिल्या.

अनीताही गुंजा वेचू लागली. ४–५ मिनिटे हा खेळ चालला. (सुनीताला गुंजांची माहिती कशी मिळाली?) सुनीता पुढे निघाली. वडील मदनलालजींचा तिने हात धरला. मैदानावरील विहीर व हौदाचीही तिला ओळख पटली. ती पुढे पुढे चालली. मागे गर्दीतील मुलांची आरडाओरड, बायांचे किंचाळणे – हसणे व मोठ्या माणसांचे मुलांना रागावणे या गोंगाटामुळे नेहमी शांत असलेल्या बेलगावात आज निराळेच चैतन्य निर्माण झाले होते.

सुनीता पुढे चालत होती. समोर प्राथमिक शाळेची इमारत दिसली. सुनीता क्षणभर घोटाळली व वडिलांना म्हणाली, 'येथे तर किराण्याचे दुकान होते. बोरीचे झाड होते. फुलांचे झाड होते.' जवळ उभे असलेले काही वयस्कर लोक एकमेकांकडे आश्चर्याने पाहू लागले. कारण १९६५ साली शाळा बांधली होती. त्यापूर्वी १० वर्षेपर्यंत त्या ठिकाणी मालगुजारांचा कोठा होता. त्यापूर्वी तेथे किराण्याचे दुकान होते – टापऱ्याचे. ही गोष्ट अंदाजे २५ वर्षांपूर्वीची. परंतु त्या वेळचे अवशेष दाखविणारे कोणतेही जुने चिन्ह अस्तित्वात नव्हते आणि या पाच वर्षांच्या मुलीने सर्व बरोबर सांगितले! तिचे वडील म्हणाले, 'सुनीता टापऱ्याचे किराणा दुकान म्हणायची, आम्हाला वाटले टीनाच्या टप्परचे दुकान– आज अर्थ कळला की, दुकानदाराचे नाव टापरे होते.'

आता सुनीता पुढे काय दाखविते याविषयी गावकऱ्यांतही उत्सुकता वाढली. श्री. मदनलालजी सुनीताला म्हणाले, 'तू सांगत होती ना तुझे घर दाखवशील म्हणून?' आता सुनीताच्या डोळ्यात विशेष प्रकारची चमक निर्माण झाली होती, जोडीला हुरूप वाढला. ती पुढे झाली, टेकडीवरच्या वस्तीकडे झरझर चालू लागली. एका घरासमोर उभी राहिली. आत्मविश्वासपूर्वक आत अंगणात जाऊन उभी राहिली. 'हेच माझे घर' असे म्हणाली. आता काही लोकही खुणाखाणांचे चिन्ह विचारू लागले. तसे सुनीताने म्हटले, 'येथे सामट (गल्ली) होती. तेथे आम्ही लघवीला बसत असू.' तसेच न्हाणीघर, स्वयंपाकघर व बैठकीची जागादेखील तिने बिनचूक दाखविली. आता १५ वर्षांपूर्वीचे कच्चे घर नव्हते. घरमालक चंद्रभान तुकारामजी काळमेघ व भाऊ लक्ष्मण तुकारामजी काळमेघ याची परिस्थिती चांगलीच सुधारल्यामुळे त्यांनी सिमेंट–विटांची बैठक, न्हाणीघर, स्वयंपाकघर बांधले होते व घराचे दृश्य स्वरूप पार बदलून टाकले होते. तरी जुनी परिस्थिती सुनीताने तंतोतंत ओळखली होती. चंद्रभान–लक्ष्मण व त्यांच्या घरची सर्व बाया-मुले तर गांगरून, घाबरून गेली. लेखकाने विचारपूस केली तेव्हा कळले की, चंद्रभानजींची शेषराव वय ३४ व सुमित्रा वय ३० ही दोन मुले हयात

आहेत व अंदाजे २७ वर्षांपूर्वी सुमित्रापेक्षा दोन वर्षांनी मोठी मुलगी शांता वयाचे ५ व्या वर्षी मरण पावली. (म्हणजे सुनीताने अगोदर सांगितल्याप्रमाणे 'सुमित्रा' ह्या कुटुंबात आहे व शांता बालवयात मृत्यू पावली. याचा अर्थ शांता हिने सुनीताचे रूपात पुनर्जन्म घेतला काय?) चंद्रभानजींची आईसुद्धा जीवंत आहे. ती फार दुःखी आहे. प्लेगच्या बिमारीत अंदाजे १९३० च्या आसपास चार दिवसात चार जण गेले. एक दिवशी नवरा, दुसरे दिवशी मुलगी, तिसरे दिवशी मुलगा, चौथ्या दिवशी पुन्हा मुलगी. या मुलीसुद्धा लहानच होत्या!

सुनीताचे वडील तिला म्हणाले, 'आम्हाला चहा प्यायचा आहे. तुझ्या दुधवालीकडून चार आण्याचे दूध आणून दे. तिचे घर दाखव.' आणि तिला दुधासाठी पेला दिला. ती काळमेघच्या घरातून निघाली व शेजारी एका गल्लीत गेली. तिने आता एका घरात प्रवेश केला. तेथील जुन्या अवशेषांपैकी काही पार नामशेष झाले होते तिने हे घर दाखविले ते बयनाबाई पाटलीनचे होते. तिचा दुधाचा धंदा होता. सुनीताने टाके, न्हाणी, म्हशी बांधायची जागा दाखविली. एक फाटक असल्याचे सांगितले. (त्यांच्या खुणासुद्धा उरल्या नव्हत्या.) तेव्हा सर्वांना फारच नवल वाटले. गावातील एक प्रतिष्ठित पुढारी श्री. कृष्णरावजी वाघ हे पुढे आले. त्यांनी सुनीताला विचारले, 'तू कुठे उभे राहून दूध घेत होती?' तेव्हा तिने उत्तर दिले, 'मी फाटकाजवळ उभी राहात असे. कोणीही आत जात नसत.' या उत्तरामुळे तेथील वयस्करांना धक्काच बसला. कै बयनाबाई पाटलीण कुणालाही आत येऊ देत नसे. फाटकातूनच दूध द्यायची! सुनीता पुढे म्हणाली, 'लहानशा पांढऱ्या बुरख्यातून दूध द्यायची!' (अगदी बिनचूक गोष्टी दाखवून तिने बयनाबाईच्या विक्षिप्त स्वभावाचे वर्णनदेखील केले!)

आम्ही सर्व सुनीताबरोबर बाहेर आलो. एका घरासमोर काही बाया बसल्या होत्या. आता लोकांची जिज्ञासा उफाळली होती. एकाने सुनीताला म्हटले, 'हे घर कोणत्या बाईचे आहे सांग बरे!' तिने एका बाईकडे बोट दाखवून म्हटले, 'हिचे!' सुनीताने बरोबर ओळखले होते, तरी पण जवळच बसलेल्या शांताबाईकडे बोट दाखवून त्या गृहस्थाने म्हटले, 'नाही. हे घर तर हिचे आहे.' तेव्हा सुनीताने धावत जाऊन शांताबाईचे घर दाखविले. तेव्हा त्यांनी म्हटले, 'ज्या बाईचे घर आहे तिचा हात धरून सांग.' तेव्हा तिने शांताबाईचा हात धरून तिच्या घरात आणले. हे तिने सर्व बिनचूक कसे ओळखले असावे?

तसेच श्री. पुंडलिकराव तुकारामजी सोनारे यांच्या घरची तुळशीवृंदावनाची जागा, स्वयंपाकघर, बैठकीची जागा इ. तिने ओळखल्या. सुनीताने सांगितले, 'हे माझ्या सोबतीणीचे घर आहे. येथे मी खेळायला यायची!'

आता सुनीतामध्ये जास्तच आत्मविश्वास जागृत झाला. ती आणखी पुढे गेली. श्री. नारायण रामरावजी देशमुख यांच्या 'कोठचाचा' दरवाजा बंद होता. तिने त्या घरातील स्वयंपाकाची व बैठकीची जागा सांगितली. दरवाजा उघडायला लावल्यावर ते सर्व खरे असल्याचे पटले.

ही घटना पाहण्यासाठी ६५० लोकवस्तीच्या बेलगावात गर्दी वाढता वाढता २००० लोकांच्यावर हा अनुभव प्रत्यक्ष पाहणारे एकत्र झाले होते. आजूबाजूचे नारा, सुसुंद्रा, माणिकवाडा, कारंजा (घाडगे), आरंभी, सावंगा, तरोडा, सावरडोह, खापटी, खराळा इत्यादी जवळपासच्या गावातून लोक जमा झाले होते.

सुनीतामध्ये विशेष प्रकारचे आकर्षण आहे. जेथे जाते तेथे गर्दी होते. लहान लहान आजाण मुलेसुद्धा तिच्यावर स्वाभाविक प्रेम करतात. तीसुद्धा समंजसपणाने खेळून त्यांचे मन राखते. आम्ही रात्री नाराला परतलो. थोड्या वेळाने जेवायला बसलो. मदनलालजींच्या समोरच सुनीता व अनीता जमिनीवर बसल्या होत्या. आम्ही पाटावर बसलो होतो. सुनीताला मी चिडवीत होतो, 'तुझे बेलगाव गोठयांचे आहे!' तेव्हा ती मदनलालजींना म्हणाली, 'कसेही असो, मी दाखविले ना माझे बेलगाव तुम्हाला?' आम्ही या घटनांनी भारावून गेलो होतो. इतक्यात श्री. किसनलालजी चांडक यांचा नातू–मनोहरचे (३ वर्षाचा) लक्ष सुनीताकडे गेले. त्याने स्वतःचा पाट उचलून आणला व त्यावर सुनीताने बसावे म्हणून तो आग्रह करू लागला. सुनीता तेथे बसल्यावरच आजोबांजवळ तो गेला. त्याने अनीताला मात्र दुसरा पाट नेऊन दिला नाही.

सुनीता किंवा तिचे आई-वडील कधीही या भागात आले नाहीत. त्यांना या भागाची काहीच माहिती नाही. लहानशी पाच वर्षांची सुनीता अजून शाळेतही गेली नाही, तरी तिने ती सर्व माहिती अगोदर सांगितली व बिनचूक दाखविली हे आश्चर्यमय रहस्य नाही काय? आता तिची दिवसेंदिवस प्रगती होत आहे. इंग्रजी, मराठी, गुजराथी अक्षर ती केवळ एकदा पाहते व लिहून दाखविते!

या शक्तीमागे काय रहस्य आहे हे वैज्ञानिकांनी शोधून काढणे आवश्यक आहे. या विषयातील विद्वानांनी समोर येऊन ह्या सुनीताचे पुनर्जन्माबाबत संशोधन करून निश्चित मत प्रस्थापित केले तर लेखकाच्या मेहनतीचे व चांडक परिवाराच्या खर्चाचे सार्थक होईल.

मुंबई–वार्ता

विनया खडपेकर

## □ ‘मुंबई नगर–संशोधन’ चर्चासत्र

राष्ट्रपुरुषांची चरित्रे वाचणे जसे रोमांचकारी तसेच राष्ट्रातील महानगरींचा इतिहास वाचणेही रोमांचकारी. थोरा-मोठ्यांच्या चरित्रांचा अर्थ लावण्यात जसे अनेक अभ्यासक गुंतून जातात तसेच महानगरींच्या इतिहासाचा वेध घेण्यात अनेक अभ्यासक गुंतून पडतात. मुंबई ही भारतातील अशीच एक महानगरी. बहुरंगी. बहुढंगी. क्षणाक्षणाला भरमसाठ वेगाने वाढत जाणारी मुंबई. अति श्रीमंतांची, अति गरीबांची. विद्वानांची तशीच निरक्षरांची मुंबई. कलावंतांची आणि व्यापाऱ्यांची मुंबई. अष्टौप्रहर पर्वतप्राय लाटांनी वेढलेली, तरी पाण्याचा तुटवडा असलेली मुंबई. अठरापगड जातीच्या लोकांना एकत्र आणणारी; पण त्यांच्यात अदृश्य भिंती उभ्या करणारी मुंबई. सगळ्या प्रांतीयांना स्वतःची आणि परकी वाटणारी मुंबई. इतरांना ‘स्वप्नभूमी’ आणि मुंबईकरांना निर्जीव यांत्रिक नगरी वाटणारी मुंबई. मुंबई! मुंबई! मुंबई! तिचा भूतकाळ मनोरंजक! तिचा वर्तमानकाळ चिंतेचा! तिचा भविष्यकाळ कुतूहलाचा!

अशा या मुंबईच्या विविध अंगांवर प्रकाश टाकणारा एक कार्यक्रम दि. १० आणि ११ मार्च रोजी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळातर्फे सादर करण्यात आला. हा कार्यक्रम म्हणजे ‘मुंबई नगरसंशोधन चर्चासत्र.’ दि. १० मार्च या दिवशी सायंकाळी चार वाजता कार्यक्रमाचे उद्घाटन आणि दि. ११ मार्च रोजी सकाळी ११ ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत प्रबंधवाचने अशी कार्यक्रमाची आखणी होती.

दि. १० मार्च रोजी दुपारी बरोबर सव्वाचार वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष डॉ. पु. म. जोशी होते. श्री. पी. टी. बोराळे यांनी अध्यक्षपद भूषविले होते. समारंभाचे उद्घाटन श्री. स. का. पाटील यांनी केले. सुरुवातीला स्वागतगीत झाले. त्यानंतर आपल्या स्वागतपर भाषणात डॉ. पु. म. जोशी यांनी, नायगाव क्रॉसरोडवरील ग्रंथसंग्रहालयाची जागा या कार्यक्रमाला ऐतिहासिकदृष्ट्या कशा प्रकारे उचित आहे ते सांगितले आणि मुंबई कोणा एका प्रांतीयाची नाही, तर सगळ्यांची आहे, असेही नमूद केले. श्री. स. का. पाटील नसते तर ही वास्तु दिसली नसती, अशा शब्दात डॉ. जोशींनी श्री. पाटील यांचे ऋण व्यक्त केले. श्री. पी. टी. बोराळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. स. का. पाटील यांचा ‘मुंबईचा महामुनी’ असा गौरव केला. श्री. स. का. पाटील बोलायला उभे राहिले तेव्हा प्रथम त्यांनी नम्रपणे सांगितले की, ‘माझ्यामुळे ग्रंथसंग्रहालयाला जागा मिळाली असे नाही. परमेश्वर कुणाला तरी कारणीभूत करतो. मी मेयर होतो. शक्य होते म्हणून मी ग्रंथसंग्रहालयाला जागा दिली. खरे म्हणजे आपणा सर्वांच्या प्रयत्नाने ही वास्तु निर्माण झाली.’ नंतर त्यांनी एकंदर दोनशे संस्थांना जागा आणि कित्येक संस्थांना सरकारी अनुदाने मिळवून दिल्याचे आपल्या भाषणात सांगितले. आपल्या भाषणात श्री. पाटील यांनी असेही सांगितले की, ‘मी खूप जिमखान्यांसाठी जागा दिल्या तर लोक म्हणायचे तुम्ही गुंड निर्माण करण्यासाठीच व्यायामशाळा काढल्या. आता याला काय करणार?’ स्वतःचा आणि मुंबईचा संबंध सांगून झाल्यावर मुंबईला घडविण्यात पार्शी लोकांचा केवढा वाटा, ताजमहाल हॉटेलमध्ये होडीने कसे जाता येत होते, महात्मा गांधी म्हणत, Bombay is a miniature of India वगैरे मनोरंजक गोष्टी सांगून श्री. पाटील यांनी आपले भाषण संपविले. यानंतर एका अनामिकाने श्री. पी. टी. बोराळे यांची माहिती वाचून दाखविली आणि मुंबई शहराचा इतिहास सोपा नाही, पाटीलसाहेब आणि मुंबई हाच एक संशोधनाचा विषय असल्याचे अतिशय भक्तिभावाने सांगितले. माजी मेयर सालेभाई अब्दुल कादर यांनी ‘बंबई इतना कॉस्मापॉलीटन शहर दुनियामे नही मिलेगा,’ असे ठासून सांगितले. टाटा इन्स्टिट्यूटचे प्रा. व्ही. जी. कर्णिक यांनी मुंबईच्या औद्योगीकरणाची सुरवात, ट्रेड युनिअन वगैरेची माहिती दिली. शेवटी आभारप्रदर्शन होऊन कार्यक्रम संपला.

दुसरा दिवस प्रबंध वाचनाचा होता. प्रबंध वाचनासाठी एकंदर पन्नास जणांना विनंती केल्याचे समजले. त्यापैकी तेवीस जणांची नावे आली होती. नावे आलेल्यांपैकी पंधरा जण वाचनास उपस्थित होते.

डॉ. अप्पासाहेब इनामदार (विषय ‘मुंबईतील तमाशा’), डॉ. एम्. डी. देवीड (Importance of Geography on the History of Economic Grouth of Bobmay), श्री. भा. द्वा. कारखानीस (चांद्रसेनीय कायस्थ प्रभू व मुंबई), श्री. त्रिंबक घरत (मुंबईचे आद्य नागरिक), श्री. एस्. जी. मोढे (मुंबई परिसरातील प्राचीन कोरीव लेख), श्री. द. वि. ताम्हनकर (मुंबई बंदर इतिहास, विकास व व्यवस्थापक), श्री. वि. स. कामत (मुंबईचे गव्हर्नर्स), श्रीमती रेचेल गडकर (मुंबईतील इस्रायल लोकांची वसाहत), डॉ. श्री. दि. परचुरे (Water Drinking Fountains of Bombay), सौ. प्रिया आठवले (मुंबईचे पार्शी लोक), डॉ. शरावती शिरगावकर (मुंबईतील प्रॉटेस्टंट ख्रिस्ती मिशनरी, १८०७ ते १८५८), श्री. पी. डी. परांजपे (मुंबईतील ट्रामगाड्या), डॉ. रवींद्र रामदास (लोकमान्य टिळकांच्या उच्च लष्करी शिक्षणासंबंधी मुंबईतील रशियन प्रतिनिधींबरोबरील वाटाघाटी) यांनी प्रबंधवाचन केले.

मुंबईचा आणि तमाशाचा खूप जुना संबंध आहे. ७ मे १८९८च्या मुंबईच्या तमाशाच्या छापील जाहिराती उपलब्ध आहेत. मुंबईत पूर्वी सुमारे पंचवीस तमाशा फड होते. कुलाब्याची दांडी, कुर्ला, क्रॉफर्ड मार्केट या भागात तमाशे होत. मुंबईत सुमारे दोन-अडीच हजार माणसे तमाशावर जगत... मुंबईचे आद्य नागरिक पाठारे, क्षत्रिय, कोळी आहेत. मुंबईत अनेक कोरीव शिलालेख आहेत. काही ठिकाणी आज ते मूळ जागेपासून इतरत्र हलवले आहेत. १८७५ मध्ये ससून डॉक ही गोदी बांधली गेली. इ. स. १७४६ साली ज्यू लोक मुंबईत प्रथम आले. इ. स. १७९६ मधे मुंबईतील खडक विभागात ज्यूंचे प्रार्थना मंदिर उभे राहिले. मुंबईत गव्हर्नर केव्हा केव्हा आणि

कोण होऊन गेले, पार्शी लोकांनी मुंबई–माहिम जोडणारा पूल बांधला, गुरांसाठी दवाखाना सुरू केला, मिशनऱ्यांनी मुंबईला रविवारची सुटी मिळवून दिली, आद्य मुद्रक निर्णयसागरवाले यांनी मुंबईत मिशनऱ्यांकडून मुद्रणकलेचे पहिले धडे घेतले, मुंबईतल्या ट्रामगाड्यांना पूर्वी म्हणजे १८७४ मध्ये घोडे होते, अशा प्रकारची बरीच मनोरंजक माहिती या प्रबंधवाचनातून मिळाली. श्री. पु. ना. ओक यांनी 'त्रिबकेश-टर्मिनस' अशी व्हिक्टोरिया टर्मिनसची उपपत्ती सांगितली.

पण याचबरोबर मुंबईची इराणी हॉटेले, उडुपी हॉटेले, मुंबईच्या लोकलगाड्या, मुंबईचे अरब ही आधुनिक वैशिष्ट्ये प्रबंधवाचनात आली असती तर बरे झाले असते.

या महत्त्वपूर्ण, सुंदर कार्यक्रमाचे संयोजन मात्र नीट नव्हते. कार्यक्रमात एक विस्कळीतपणा होता. प्रत्येकाला वाचनाला पंधरा मिनिटे दिली होती. प्रबंध–विषयांची व्याप्ती लक्षात घेता ती फार कमी वाटत होती. शिवाय वेळेची ही मर्यादा काटेकोरपणे पाळली गेली नाही. सुरुवातीच्या प्रबंधवाचकांनी अर्धा–पाऊण तासही घेतला. नंतरच्या वाचकांना त्यामुळे फार कमी वेळ मिळाला. श्री. पी. डी. परांजपे यांचे भाषण मनोरंजक आणि अभ्यसनीय असूनही श्रोत्यांना त्याचा पूर्ण लाभ होऊ शकला नाही. डॉ. रवींद्र रामदास यांचा विषय चर्चासत्रात का समाविष्ट केला ते समजू शकत नाही. 'मुंबई नगर संशोधन' म्हणजे मुंबईच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीचे चित्र. ते समजून घ्यायला डॉ. रवींद्र यांची कोणती मदत झाली? श्री. कारखानीस यांना अजिबात ऐकू येत नव्हते. दृष्टी क्षीण असल्यामुळे वाचनाला त्रास होत होता. त्यांना शेवटी सभेच्या चिटणिसांनी वाचन थांबविणे भाग पाडले. त्यांची अडचण लक्षात घेऊन अपवाद म्हणून त्यांचा प्रबंध दुसऱ्या कोणास वाचण्यास सांगण्याचे आधीच योजायला हवे होते. ते विषयाशी संबंधित नसलेली बरीच माहिती वाचीत होते. डॉ. पु. म. जोशी त्यांना त्यासंबंधी दटावीत होते. 'मुंबईचे आद्य नागरिक' वाचन करणाऱ्या श्री. घरत यांनाही डॉ. पु. म. जोशी 'अहो, हा मुद्दा पुरे, पुढे वाचा,' असे दटावणीच्या सुरात सांगत होते. 'रामदेवराव राजपुतान्यातून आला नाही. काय सांगतात तुमचे नाईक?' असे बोलून त्यांनी घरत यांच्या वाचनात एकदा–दोनदा अडथळाही आणला. प्रबंधातील वक्तव्ये चुकीचो असतील, डॉ. जोशी यांचा अधिकार मोठा असेल; पण प्रतिवाद करण्याची ही सभेतील रीत नव्हे. प्रबंधवाचनानंतर प्रश्नोत्तरांना अवधी दिला होता. डॉ. जोशी यांनी तेव्हा आपली मते मांडणे उचित नव्हते काय? चेअरमनने सभेचे नियंत्रण जरूर करावे; पण अशी दंडेली करू नये. समाजातले विद्वानच असे करू लागले तर सामान्य जनांनी आदर्श कोणता ठेवायचा? ◻

## ◻ वकील आणि पोलीस

दि. १६ मार्च १९७९ या दिवशी रेशमभवनमधील टी सेन्टरच्या सभागृहात 'All India Guild of Law Graduates' (Students' Committee) तर्फे 'वकील आणि पोलीस' (Lawyers and Police) या विषयावर मुंबईचे पोलीस कमिशनर श्री. म. शा. कसबेकर यांचे व्याख्यान झाले. श्री. एम. पी. वाशी हे या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.

श्री. कसबेकर यांचे भाषण न्यायसंस्था आणि पोलीस यांचा मूलभूत विचार करणारे वाटले. 'न्याय मिळवून द्यावा म्हणून पोलीस हरप्रकारे सत्याचा शोध घेतात, तर वकील कोणावरही अन्याय होऊ नये असे पाहतात. या दोघांची कामे एकमेकांना पूरक आहेत,' असे श्री. कसबेकर म्हणाले. समाजाच्या सुरक्षेची आणि सुव्यवस्थेची काळजी दोन्ही खात्यांना असली तरी सर्वसामान्य लोकांना कोर्ट आणि पोलीस यांचा संबंध एकंदर नकोसा वाटतो. याचे कारण त्या यंत्रणा सदोष आहेत. गुन्हेगारांच्या पुनर्वसनाकडे पोलिसखात्याचे लक्ष असते. त्यामुळे गुन्हेगारांकडून ज्यांचे नुकसान होते त्या व्यक्तींकडे पुष्कळदा लक्ष पुरविले जात नाही. यासाठी गुन्हेगारांकडून ज्यांना त्रास होतो त्यांच्या बाजूने अधिक विचार करण्याचे आवाहन श्री. कसबेकर यांनी कायद्याच्या विद्यार्थ्यांना केले. श्री. कसबेकर यांनी गुन्हेगारांच्या पुनर्वसनाचे एक-दोन मनोरंजक अनुभव सांगितले. खुनाच्या गुन्ह्याला ट्रान्सपोर्टेशनची शिक्षा अमेरिकेत एकशेवीस वर्षे आहे, तर आपल्याकडे ती केवळ एकवीस वर्षे आहे, असेही श्री. कसबेकर यांनी सांगितले.

श्रोत्यांमध्ये प्रामुख्याने कायद्याचा अभ्यास करणारे विद्यार्थी होते. गुन्हेगारी का होते, ती एक प्रवृत्ती आहे की विशिष्ट परिस्थितीचा परिणाम आहे, दारिद्र्य गुन्हेगारीला कितपत कारण होऊ शकते, अशा प्रकारचे प्रश्न विचारले गेले. त्यांची श्री. कसबेकर यांनी समर्पक उत्तरेही दिली.

कार्यक्रमाच्या संयोजनात विद्यार्थ्यांचाच भाग दिसत होता. सर्व व्यवस्था चोख होती. कार्यक्रम ठीक वेळेवर सुरू झाला. मनोरंजक आणि विचारांना चालना देणारा हा कार्यक्रम कंटाळा येऊ न देता संपला. ◻

## ◻ एक चित्रप्रदर्शन

श्रीमती नैरा अहमदुल्ला या स्त्री-कलावंताच्या चित्रांचे प्रदर्शन ताज आर्ट गॅलरीमध्ये दि. १३ मार्च १९७९ ते १४ मार्च १९७९ पर्यंत झाले.

प्रदर्शनात एकंदर वीस चित्रे होती. एक-दोन अपवाद वगळता सर्व चित्रे काळ्या-पांढऱ्या रंगात होती. ती चित्रे पूर्णपणे रिॲलिस्टिक नव्हती किंवा पूर्णपणे अॅबस्ट्रॅक्टही नव्हती. या दोन्हींचा संगम श्रीमती नैरा यांच्या चित्रांत झाला होता. निसर्गातील पशु-पक्ष्यांवरूनही त्यांनी काही डिझाइन्स निर्माण केली होती.

श्रीमती नैरा यांना निसर्गाच्या क्रीडेत रस आहे. मात्र निसर्ग आहे तसा चितारणे त्यांना आवडत नाही. निसर्गातून निरनिराळ्या आकृती निर्माण करणे त्यांना अधिक मानवते. या चित्रप्रदर्शनात तीन सिरेग्राफ्सही होते.

श्रीमती नैरा यांचे हे तिसरे वैयक्तिक (solo) चित्रप्रदर्शन आहे. त्यांचे पहिले अॅबस्ट्रॅक्ट चित्रांचे व्यक्तिगत प्रदर्शनही ताज आर्ट गॅलरीमध्ये १९७५ मध्ये भरले होते. जहांगीर आर्ट गॅलरीमधील सामुहिक चित्रप्रदर्शनात त्यांची चित्रे होती. लखनौ, हाँगकाँग येथील चित्रप्रदर्शनांतही त्यांची चित्रे लागली आहेत. श्रीमती नैरा १९६४ साली जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून पेंटिंगची जी. डी. आर्ट ही पदविका घेऊन बाहेर पडल्या आणि एव्हाना त्यांनी स्वतःचं असं एक वैशिष्टचपूर्ण स्थान या कला जगतात निर्माण केलं आहे. ◻

[ गेल्या अंकातील 'रंगभूमी' या सदरात 'गर्दीत गर्दीतला' आणि 'रेग्यांच्या दोन नाटिका' हे रसग्रहणात्मक लेखन कु. विनया खडपेकर यांनी केले होते. अनवधानाने त्यांचे नाव छापायचे राहून गेले होते. त्याबद्दल दिलगीर आहोत. —संपादक ]

संध्याकाळचे पुणे । दि. बा. मोकाशी

# म्हातारपण कसे घालवावे ?

वीस-पंचवीस वर्षे वयाच्या तरुण-तरुणींनी 'वृद्धसभा' या शीर्षकाकडे दुर्लक्ष करून हा लेख आधी वाचावा. कारण चाळीस वर्षांनंतर ही तरुण-तरुणी साठीला येतील. साठीला आल्यानंतर आपण कसे दिसू, काय करू, कोठे असू वगैरे त्यांना या लेखावरून कळेल. बहुधा मी आता जसा गोखले चौक, लक्ष्मी रोड, ५६१ सदाशिव, शेंडेशास्त्री यांचा वाडा, पुणे, येथे वाड्याच्या चौकात खाली हंथरलेल्या जाजमावर, वृद्धसभेमध्ये बसलेलो आहे, अशी ती बसलेली असतील.

चौकातील जाजमावर आम्ही तीस-चाळीस वृद्ध दाटीवाटीनं बसलो आहोत. माझ्या भोवती, मागे-पुढे, डाव्या हातास, उजव्या हातास वृद्ध आहेत. हा देखावा सुंदर आहे. त्याची खूण अशी– 'एकदा नारदाने देवांच्या सभेत विचारले, 'पृथ्वीतलावर सर्वांत सुंदर देखावा कोणता ?' तेव्हा लक्ष्मी म्हणाली, 'पोपटांचा थवा', पार्वती म्हणाली 'हिमालयावरचा हिमवर्षाव', उर्वशी म्हणाली, 'खळखळ वाहणाऱ्या नदीच्या काठावर तप करीत असलेला ऋषी.' नारदाने सर्वांना, नाही, नाही म्हणून मान हलवून गालात हसून म्हटले, 'देवहो ! पृथ्वीतलावावरील सर्वांत सुंदर देखावा 'वृद्धसभा' होय. कारण या वृद्धसभेत तुम्ही सांगितलेली तीनही सौंदर्ये एकत्र आढळतात. या वृद्धांमध्ये पोपटांच्या हिरव्या रंगाचा उत्साह आहे. त्यांच्या डोकीचे व दाढीचे विविध छटांचे पांढरे केस हिमवर्षावासारखे सुंदर आहेत आणि त्यांच्या मुद्रांवरील अनुभवाचे तेज ऋषीतुल्य आहे. देवहो ! तुम्ही अमृत सेवन करीत असल्याने तुम्हास म्हातारपण येणार नाही. तुम्ही म्हातारपणच्या या सौंदर्याला मुकले आहात.'

□

शेंडेशास्त्री यांचा वाडा भोवतालच्या नव्या उंच इमारतींनी गुदमरवून टाकला आहे. बंद दिंडी दरवाजातूनही बाहेरच्या लक्ष्मी रोडवरची रहदारी ऐकू येते. अंगण पंधरा हात चौरस असावे. अंगणांतून घरात शिरण्यापूर्वी एक वीत-दीडवीत उंचीचा लहान कट्टा आहे. त्या कट्ट्यावर डाव्या हातास स्त्री-वर्ग बसतो. उजव्या हातास कूस आहे. त्याखाली कुंड्या आहेत. डाव्या हातास माडीवर जाण्यास जिना आहे जास्त श्रोते आले की जिन्याच्या पायरीवरही बसतात.

अंगण्यात कट्ट्याच्या जरा पुढे यजमान (शेंडेशास्त्री) बसतात. पाठ ताठ ठेवून हसत खेळत ते सभा चालवितात. बेताचे उंच, नजरेत तीक्ष्ण, नाक टोकाला किंचित बाकदार, कृष्णवर्ण असे त्यांचे वर्णन करता येईल. पंचाहत्तर वयोमान असावे. प्रकृती चांगली वाटते. वैद्यकी व विद्वत्ता या दोहोंतही त्यांचे नाव आहे. म्हाताऱ्यांची सभा चालवणं इतकं सोपं काम नाही. अनुभवांमुळे म्हातारी माणसं चाणाक्ष झालेली असतात. त्यातून अशा सभांत नाना तऱ्हेचे वृद्ध येतात. कुणी वकील, कुणी डॉक्टर, कुणी इंजिनिअर, कुणी ऑफिसर, कुणी दुकानदार, कुणी कारखानदार, कुणी परदेशांत राहून आलेले. अशा जगात कर्तबगारी दाखविलेल्यांना तासभर व्यवस्थित सांभाळून नेणे वाटते तेवढे सोपे नसते. सभेला असे तीस-चाळीस लोक असतात. शास्त्रीबोवांनी एकदा सांगितले की, दर सोमवारी चारला सभा सुरू होऊन बरोबर पाचला संपते. विषय अर्धा राहिला तर पुढच्या सोमवारी हाच विषय. तेव्हाही संपला नाही तर त्यापुढच्या सोमवारी. येथे कुणाला घाई नाही. विषयातून विषय निघतात, गंमत येते. कुणी तरी शास्त्रीबोवांना म्हटले, 'वर्तमानपत्रांत 'स्थानिक' मध्ये आजच्या सभेला माझे नाव अध्यक्ष म्हणून का टाकले ?' शास्त्रीबोवा हसून म्हणाले, 'वर्तमानपत्राला कळवले तेव्हा कुणाचेच नाव टाकले नव्हते; पण ते म्हणाले, 'सभेला अध्यक्ष हवा, वक्ता हवा. अध्यक्ष असल्याशिवाय सभा कार्यक्रमात घालता येत नाही.' मी म्हटले, 'ठीक आहे. म्हणून तुमचे नाव डोक्यात आले ते घातले. कुणाचे तरी घालावयाचे.'

माझ्या मनात आले, एखाद्या नातवाने ही सभा पाहिली तर एवढे आजोबा एकत्र पाहून त्याला गंमत वाटेल. आश्चर्य हे की, मलाही हे सर्व आजोबा दिसत होते. लहानपणी अशा पांढऱ्या केसांना व सुरकुतलेल्या कातडीला मी आजोबा म्हणत नव्हतो का ? माझ्यासमोर आरसा नसल्याने माझे वय मला कळत नव्हते.

□

आजच्या वृद्धसभेचा विषय होता 'म्हातारपण सुखाने कसे घालवायचे ?' शिक्षणशास्त्र संस्थेच्या सभागृहात वृद्धांच्या शतायुषी या संस्थेतर्फे दि. २८ व २९ जानेवारीस झालेल्या परिसंवादाचा वृत्तान्त वाचून सभेला आरंभ झाला. त्यानंतर चर्चेला सुरुवात झाली. सभा मोकळेपणाने बोलू लागली. कुणी उभं राहून, कुणी बसून, कुणी मध्येच प्रश्न विचारी आणि कुणी तिसराच उत्तर देई. सर्व एकमेकांचे ऐकून घेत बोलत होते. तरीही कोण केव्हा काय म्हणालं, कुणी उत्तर दिलं आणि काय उत्तर दिलं हे सारं टिपणं कठीण होतं.

म्हातारपण सुखाने घालविण्यास तीन गोष्टींची आवश्यकता सांगण्यात आली. १) शरिरस्वास्थ २) योग्य वातावरण ३) मनःशान्ति. ज्यांना म्हातारे हे हट्टी, एककल्ली वाटतात त्यांनी येथे प्रगट झालेले सर्व थरांवरचे विचार ऐकायला हवे होते. वरील त्रिसूत्रीवर अनेकांनी विचार प्रगट केले. ते संपूर्ण सांगणे शक्य नाही. त्यातील काही निवडक वाक्यांवरून चर्चेचा बोध होईलच, पण चर्चेवरून बोधही घेता येईल. त्यातील निवडक वाक्ये देतो,

जो जास्त दिवस जगतो तो चतुर–वृद्धता सापेक्ष आहे–वृद्धांनी शीर्षासन करू नये, पन्नाशीपुढे तर नकोच–(एक ऐंशी वर्षांचा वृद्ध शिर्षासन करतो त्याचे काय ?)–नियमाला अपवाद असतोच–विनोद सोडू नये–लोक ग्राईंडरसारखे दात घासतात – उभे घासावेत–एरंडेलाने मर्दन सर्वांत उत्तम–मुले, सुना कशा आहेत असे विचारले तर एकाच शब्दात उत्तर द्यावे, 'कालमानाप्रमाणे–' मुले व सुना यांच्याबद्दल बाहेर तक्रार करू नये. बाहेर बोललेले चोवीस तासांत आत घरात कळते–आपण स्वयंपाक घरात जाऊ

नये—रस्त्याने जाताना विड्या—सिगारेटी फुकत जाऊ नये—विड्या-सिगारेटच ओढू नये—आपण मुलांना अनेक उपदेश करित असतो. आपला उपदेश आपण असे वागल्यावर त्यांनी का ऐकावा? बायकांना बिचाऱ्यांना आपण किती त्रास देतो? सिगारेट ओढणाऱ्याचं तोंड मोरी असते. पुरुषानं म्हातारपणी बायकोला त्रास देऊ नये, छंद लावून घ्या, वृत्ति धार्मिक असावी. चालण्याचा व्यायाम उत्तम, मात्र सायकलींना संभाळावे. मोरीत, कुणाचे न ऐकता, खडबडीत फरशी घालावी. मोरीच्या फॅशनेबल फरशांनी जेवढे म्हातारे जायबंदी केले तेवढे कशाने झालेले नाहीत. अपमान सहन करावे, त्याने शक्ती वाढते. स्वमूत्र प्राशनाला शिवांबु का म्हणतात? गोड नाव बरं वाटतं काही औषधींचे वर्णन अतिरेकाने केले जाते, उदाहरणार्थ हिरडा. हिरडा मुठीत धरला तरी परसाकडे साफ होते. पूजा-अर्चा यांची पूर्वी पासून सवय हवी. म्हातारपण आल्यावर देव-देव करू जाल तर त्यात मन रमणार नाही.

वृद्धसभेत काय चर्चा चालतात त्याची ही झलक. विनोदी बोलणं हे महाकठिण असतं. या पंचवीस-तीसांच्या वृद्धसभेत दोघे छान विनोद करीत होते. एक शेंडेशास्त्री व दुसरे डॉ. होनप. दोन पिढ्यांत वाद होण्याचे कारण आपण म्हातारेच कसे असतो, हे सांगताना ते म्हणाले; माझ्या मुलाला तो मोटार चालवू लागल्यावर मी ओरडू लागलो. पण मीही अशीच वडिलांना नकळत मोटार चालवीत होतो. तेव्हा मी वाघ होतो. मग मुलगा का वाघ नाही? असा विचार न करिता आपण मुलांवर तणतणतो.

□

पुराणात वृद्ध पित्यानं मुलाजवळ तारुण्य मागितल्याची गोष्ट आहे. मुलाजवळ तारुण्य मागणं हाही एक वृद्धपण सुखात घालविण्याचा उपाय आहे. त्याचा विचार वृद्ध सभेत व्हावा असे मला वाटते. आपले तारुण्य वडिलांना देणारे मुलगे आज निघतील का हा प्रश्न आहे. पण समजा, मुलाने वडिलांना तारुण्य दिले तर पुराणकालातील बापाप्रमाणे ते मुलाला परत करून वनात जाणारे तरी आज निघतील का, हा त्याहून मोठा प्रश्न आहे. बहुधा आजचे म्हातारे मुलाला कायमचा वनात धाडतील. वृद्धांचा अतिउत्साह पुढच्या पिढीला त्रासदायक होतो. संसारातून निवृत्त व्हावे असा उपाय आपल्या पूर्वजांनी काढला. आणि तो तेव्हाही कृष्ण, भीष्म-द्रोणादी मंडळींनी मानला नाही. आजच्या राजकीय पुढाऱ्यांसारखेच ते सेनापतीपदावर बसले आणि भारतीय युद्धातला संहार ओढवला. (या तिघांची वये शंभरीजवळ होती असे म्हणतात.)

दुसऱ्यांचे जीवन करूण करणारे थोडे वृद्ध सोडले तर बहुतेक सर्व वृद्धांच्या स्वतःच्या कथा करूण असतात. विशेषतः इंग्लंड, युरोप, अमेरिका अशा प्रगत देशांतील वृद्धांच्या कथा फारच करुण. आमच्या एका मित्राने इंग्लडधील वृद्धांची स्थिती सांगितली. संध्याकाळी इंग्लंडमधील रस्ते मोकळे असतात, सर्वजण घरोघरी टी. व्ही. पुढे असताना, म्हातारे लोक मात्र बागांतून बाकावर एकेकटे बसलेले असतात. त्यांचे जीवन भयाण एकाकी असते. आठवड्यातून एकदा मुले भेटायला येतात. वृद्धापकालातील सुखाला प्रगत देश मारक दिसतात. त्या उलट अप्रगत देशांत वृद्धांची देखभाल खूपच असते. त्यांना मानही असतो. वृद्धांनी अप्रगत देशांत जन्म घ्यावा हे चांगले प्रगत देशांत वृद्धांची गरजच उरत नसावी. वृद्ध लोक त्यांच्या अनुभवासाठी हवे असतात. त्यांचे अनुभव टेपरेकॉर्डर्स, फिल्मस् आणि कम्प्युटर्समधे ग्रथित केले गेल्यावर वृद्धाचा उपयोगच रहात नाही. याचा अर्थ असा होतो की ज्यांनी तरुणपणी शास्त्र व उद्योग यांची वाढ करून यंत्रयुग आणण्यास हातभार लावला, त्यांचे ते यंत्रयुगच त्यांच्यावर उलटले.

खरं म्हणजे म्हाताऱ्यांकडे सर्वांनी लक्ष द्यावयास हवे. भविष्यकालात म्हातारपण टाळण्यास आजचे म्हातारे प्रयोगासाठी उपयोगी आहेत. कोणत्या सवयींनी म्हातारपण येतं म्हणजे काय होतं, कोणत्या सवयी म्हातारपण लौकर ओढवून आणतात, हे आजच्या म्हाताऱ्यांवरूनच आजच्या तरुणांना कळणार आहे, हे लक्षांत ठेवावे. रशियांतील काही प्रदेशात दीड दोनशे वर्षे जगणारी माणसं आहेत. त्यांच्या दीर्घायुष्याचे रहस्य बरेंचसे कळले आहे. माणसाने यंत्र युगातून मागे सरकले पाहिजे. हा निष्कर्ष आहे. डोंगर चढणे, शुद्ध हवा, भरपूर कष्ट, साधी रहाणी, भात-भाकरीची साधी खाणी, निर्व्यसनता या गोष्टी दीर्घायुष्यास कारण आहेत.

उर्वरित दिवस सुखाने जावे यासाठी वृद्ध होणारे शरीर निरोगी ठेवता ठेवता एक वेळ अशी येईल की त्यातूनच दीर्घायुष्य लाभेल. मुद्दा एवढाच की दीर्घायुष्याचे काय करावयाचे? अश्वत्थाम्यासारखे रानोमाळ हिंडावयाचे असेल तर चिरंजीव होणे हाही शापच ठरेल.

ही सगळी धडपड मृत्यूला दूर ठेवण्यासाठी. आपण मृत्यूला भीत असतो, हे सत्य आहे, तरी तो येतोच. म्हणूनच जे मरणाला सामोरे जातात ते शहाणे ठरतात. ज्ञानेश्वरांनी विशीत असतानाच समाधी का घ्यावी? रामाने शरयूत का प्रवेश करावा? याचा विचार वृद्धांनी करावा. आयुष्याला काही हेतु ठेवला की मृत्यू सोपा होतो किंवा आपण जन्म घेतला तेव्हा भय वाटले नाही तर मृत्यूचे तरी माणसाला भय का वाटावे? हा विचार तसाच पुनर्जन्माचा विचारही मनात बाळगण्याजोगा आहे.

जन्म-मृत्यूचे कोडे सुटेपर्यंत काही तरी विचार लढवले पाहिजेत. असे असंख्य विचार झाले आहेत. त्यापैकी खरा कोणता, हे पुढे केव्हा तरी कळले तर माणसाने मागे केलेल्या या कल्पना आठवून गंमत वाटेल. शेंडेशास्त्री यांच्या वृद्धसभेला मी दोन—तीन वेळाच गेलो. तेवढ्या वेळात लक्षात आले की, तेथे अध्यात्माचा विचार कमीच होता. वृद्धपणी जर सुख हवे असेल तर कमीत कमी स्थितप्रज्ञ नजरेने जगाकडे पहाण्याचे धडे गिरविले पाहिजेत, असे मला वाटते. योग, साधना, अध्यात्मचिंतन हे केले तर उत्तमच, अर्थात मी कसलाच आग्रह धरीत नाही. शेवटच्या क्षणापर्यंत उद्योग करीत रहायचं कुणी ठरवलं किंवा आणखी एखादा चौथा मार्ग कुणी काढला तरी बिघडलं नाही. जसे माझ्या परिचयातील एका मिस्त्रींनी आपल्या मित्रमंडळींच्या सहकार्याने शहराच्या गर्दीपासून दोन दिवस शांततेत, भजन-पूजनात घालता यावे म्हणून पुण्यापासून दूर एक देऊळ बांधून त्यात खोल्या बांधायची योजना केली होती. वृद्धांनी जर तशी काही योजना करून अधूनमधून दोन दिवस दूर राहण्याचे ठरविले तर त्यातून सुद्धा खूप आनंद मिळेल.

□

# काँग्रेस

## मुख्य लढा कोणाविरुद्ध ?

वा. दा. रानडे

काँग्रेस-ऐक्याच्या वाटाघाटी थांबविण्याचा निर्णय काँग्रेस कार्यकारिणीने घेतला; पण त्यानंतरही ऐक्यासाठी आपण पुन्हा प्रयत्न करणार असल्याचे इंदिरा काँग्रेसचे एक नेते म्हैसूरचे मुख्यमंत्री देवराज अरस यांनी सांगितले, तर इंदिरा काँग्रेसशी सहकार्य चालू राहील, असे महाराष्ट्रातील ऐक्यवादी गटाचे एक नेते श्री. वसंतदादा पाटील यांनी सांगितले. ऐक्याचा घोळ घालून काँग्रेसला निष्क्रिय करून टाकणाऱ्या स्वर्णसिंगांनी व त्यांच्या गटाच्या लोकांनी काँग्रेसची सूत्रे सोडली पाहिजेत, अशी मागणी शरद पवार यांनी केली.

काँग्रेस गोटातील हे निरनिराळे विचार-प्रवाह लक्षात घेता दोन्ही काँग्रेस पक्षांचे संबंध यापुढे कोणत्या स्वरूपाचे राहतील, त्याचे बळ व स्थान काय राहील याचा विचार करायला हवा. ऐक्याचे प्रयत्न यापुढे करावयाचे नाहीत, असे काँग्रेस कार्यकारिणीने ठरविले असले तरी प्रयत्न कायमचे थांबले, असे समजण्याचे कारण नाही. याबाबतीत पूर्वीचा दाखला आपल्यापुढे आहेच. ऐक्याची बोलणी यापूर्वीही एकदा होऊन ती थांबविण्यात आली होती; पण चिकमगळूरनंतर ती पुन्हा सुरू झाली होती. तेव्हा पुन्हा प्रयत्न होणारच नाहीत असे म्हणता येणार नाही.

दोन्ही काँग्रेस पक्ष एक होवोत किंवा न होवोत, देशाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न म्हणजे सध्याच्या सत्तारूढ जनता पक्षाला प्रभावी पर्यायी पक्ष त्यातून निर्माण होण्याची कितपत शक्यता आहे ? ऐक्याच्या वाटाघाटीत वेळ गेल्याने काँग्रेस पक्ष संघटित करण्यास वेळ मिळाला नाही, अशी सबब सांगितली जाते; ती काही प्रमाणात खरी असली तरी या सबबीच्या आड त्यांना आपली निष्क्रियता दडविता येणार नाही. खरी परिस्थिती अशी आहे की, १९७७ च्या पराभवातून सावरून निश्चित धोरण व कार्यक्रमाच्या पायावर काँग्रेस पक्ष खंबीरपणे उभा राहूच शकला नाही. दक्षिणेतील विधानसभा निवडणुकांत इंदिरा काँग्रेसने दोन राज्यांत सत्ता मिळविली. महाराष्ट्र यशवंतराव चव्हाणांचा बालेकिल्ला राहिला नाही, हे या निवडणुकांनी दाखवून दिले आणि जवळजवळ काँग्रेसच्या बरोबरीने जागा इंदिरा काँग्रेसने मिळविल्या. सत्ता-कांक्षेने तत्त्वनिष्ठेवर मात केली आणि निवडणुकीत एकमेकांना विरोध करणाऱ्या या दोन काँग्रेस पक्षांनी एकत्र येऊन सरकार बनविले.

ऐक्यविरोधाची ठाम भूमिका शरद पवार यांनी घेतली आहे; पण आघाडी निराळी आणि ऐक्य निराळे, असा शब्दश्लेष काढून आपल्या धोरणाचे समर्थन त्यांनी त्या वेळी केले होते. महाराष्ट्रात वसंतदादांनी ज्या पद्धतीने मंत्रिमंडळ बनविले त्यावरून इंदिरा काँग्रेसपुढे ते शरणागती पत्करायला तयार आहेत, हे स्पष्ट झाले होते. शरद पवारांनी त्या मंत्रिमंडळात खरोखर प्रवेशच करायला नको होता.

पुढे वसंतदादा-मंत्रिमंडळ कोलमडले ते, इंदिरा काँग्रेसशी केलेली आघाडी मोडून सरकारमधून बाहेर पडावे, असा आदेश काँग्रेस कार्यकारिणीने दिल्यामुळे. शरद पवार-गट त्यापूर्वीच मंत्रिमंडळातून बाहेर पडला होता. विधानसभेत पराभवाची नामुष्की पत्करण्यापेक्षा राजीनामा देण्याचा निर्णय वसंतदादांनी घेतला. जनता पक्षा-बरोबर आघाडी करून मंत्रिमंडळ बनवावयाचे नाही, असा स्पष्ट आदेश काँग्रेस-कार्यकारिणीने शरद पवारांना दिला होता; पण तो न मानता त्यांनी मंत्रिमंडळ बनविले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नरेंद्र तिडके यांनी शरद पवार व त्यांच्या गटाच्या सभासदांना काँग्रेसमधून काढून टाकले. पुरोगामी लोकशाही काँग्रेस म्हणून त्यांचा गट काम करू लागला. तेव्हा पवार-गटाने मुंबईला मोठा मेळावा भरवून महाराष्ट्रात खरी काँग्रेस आमचीच, असा दावा केला आणि श्री. दादासाहेब रूपवते यांची अध्यक्षपदी निवड केली. पवार-काँग्रेस, तिडके-काँग्रेस आणि इंदिरा काँग्रेस अशी महाराष्ट्रात काँग्रेसची तीन शकले झालेली आहेत.

आपला मुख्य लढा कोणाशी ? जनता पक्षाशी का इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीशी, यातून काँग्रेसला करायची निवड आहे. ऐक्याच्या वाटाघाटी बंद करण्याचे काँग्रेस कार्यकारिणीने ठरविले. जनता पक्ष आणि इंदिरा काँग्रेस यापैकी कोणाशीही सहकार्य न करता स्वतःच्या बळावर देशात प्रभावी लोकशाही पर्याय आम्ही उभा करणार, असा दावा काँग्रेस कार्यकारिणीने पूर्वी एका ठरावात मांडला होता. त्याच भूमिकेवर कार्यकारिणी पुन्हा आली आहे. देशात असा पक्ष उभा राहिला तर हवेच आहे; पण असा पक्ष उभारण्यासाठी आवश्यक असलेले संघटनाकुशल प्रभावी नेतृत्व आज काँग्रेस-जवळ आहे काय, याचा विचार करायला हवा. यशवंतराव चव्हाण, डॉ. करणसिंग यांनी काँग्रेसची सूत्रे आता हाती घ्यावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे; पण चव्हाणांची आतापर्यंतची भूमिका लक्षात घेता प्रभावी नेता ही आपली प्रतिमा ते निर्माण करू शकलेले नाहीत. ऐक्य-वाटाघाटींना त्यांनी विरोध केला; पण कार्यकारिणीवर ते आपल्या मताचा प्रभाव पाडू शकले नाहीत. त्यामुळेच वाटाघाटींचा घोळ गेले चार महिने चालू होता.

शरद पवारांनी जनता पक्षाशी सहकार्याची भूमिका घेतली; पण चव्हाणांनी या भूमिकेला कधीही उघडपणे पाठिंबा दिलेला नाही. अर्थात ते आतून शरद पवारांच्याच मताचे आहेत असे म्हटले जाते. काँग्रेसचे नेतृत्व त्यांच्याकडे आल्यास ते उघडपणे ही भूमिका घेतील काय ? ते ही भूमिका उघडपणे घेत नाहीत याचे एक कारण, प्रभावी पक्ष म्हणून काँग्रेसच्या वाढीस ही भूमिका पोषक होणार नाही, असे त्यांना वाटते. 'हे कसले विरोधक ? हे जनता पक्षाचेच सहप्रवासी आहेत,' अशी काँग्रेसची बदनामी करण्याची संधी इंदिरा काँग्रेसला मिळेल. त्यांना ही संधी कशाला द्यावयाची, असा एक विचार यशवंतरावांच्या मनात असणे शक्य आहे; पण जनता पक्ष आणि इंदिरा काँग्रेस यापैकी एकास प्रभावी विरोध करायचा तर दुसऱ्याशी काही प्रमाणात सहकार्य करावेच लागणार. देशातील लोकशाहीस बळकटी आणण्याच्या दृष्टीने एकाधिकारशाहीस विरोध, हाच मुख्य प्रश्न मानून त्यासाठी शरद पवार पुरस्कारीत असलेली जनता पक्षाशी सहकार्याची भूमिका काँग्रेसने घ्यावयाला हवी. येत्या २७ एप्रिलला भरणाऱ्या

पृष्ठ २२ वर

# गॉर्की कॉलनी

: लेखक :

**ए. एस. मकरेन्को**

: अनुवाद :

**मीनाक्षी कोल्हटकर**

पूर्वसूत्र : १९२२ च्या हिवाळ्यात कॉलनीमधील मुलींचा आकडा सहापर्यंत गेला. अर्थात प्रत्येकीचा स्वभाव अगदी वेगळा. त्यातल्या त्यात हुषार असलेल्या राइसा सोकोलोवाने मात्र किव्हच्या रॅबफॅक्टच्या परीक्षेच्या नावाखाली धुमाकूळ घातला. कोर्नयेल या तिच्या मित्रापासून तिला दिवसही गेले. पण मूल जन्मल्याबरोबर रांइसाने त्याला मारून टाकलं आणि मुलींच्या डॉरमिटरीतच ठेवून दिलं. राइसावर खटला भरला गेला आणि आठ वर्षांच्या देखरेखीखाली ठेवण्याचा हुकूम निघाला. आणखी पाच-सहा वर्षांनी ती स्थिरही झाली.
त्या वर्षीच्या वसंत ऋतूमध्ये विषमज्वराच्या साथीने कॉलनीतल्या मुलांना अतिशय पछाडलं. जवळजवळ प्रत्येकाने हॉस्पिटलची वारी केली.
या व इतर अनेक आपत्त्यांवर 'गॉर्काइटस्' मात करत होते; पण, तिथल्या शिक्षणखात्याला मात्र त्याची काहीच कदर नव्हती. स्वतःला समाजशिक्षणतज्ज्ञ समजणारे शारीनसाहेब एक दिवस कॉलनीत आले व त्यांनी आन्तोनना पोलिसांकरवी अटक करण्याचा प्रयत्न केला. शारीनसाहेबांचा तो डाव तर फसलाच, शिवाय कॉलनीतल्या मुलांनी त्यांना चांगलाच धडा शिकविला !

## प्रकरण अठरावे

## शेजारच्या गावाशी संबंध

नवीन घेतलेल्या ट्रेपकेवाडीची दुरुस्ती फारच कटकटीची होऊन बसली होती. तिथे असलेल्या घरांची दुरुस्ती करणे कठीणच होते. त्याला नवीन बांधकामाची जरुरी होती. पैशाची चणचण होतीच. आम्हाला मदत व्हायची ती स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांकडून; पण ते आमची मागणी बाजूला ठेवीत व मोठ्या शहरांना लागणाऱ्या सामानाची मागणी आधी पुरी करीत. उदा. कियेव, खारकोव वगैरे. आमची मागणी बऱ्याचदा फेटाळली जाई. फार फार तर १०% मागणी पुरी होई. आम्ही अनेकदा खारकोवच्या वाऱ्या करून मोठ्या मुष्किलीने मिळविलेली खिडक्यांची काचेची तावदाने स्टेशनवरूनच कोणी तरी दुसऱ्या संस्थेने गायब केली !

पैशांच्या ओढाताणीमुळे बाहेरचे मजूर कामाला लावणे आम्हाला शक्यच नव्हते. तरी बरेचसे काम आमचे आम्हीच करून घेत होतो. थोडी-बहुत मदत मिळाली ती मुख्यतः सुतारकामातच.

आम्हाला पैशाची मदत थोडी-बहुत मिळू शकली. कारण या नव्या कॉलनीत खूपशी अर्धवट पडझड झालेली घरकुले व तबेले होते. ट्रेपकेबंधूंचा एक शेतमळा होता व घोड्याची पैदास करण्याचा धंदाही होता. अर्थात त्यासाठी लागणारे तबेले दुरुस्त करून घेण्याची आमची ऐपत नव्हती, शिवाय आम्हाला त्यांची जरुरीही नव्हती, असे कालिनासाहेब म्हणत असत आणि ते खरेही होते.

म्हणून आम्ही या अर्धवट पडलेल्या इमारतीची लाकडे व विटा आसपासच्या खेड्यात विकायला सुरुवात केली. या खेडुतांना आपल्या घरात स्वयंपाकाचे कट्टे हवे होतेच. म्हणून त्यांनी आमच्या त्या विटा वगैरे विकत घेतल्या.कोणत्याही गोष्टीचा साठा करून ठेवणे ही सुखवस्तु लोकांची प्रवृत्ती असते व त्यानुसार काही लोकांनी जरुरी नसताही आमच्याकडून विटा विकत घेऊन त्या साठवून ठेवल्या. ती घरे व तबेले मोडण्याचे काम आमची मुले करीत होती. लहानसहान लोखंडी तुकडे कोणाकोणाच्या हाताला लागले होते. तरीही संथपणे आमचे काम चालू होते. आमची मुले अर्धा वेळ अभ्यास व अर्धा वेळ काम या नियमाने करीत असत. त्यामुळे अर्धी मुले सतत कामाला जुंपलेली असत. त्यामुळे जुन्या व नव्या कॉलनीत काम सतत चालू असे. या सगळ्या गडबडीतही मुले एखाद्या रस्ता चुकून आलेल्या कोंबडीच्या मागे लागण्यास कमी करीत नसत. ती कोंबडी पकडल्यानंतर पोटात जाईपर्यंत अनेक गोष्टी घडत असत. त्या बऱ्याच गुंतागुंतीच्या असत. त्यासाठी शक्ती, धूर्तपणा, शांतपणा आणि उत्साह यांची खूप आवश्यकता होती. हे कार्यक्रम जास्तीत जास्त गुंतागुंतीचे होण्याचे कारण म्हणजे काही प्रमाणात मुले या प्रकरणात जास्त गोवली जात आणि बाहेर निसटायचे मार्ग पटकन मिळत नसत. काहीही बोलले तरी नकळत मुले इतिहासाचा शोध घ्यायला जात. म्हणजेच ती कोंबडी शिजवायला लागणारा विस्तव कोठून तरी पैदा करावा लागे.

जुन्या कॉलनीतून नव्या कॉलनीत जाण्याच्या उद्योगांमुळे आमची मुले व जवळच्या गावकऱ्यांची मुले ओळखीची झाली. या गावकऱ्यांचे दैनंदिन आयुष्य, त्यांच्या गरजा आमच्या मुलांना जवळून पहावयास मिळाल्या. शेतकऱ्यांच्या आयुष्यांशी व इतर घटकांशी

फारशी ओळख करून घेतली नसली तरी एवढे खरे की, त्यांनी शेतकऱ्यांच्या दूध-दुभत्यांना हात घातला व चांगलेच नैपुण्य दाखविले. या बाबतीत आपल्याला विरोध होईल, याबद्दल मुलांची पक्की खात्री होती. त्याला तोंड देण्यासाठी मुलांनी चांगली तयारी ठेवली होती. ही कारवाई बहुधा रात्रीच्या वेळी होत असे. पोटा-पाण्याचा प्रश्न अगदी मनसोक्त सोडवण्याचे काम त्यांनी पार पाडले. दूध, चक्का, लोणी व तत्सम पदार्थ यांवर चांगलाच हात मारला. अशा त-हेने गॉर्की कॉलनीच्या मुलांनी त्या जवळच्या खेडुतांशी घनिष्ट-संबंध प्रस्थापित केला.

जोपर्यंत हे काम काराबानोव, तारानेटस, व्होल्कोव्ह, असादची, मिटघागिन या तरबेज लोकांच्या हातात होते, तोपर्यंत मी सुखाने झोप घेऊ शकत होतो. कारण या कलेत त्यांचे नैपुण्य होते व ते सफाईदारपणे पार पाडीत. बिचारे गावकरी! 'काल रात्री दोन चरव्या दूध चोरीला गेले', अशी तक्रार करीत असत. त्याचबरोबर चमत्कार असा की, दाराचे छप्पर, दरवाजा किंवा खिडकी जराही न मोडता सुरक्षित असलेले दिसे! किंबहुना दारात बांधलेला कुत्रासुद्धा ओरडलेला ऐकू येत नसे. याचा अर्थ असा की, जणू काही हा चोरीचा धंदा बिनघोक चालत असे. सर्व सजीव व निर्जीव वस्तूंचा या गोष्टीला जणू संपूर्ण पाठिंबा होता असे दिसून येई.

परंतु नंतर हा धंदा छोटया मुलांनी आपल्या हातात घेतला. घरांची कुलुपे मोडलेली दिसून येऊ लागली. तसेच ती कुठल्या तरी चावीने उघडायचा प्रयत्न केलेला ओळखता येत असे. कधी कधी ट्रेपकेवाडीत भिंती पाडण्यास उपयोगात आणलेल्या सोटयाचा त्या कुलपावर प्रयोग झालेला दिसे. रात्रीच्या वेळेस पूर्वी न ऐकू येणारे कुत्र्यांचे आवाज मोठयाने ऐकू येऊ लागले. कितीही कंटाळा आला असला तरी त्या आवाजात गावकऱ्यांना उठावेच लागे. याचा परिणाम म्हणजे गावकरी चिडून मुलांचा पाठलाग करू लागले बिचारी मुले प्रयोग फसल्यामुळे भलत्याच अडचणीत आली. मलाही त्यांनी अडचणीत टाकले. केव्हा केव्हा मला रात्रीच्या वेळी उठवून 'त्या मुलांना आमच्या ताब्यात द्या', अशा धमक्या गावकरी देऊ लागले. परंतु तो गुन्हेगार केव्हाच बिछान्यात लपेटलेला असे. त्यामुळे आलेल्या माणसाला मी संभावितपणे विचारीत असे. 'तो गुन्हेगार तुम्ही ओळखू शकाल का?' त्यावर तो बिचारा सांगे, 'मी त्याला कसा ओळखणार? पळत पळत कॉलनीत शिरताना मी पाहिलंय त्याला.'

'तो आमच्यातला नसलेच हो!' मी म्हणे.

'म्हणे आमच्यातला नसेलच. अहो महाशय, तुम्ही येण्यापूर्वी आमच्याइथे असले प्रकार घडतच नसत!'

मग तो तक्रार करणारा माणूस कोणाकोणाचे काय काय गेले त्याची उजळणी करायला लागे. 'कालच्या रात्री मिरोशनिचेन्कोच्या, त्याच्या आदल्या रात्री स्टीफानच्या घराचं कुलूप तोडलं. मागच्या शनिवारी दोन कोंबडे चोरीला गेले. त्याच्या आधी त्या स्टोबीनच्या गरीब विधवेचा सगळा चक्का नाहीसा झाला!' वगैरे वगैरे......

'पण या सगळ्या प्रकाराबद्दल तुमच्याकडं काही पुरावा आहे का?' मी विचारी.

'पुरावा? वा रे वा! अहो, आम्ही त्यांना ह्या कॉलनीत पळत येताना पाहतो तुमचीच ती कार्टी. ट्रेपकेवाडीकडे जाताना आमच्या घरांची टेहळणी करून जातात!'

त्या वेळी मला या गावकऱ्यांची दया येई. 'हे काही बरोबर होत नाही,' असे वाटत असे आणि मी काहीही करू शकत नाही याबद्दल मला स्वतःचाच राग येई. खरोखर अत्यंत लाजिरवाणी गोष्ट म्हणजे, जे काय चालले होते त्याची मला कल्पनाच करवत नव्हती. मी नुसता विचार करीत आलो होतो आणि त्याचा माझ्या मेंदूवर ताण पडत चालला होता.

वरवर दिसायला कॉलनीतली व्यवस्था उत्तम होती. दिवसा मुले आपापले काम व अभ्यास व्यवस्थित करताना दिसत. किंबहुना संध्याकाळी खेळ, गमती-जमतीही चालत असत. रात्री ते व्यवस्थित झोपी जात. सकाळी सगळेजण कसे ताजेतवाने दिसत असत; परंतु रात्रीच्या वेळी आजूबाजूच्या खेडयात मात्र चोऱ्यामाऱ्या होत. मोठया मुलांना याबद्दल मी चांगलेच फैलावर घेतले होते. याचा परिणाम म्हणजे काही दिवस गावकऱ्यांना उपद्रव झाला नाही. त्यांच्या तक्रारी कमी झाल्या; परंतु ही शांतता फार काळ टिकली नाही. लवकरच चोऱ्या-माऱ्यांच्या तक्रारी येऊ लागल्या.

आमची परिस्थिती आणखीनच थोडी चमत्कारिक झाली. कारण कॉलनीजवळून जाणाऱ्या मोठया रस्त्यावर दरोडेखोरी अजून चालूच होती. ह्या चोऱ्या किंवा दरोडेखोऱ्या पैशा-अडक्याच्या बाबतीत न होता धान्यवस्तू, खाद्यवस्तू वगैरेंच्या बाबतीत होऊ लागल्या होत्या. हे काम आमच्या पोरांचे नसावे असे मी प्रथम समजत होतो; परंतु गावकरी मात्र ठामपणे सांगत की, 'हे काम तुमच्याच मुलांचं आहे आणि आम्ही जेव्हा तुमच्या मुलांना पकडून चांगलं झोडपून काढू त्या वेळी तुम्हाला समजेल!'

मुलांनीही मला हमी दिली की, 'गावकरी आमच्याबद्दल खोटा आळ घेत आहेत एखाददुसरा मुलगा कधी तरी चोरी करायला गेला असेल; परंतु त्या मोठया रस्त्यावरच्या चोऱ्या खचितच आमच्यापैकी कोणीही केल्या नाहीत!'

मलाही असे वाटले की, 'मुले सांगताहेत ते खरे असावे. अशा तऱ्हेची दरोडेखोरी त्यांना पेलण्यासारखी नव्हती.' या विचारामुळे माझे मन थोडे हलके झाले; परंतु थोडयाच दिवसात माझी अशांतता दुसऱ्या एका कारणामुळे वाढली गेली.

एका संध्याकाळी घोडेस्वारांची एक पलटण कॉलनीत घुसली. त्यांनी प्रथम सगळया कॉलनीची नाकेबंदी केली. डॉरमिटरीच्या दारावर त्यांनी आपले रखवालदार उभे केले व मग त्यांनी आमच्या कॉलनीतला कोपरा न् कोपरा शोधायला सुरुवात केली. या सगळयावर ताण म्हणजे त्या लोकांनी मला माझ्या ऑफिसात गिरफतार करून ठेवले. याचा परिणाम असा झाला की, मुलांनी दगड-विटांचा मारा करायला सुरुवात केली. आलेल्या स्वारांची व मुलांची झटापट सुरू झाली. काही मुलांनी उभ्या केलेल्या घोडयांवर विटांचा मारा करून त्यांना लांब पळवून लावले. या साऱ्या गोंधळात काराबानोव माझ्या ऑफिसात धावत आला. तो म्हणाला, 'आन्तोन, तुम्ही असाल तसे बाहेर या, नाही तर आज भयंकर प्रकार घडेल!'

मी झटक्यातच बाहेर आलो. माझ्याभोवती संतापलेल्या मुलांनी घोळका केला. झादारोव तर रागारागाने थरथरत होता.

'काय, हे चाललंय काय ? हे थांबणार आहे की नाही ? मला खुशाल त्यांनी तुरुंगात पाठवावे. हा सारा चीड आणणारा प्रकार आहे. ही सगळी झडती कशासाठी ? आम्ही काय कैदी आहोत काय ? की दरोडेखोर आहोत ? ही कॉलनीची कसून तपासणी कशासाठी ?'

त्या पलटणीचा मुख्य मनातून घाबरला होता; परंतु वरकरणी आव आणून तो म्हणाला, 'तुमच्या मुलांना तावडतोब आत जायला सांगा. त्यांनी आपापल्या खाटेजवळ शांतपणे उभं राहिलं पाहिजे !'

'कुठल्या आधारावर तुम्ही कॉलनीची तपासणी चालवली आहे ?'

'हे विचारण्याचा तुम्हाला हक्क नाही. मला वरून हुकूम मिळाला आहे.'

'तुम्ही येथून तावडतोब चालते व्हा !'

या दटावण्यावर 'याचा अर्थ काय हे नीट समजतेय ना तुम्हाला ?' असे त्यांनी मला विचारले

'शिक्षण-खात्याच्या प्रमुखाच्या परवानगीशिवाय कॉलनीत कोणीही प्रवेश करू शकत नाही, मग झडती घेणं दूरच राहिलं. तुम्ही तावडतोब इथून निघून जावं. न गेल्यास मला जबरदस्तीनं तुम्हाला हाकलून काढावं लागेल !' असे मी त्यांना ठासून सांगितले

'आम्ही काही तुमची झडती घेत नाही,' असा कोणा तरी मुलाचा आवाज उठला. मी त्याला गप्प केले.

पलटणीच्या मुख्याने 'तुम्हाला तुमचा आवाज बदलावा लागेल,' असे बजावले. त्याने आपले स्वार गोळा केले. मग मुलांनी उधळलेले घोडे शोधून आणायला मदत केली एकंदरीत ही सगळी ब्याद एकदाची निघून गेली !

त्यानंतर झाल्या प्रकाराबद्दल मी निषेध नोंदवला. या हल्ल्यानंतर मोठ्या रस्त्यावर होणाऱ्या चोऱ्या जास्त प्रमाणात वाढल्या आणि पुन्हा एकदा शेजारपाजारचे गावकरी माझ्या मुलांविरुद्ध तक्रारी घेऊन माझ्याकडे येऊ लागले.

'काल तुमच्या मुलांनी येवतूकच्या बायकोजवळून लोणी व चक्का जबरदस्तीने पळविला !'

'हे साफ खोटं आहे !' आमच्या मुलांनी ठणकावून सांगितले.

'नाही ! आम्ही सांगतोय तेच खरं आहे ! ओळखायला येऊ नये म्हणून यांनी आपल्या टोप्या तोंडावर ओढून घेतल्या होत्या !' असे गावकरी म्हणाले.

'अशी किती मुलं होती ?' मी त्यांना विचारले.

त्यावर 'एकजण होता,' असं ती बाई म्हणत होती व तो तुमच्याच कॉलनीतला होता. कारण तुमची मुलं घालतात तसलाच कोट त्याच्या अंगावर होता !' गावकरी म्हणाले.

त्यानंतर गावकरी परत गेले. आम्ही सारे उदास होऊन बसलो होतो. काराबानोव एकाएकी ओरडला, 'हा आरोप नक्कीच खोटा आहे आपण याचा शोध करू !'

मुलांनाही अलीकडे काळजी वाटू लागली होती. वरचेवर घडणाऱ्या प्रकारांनी ती पण बुचकळ्यात पडली होती; परंतु गावकऱ्यांच्या घरांवर होणाऱ्या धाडी कमी झाल्या होत्या. दररोज संध्याकाळी कॉलनीत एक प्रकारची विचित्र शांतता पसरत असे व नव्या होणाऱ्या आघातामुळे कॉलनीतले वातावरण जणू काही पक्षघात झाल्यासारखे भासे काराबानोव, झादारोव व बुरुन हे झाल्या प्रकारामुळे चिडून उठले होते. ते दररोज रात्री प्रत्येक डॉरमिटरीत जाऊन कोपरान्‌-कोपरा व आजूबाजूच्या झुडपात सतत शोध घेत असत. माझ्या आयुष्यात अशा तऱ्हेची मरगळ पूर्वी कधीच आली नव्हती.

एका संध्याकाळी माझ्या ऑफिसचा दरवाजा ठोठावला गेला. मुलांनी प्रिखोदकोला पुढे घालून आणला होता. काराबानोवने त्याची कॉलर धरून त्याला माझ्यापुढे ढकलला.

'हा पहा !'

'पुन्हा सुरामारी चालू केलीस काय ?'

'सुराच काय, तर मोठ्या रस्त्यावर हा दररोज दरोडे घालतो '

सारे जग माझ्याभोवती फिरतेय असा मला भास झाला. भावना-रहित आवाजात मी त्याला विचारले, 'हे खरं आहे का ?'

'होय, हे सारं खरं आहे !' त्याचे डोळे जमिनीवर खिळले होते.

काय झाले ते कळण्यापूर्वीच मी माझ्या हातात रिव्हॉल्वर घेतला. त्याच्यावर रोखून मी त्याला म्हटले, 'बस ! आता तुला क्षमा नाही !'

परंतु पिस्तुलाचा चाप ओढणार इतक्यात मुलांचा घोळका अंगावर आला. मी जेव्हा भानावर आलो तेव्हा एकातेरीना, झादारोव, बुरून वगैरे माझ्याभोवती उभे होते. मी जमिनीवर पडलो होतो व माझ्या डोक्यावर पाणी पडत होते. झादारोवने माझे डोके घट्ट धरले होते. त्याने एकातेरीनाला सांगितले,

'बाहेर जाऊन मुलांना आवरा, नाही तर ती प्रिखोदकोचा जीव घेतील !'

थोड्याच वेळात मी बाहेर आलो आणि बेशुद्धावस्थेत असलेल्या व रक्ताने माखलेल्या प्रिखोदकोला बाहेर पाठविले. □

## प्रकरण एकोणिसावे

# गमावलेला डाव

१९२२ च्या उन्हाळ्यातील ते दिवस होते प्रिखोदकोच्या त्या झाल्या-गेल्या कृत्याबद्दल कॉलनीत कोणीही वाच्यता करीत नसत; परंतु त्या वेळी पोरांनी त्याला चांगलाच बेदम मारला होता. त्यामुळे बरेच दिवस त्याला अंथरुणातच पडून रहावे लागले होते. झाल्या प्रकाराबद्दल कोणीही त्याला काहीही विचारले नाही. मी व्यक्तिशः चौकशी केली त्यावरून त्याच्याजवळ काहीही शस्त्रास्त्रे सापडली नव्हती.

काही असले तरी प्रिखोदको हा सराईत दरोडेखोर होता. एवढे सारे रामायण होऊनही त्याच्या डोक्यात काहीही प्रकाश पडला नव्हता. नंतरही कित्येक दिवस त्याच्यामुळे कॉलनीच्या नावाची बदनामी होत राहिली. एका दृष्टीने कॉलनीशी तो एकनिष्ठ राहिला आणि कॉलनीविरुद्ध बोलणाऱ्याचे डोके कुऱ्हाड किंवा लाकडी सळईने

फोडण्यासही त्याने कमी केले नसते. तो कमालीचा मंदबुद्धीचा होता. जे काय बघेल ते प्रिखोदकोच्या डोक्यात भरून रहात असे; परंतु तो अत्यंत मेहनती मुलगा होता. कोणतेही अवघड काम तो चुटकीसारखे पार पाडी. शेजाऱ्याचे डोके फोडायला न वापरता दुसऱ्या चांगल्या कामासाठी वापरता येतील अशी अवजड हत्यारे काढून दाखवी.

मागच्या प्रकरणात वर्णिलेल्या घटनांमुळे कॉलनीतले लोक आजूबाजूच्या गावांतील गावकऱ्यांचा रागराग करीत असत. या लोकांच्यामुळे आपल्याला त्रास झाला, अशी त्यांची पक्की समजूत झाली होती. केवळ माझ्यावरच्या दयाबुद्धीनेच त्यांनी त्या लोकांचा सूड घेतला नव्हता.

माझी किंवा माझ्या सहकाऱ्यांची 'शेतकरी व त्यांचं कष्टमय जीवन' याबद्दलची बोलणी त्यांना आवडत नसत. गरीब शेतकरी व त्यांचे कष्ट याबद्दल आमच्या मुलांना तसा आदर नव्हताच. या बाबतीतले आमचे बोलणे किंवा चर्चा म्हणजे त्यांना या विषयातले माहितगार लोकांचे सांगणे आहे, असे कधीही वाटले नाही. उलट त्यांच्या मते, आम्ही शहरातले पढिक विद्वान आहोत व आम्हाला शेतकऱ्यांच्या जीवनाबद्दल खरीखुरी माहिती नाहीच व आमची ती कुवतच नाही, असा त्यांचा दृढ विश्वास होता.

ते म्हणत, 'हे शेतकरी कसे आहेत त्याची तुम्हाला खरी जाणीव नाही. अच्छेर, पावशेर भाकरीसाठी हे लोक कुणाचाही गळा कापतील. हे असले शेतकरी खरोखर एखाद्या भुकेलेल्या माणसाला गोळाभर अन्न द्यायचे नाहीत. ते एक वेळ आपले धान्य कोठारात कुजले तरी त्याची पर्वा करणार नाहीत.'

'आम्ही तर दरोडेखोर आहोत. अजूनही पाहिजे तर आम्हाला दरोडेखोर म्हणा. आम्ही वाईट होतो याची आम्हाला जाणीव आहे व आता आम्हाला त्याबद्दल क्षमाही केली गेली आहे; पण यांना कुणाचीच पर्वा नाही. त्यांच्या मते झारशाही वाईट होती व सोविएत सरकारही तितकेच वाईट आहे. या लोकांच्या मते चांगले कोण ? तर यांना जे सुखसोयी देतात व मोबदल्यात यांच्याकडून काहीही मागणार नाहीत असे लोक चांगले ! ते पक्के लुच्चे लोक आहेत.' 'मी या लुच्च्या शेतकऱ्यांकडे बघतच नाही. त्यांना बघून माझ्या तळपायाची आग मस्तकाला जाते व त्या सगळ्यांना बंदुकीच्या गोळ्या घालाव्यात असं मला वाटतं.' बुरुन एकदा म्हणाला

या लोकांना काही तरी टोचून बोलून चिडविणे हा बुरुनचा आवडता धंदा होता. बाजारात एखाद्या गावकऱ्याच्या गाडीजवळ उभा राहून तो त्याला म्हणे, 'तू अगदी दुष्ट आहेस.' गावकरी न समजून त्यावर काही तरी उत्तर देई. त्यावर बुरुन पुन्हा त्याला म्हणे, 'बरोबर, तू लुच्चा शेतकरी आहेस.' साहजिकच तो गावकरी रागाने काही तरी शिवीगाळ करी. बुरुनला तेच पाहिजे असे. मग बुरुन त्यावर हसून त्याला आणखीन चिडवीत असे. नवीन गाणे शिकणारा जसा मैफलीत रंगतो तसा बुरुन त्या शिवीगाळीत रंगून जात असे. 'तुम्ही जर तिथे नसता तर आम्ही त्यांना चांगलाच हात दाखवला असता,' असे बोलून दाखवायलाही बुरुन कमी करीत नसे.

एकंदरीत आमच्या मुलांच्या मनात या शेतकरी लोकांच्याबद्दल अढी निर्माण होण्याचे कारण म्हणजे, आमच्या आजुबाजूचे हे सारे शेतकरी सुखवस्तू होते. खरे कष्ट करणारे शेतकरी आमच्या नित्याच्या कॉलनी-जीवनापासून फार दूर होते व आमच्या मुलांशी त्यांचा परिचय झालेला नव्हता. आमच्या आजुबाजूला मौसी कारपोविचसारखेच लोक जास्त होते त्यांची स्वतःची उत्तम रंगरंगोटी केलेली व शाकारलेली घरे टुमदार होती व त्यांच्या सभोवतालची जागा कुंपण घालून सुरक्षित केलेली होती. ते बाहेरच्यांना, सहसा आपल्या घरातच काय, पण सभोवतालच्या जागेतही शिरू न देण्याची खबरदारी घेत. ते कधीही आमच्या कॉलनीत आले तर सोविएत सरकारविरुद्ध सतत टीका करीत असत. 'सोविएत सरकार इतकी करवाढ करीत आहे त्यामुळे हे सरकार जास्त दिवस टिकणार नाही,' असे सतत बडबडत रहात. ते स्वतः उत्तमोत्तम पोषाख करून सुटीच्या दिवशी रस्त्यारस्त्यातून घोड्यांवरून दौड करीत. त्यांच्या बायकाही छानदार पोषाख करून रस्त्यामध्ये मिरवीत. इतकेच काय, पण त्यांची मुले-बाळेही कडक इस्त्रीचे कपडे व चकचकीत बूट घालून त्यांच्यासारखीच नटून-थटून मिरवत असत.

आमच्या कॉलनीतल्या मुलांना या लोकांच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव चांगली होती. त्या प्रत्येकाकडे स्वतःच्या मालकीची औतनांगर आहेत, हेही माहीत होते. कारण मोडतोड झाला तर ते लोक दुरुस्तीला आमच्याच कॉलनीत घेऊन येत असत. गरीब शेतकऱ्यांचा व मेंढपाळांच्या कामाचा मोबदला हे लोक त्यांना न देता उलट त्यांना कसे हाकलून लावीत, ते मुलांनी चांगले पाहिले होते.

गंमत म्हणजे मलाही आमच्या मुलांच्या संगतीत राहून या लुच्च्या लोकांचा तिटकारा वाटू लागला होता.

त्यांच्या व आमच्या सततच्या भांडणांमुळे मला स्वस्थता मिळत नसे. त्यातच आमचे गावचे अधिकारी लोक अत्यंत उर्मटपणे वागत. ट्रेपके कॉलनी आमच्या स्वाधीन करताना आम्ही लवकरच ती सोडून जाऊ, असा विचार करूनच लुका सिम्यानोविचने ती जागा आम्हाला दिली होती. ट्रेपकेची मालमत्ता गावच्या सोविएतच्या हातात पडावी म्हणून त्याने आटोकाट प्रयत्न केले असतील. सबंध नाही तर काही भाग तरी आपल्या किंवा आपल्या साथीदारांच्या ताब्यात रहावा अशी सतत खटपट झाली; पण ते सारे प्रयत्न आम्ही हाणून पाडले. हे शाळेसाठी वगैरे नसून फक्त आपल्या तेथल्या सामानाचा जळणासाठी उपयोग करायचा लुकाचा इरादा होता व हे आमच्या खात्याच्या लोकांना पटवून देताना मला अतिशय त्रास झाला.

लुका सेमियानोविच व त्याचे साथीदार आमच्या विरुद्ध खात्याकडे नेहमी तक्रारी करीत व आम्हाला निरनिराळ्या सरकारी कचेऱ्यात फेऱ्या घालायला लावीत. पोलिसांनी एकाएकी आमच्या कॉलनीवर धाड घालण्यात लुकाचाच हात होता.

असाच एक दिवस लुका माझ्या ऑफिसात घुसला. 'तुम्ही आमची अवजारे दुरुस्त करता, त्या दुरुस्तीच्या पैशाच्या हिशोबाच्या वह्या आम्हाला दाखवा,' असे सांगू लागला. अर्थातच मी त्याला धुडकावून लावले.

'चालते व्हा म्हणजे काय ?' त्याने विचारले. माझ्या चेहऱ्यावरून आपले काही चालेल असे त्याला वाटले नाही. तो चडफडत निघून गेला व पुन्हा म्हणून त्याने आपले तोंड दाखवले नाही. इतकेच

कांय, मला त्याचा तिटकारा वाटू लागला. आमची मुले तर त्याचा भयंकर तिरस्कार करू लागली.

जून महिन्याच्या एका सोमवारी ट्रेपकेतल्या तळ्याच्या दुसऱ्या तीरावर एक मोठा मोर्चा येताना दिसला. मोर्चा कॉलनीच्या जवळ आल्यावर आमच्या सरोका व आप्रिश्कोला पुढे घालून दोन जमीनदार येताना आम्हाला स्पष्टपणे दिसू लागले. दोघांचेही हात मागे बांधलेले होते.

आप्रिश्को तसा मोठा उमदा तरुण होता. तो ब्राटचिन्कोशिवाय कोणालाही भीत नसे. तसे पाहिले तर आप्रिश्को जरी ब्राटचिन्कोच्या हाताखाली काम करीत असे तरी तो त्याच्यापेक्षा किती तरी धिप्पाड आणि थोराड बांध्याचा होता; परंतु त्याला आन्तोनबद्दल तो मुख्य सईस असल्यामुळे अपार आदर होता व आपल्या बळाचा त्याने ब्राटचिन्कोविरुद्ध कधीही उपयोग केला नव्हता. आप्रिश्को तसा दमदारपणे इतरांशी वागत असे. कुणालाही त्याने आपल्यावर हुकमत गाजवू दिली नव्हती. तो स्वतः अतिशय आनंदी वृत्तीचा होता व अशीच संगत तो शोधून काढीत असे. तो कधी किरकिऱ्या मुलांच्या संगतीत राहिला नाही.

मला अजूनही आठवते की, कॉलनीत यायला तो सुरवातीला नाराज होता. तो सारा प्रसंगच मोठा गमतीदार होता. त्याने माझे स्वागत मोठ्या विचित्र प्रकारे केले होते.

'तुम्ही चालते व्हा! मी तुमच्याबरोबर येणार नाही! समजलात?'

त्याच्या कर्तबगारीची मी खूप तारीफ ऐकली होती. म्हणून सुरवातीपासूनच मी त्याच्याशी फार काळजीपूर्वक वागत होतो.

'साहेब, आपल्याला त्रास द्यायचं जिवावर आलंय; पण काय करू? माझं कर्तव्य मला पार पाडणं भाग आहे. आपण गाडीत बसण्याची तसदी घ्यावी!'

माझ्या या फाजील अदबशीर वागणुकीमुळे आप्रिश्को प्रथम अवाक् झाला. त्याने उठण्याची तयारी दर्शविली; पण फिरून त्याच्या मूळ स्वभावाने उचल खाल्ली व परत बिछान्यावर घट्ट पडून तो ओरडला, 'मी येणार नाही, नाही, नाही! .....'

'मग महाशय, मला जबरदस्ती करून आपल्याला न्यावं लागेल!'

आप्रिश्कोने डोके वर उचलून माझ्याकडे पाहिले व विचारले, 'तुम्ही कोण उपटलात हो, मला जबरदस्ती करणारे? उचलून नेणं एवढं सोपं नाही हे पक्कं लक्षात असू द्या!'

मी माझा आवाज बदलला व वसकन् त्याच्यावर ओरडलो, 'चल, ऊठ लवकर. कोण समजतोस तू स्वतःला?'

आश्चर्य म्हणजे माझ्या त्या अवताराने घाबरून तो एकदम उठून बसला व खिडकीकडे धावला.

'मी खिडकीतून उडी टाकतो. पहा तुम्हाला खरं वाटत नाही काय?' तो म्हणाला.

'खिडकीतून उडी टाक किंवा माझ्याबरोबर यायला तयार हो व गाडीत मुकाट्यानं बस; पण फाजिलपणा बस झाला!' या माझ्या बोलण्यावर आप्रिश्को मोठ्याने हसला. आम्ही त्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर होतो.

'तुम्ही काही एकंदर सोडत नाही मला हं. गॉर्की कॉलनीचे डायरेक्टर ते तुम्हीच का? अहो, हे आधीच का नाही सांगितलंत? मी केव्हाच तुमच्याबरोबर आलो असतो.'

असा हा आप्रिश्को, कॉलनीत आल्यावर प्रत्येक गोष्टीत त्याने भाग घेतला; पण ते सारे गंमत म्हणून.

सारोका हा आप्रिश्कोहून लहान होता त्याचा चेहरा जरा भोळसट; पण तसा तो मूर्खच होता. जी कोणती गोष्ट करायला घेई ती त्याच्या अंगाशीच येई. त्यामुळे त्याला आप्रिश्कोबरोबर या लफड्यात सापडलेला बघून मुलांना वाईट वाटले. 'दिमित्री, या सारोकाबरोबर कुठं धडपडायला गेला होता?'

आलेल्या पाहुण्यांत गावच्या सोविएतचा अध्यक्ष व आमचा मित्र मौसी कारपोविच हे अग्रभागी होते.

मौसी कारपोविचने अगदी साळसूदपणाचा आव आणला होता. लूका सेमियानोविच हे एखादा न्यायाधीश निवाडा करायला आलेल्या मुख्य व्यक्तीसारखे वावरत होते. त्यांच्या अंगात शुभ्र सदरा होता व दाढी चांगली चोपून बसविली होती. ते नुकतेच चर्चमधून आल्यासारखे वाटत होते.

'फार चांगलं वळण लावलंय तुम्ही या मुलांना हं!' चेअरमनसाहेब उद्गारले.

'तुम्हाला त्याच्याशी कर्तव्य नाही!' मी पण धुश्श्यातच उत्तर दिले.

'लोकांना आता कंटाळा आलाय तुमच्या या चोऱ्यामाऱ्यांचा!'

'अहो, पण त्यांना बांधून ठेवण्याचा तुम्हाला काय अधिकार?' मुलांच्या घोळक्यातून एक आवाज आला, 'त्यांना वाटलं अजून जुनाच जमाना आहे.'

'तुम्ही जरा गप्प बसा रे!' मी मुलांना म्हटले.

'ही काय भानगड आहे?'

कारपोविचसाहेब पुढे सरसावले, 'सांगतो ऐका. माझ्या बायकोनं आपला एक झगा व एक पांघरायचं घोंगडं कुंपणावर वाळायला टाकलं होतं. हे दोघे तिथून जात होते. दुसऱ्याच क्षणी दोन्ही वस्तू गायब. मी ओरडलो तर हे पळायला लागले. मला म्हाताऱ्याला काय पळता येतं थोडंच. एवढ्यात समोरून लूका येत होता म्हणून आम्ही त्यांना पकडू शकलो. अगदी मुद्देमालासकट!'

'पण म्हणून त्यांना बांधून कशाला ठेवलंत?' पुन्हा मुलांच्या घोळक्यातून आवाज आला.

'ते पळतील म्हणून बांधून ठेवलं!'

'ते जाऊ दे. आपण आता ही जबानी लिहून घेऊ.' चेअरमनसाहेब म्हणाले.

'त्यांनी वस्तू परत केल्या ना, मग जबानी कशाला?'

'छे! छे! जबानी हवीच!' चेअरमननी कुठून तरी आमची इज्जत काढायचे ठरवलेच होते. आज ती संधी अनायासे मिळाली. आज खरे तर प्रथमच ही मुले मुद्देमालासकट सापडली होती.

आमची परिस्थिती कठीण होती. एक तर या मुलांना तुरुंगात पाठवावे लागले असते व शिवाय कॉलनीची बदनामी झाली असती ती वेगळीच!

'प्रथमच यांना तुम्ही मुद्देमालासकट पकडलंय आणि असं थोडंबहुत शेजाऱ्या-शेजाऱ्यात चालतंच. तेव्हा या वेळी त्यांना ताकीद देऊन

सोडून देऊ!'

'छे, छे! अशी मुटका नाही. जबानी ही घेतलीच पाहिजे!'

मौसीसाहेबांना जुनी आठवण झाली, 'तुम्ही कसं मला मागं पकडून दिलंत? जंगल तोडतानाची माझी कुऱ्हाड अजून तुमच्याकडेच आहे. मला केवढा दंड भरायला लावलात, सांगा पाहू!'

मला काही बोलणे शक्यच नव्हते. मी मुकाटयाने ऑफिसकडे गेलो. आज आम्ही अडकलो गेलो होतो. त्यांची जीत होती. मी मुलांवर ओरडलो, 'छान नांव कमावलंत! काय चोरलंत, तर झगे! हा कालिमा कधीही पुसला जाणार नाही. याचा तुरुंगवासही चुकणार नाही!'

मुले चुपचाप झाली होती.

बराच वेळ त्या तिघांशी चर्चा केल्यावर ते जबानी घेण्याचे सोडून द्यायला तयार झाले; पण एका अटीवर की, अशी गोष्ट पुन्हा होणार नाही. दुसरे म्हणजे गावच्या सोविएतच्या गाडीला थोडक्या खर्चात चाके बसवून द्यायची. ही अट सर्व मुलांनी मिळून कबूल करावी, असा त्यांनी आग्रह धरला.

त्या २-३ तासांत माझ्या मनात त्या चेअरमनबद्दल कमालीचा तिटकारा उत्पन्न झाला. माझ्या मनात आले की, 'आमच्या मुलांनी याचं कधी काळी उट्टं काढायचं ठरवलं व याला एकटयाला गाठून मारला तर मी काही याला सोडवायला जाणार नाही!'

पण पुढे आलेल्या या आपत्तीतून दुसरा मार्ग नव्हता. मी साऱ्या मुलांना ओळीत उभे रहायला सांगितले व त्या साऱ्यांच्या वतीने मी त्या तिघांची माफी मागितली. पुन्हा अशी गोष्ट घडणार नाही, असे वचनही दिले.

सेमियानोविचने या संधीचा फायदा घेऊन एक व्याख्यान झोडले; 'खरं तर याला जबर शिक्षा झाली पाहिजे. आम्ही सारे कष्टकरी आहोत. कष्ट करून मिळविलेली वस्तू चोरणारे सोविएत सरकारचे शत्रू आहेत, असे मी समजतो. तुमचे डायरेक्टरसाहेब सांगतात की, तुम्हाला ते उत्तम नागरिक बनवणार आहेत. कोणास ठाऊक, तुम्ही उत्तम नागरिक बनणार की दरोडेखोर बनणार!'

रागाने माझे सारे अंग थरथरत होते. सारोका व आप्रिस्को आता मुलांच्या रांगेत उभे होते. त्यांची तोंडे पार काळवंडून गेली होती.

चेअरमन व कारपोविच माझ्याबरोबर हस्तांदोलन करून केव्हा वाटेला लागले हे मला कळलेच नाही.

सूर्याचे ऊन तळपळत होते. तरीही एक प्रकारची सावट साऱ्या कॉलनीभर पसरल्यासारखे वाटत होते.

मी अवतीभोवती पाहिले. तीच कॉलनी, त्याच त्या इमारती, त्यातल्या त्या खोल्या आणि त्यात रहाणारी मुले. उद्या ही कॉलनी अशीच दिसेल. अशाच चोऱ्या व मग शेजाऱ्यांच्या तक्रारी व त्या निस्तरण्यासाठी शहराकडे हेलपाटे. माझ्या डोळ्यांसमोर माझी खोली दिसू लागली. ती जुनी खाट व ते ओबडधोबड टेबल! काय करावे, कसे वागावे काही सुचत नव्हते.

मी माझा मोर्चा जंगलाच्या दिशेला वळवला. पाइनच्या जंगलात सावली अशी नसतेच. कारण ती सरळसोट झाडे अगदी जणू काही कोणी तरी खास मांडून ठेवल्यागत दिसतात.

आम्ही एवढे जंगलाच्या जवळ असून मला खरोखर तिथे फिरायची कधी संधीच मिळाली नव्हती. माझा सर्व वेळ माणसांच्या जगात, त्यांच्या दैनंदिन कटकटी सोडविण्याकडे खर्च होई. जंगलाच्या त्या शांत व गंभीर वातावरणातसुद्धा एक वेगळीच मजा असते. तिथून जावेसेच वाटत नाही. क्षणभर आपणही एक वृक्ष बनून आभाळाखाली या खऱ्याखुऱ्या सुधारलेल्या व निर्मळ वातावरणात उभे ठाकावे, असे वाटू लागले.

मी अशा विचारात गर्क होतो. एवढयात एक फांदी हालली. मी सहज पाहिले तर आमची दोस्तमंडळी सगळया बाजूंनी उभी असलेली दिसली मी जरा चकितच झालो. ती सारीजण लक्ष देऊन माझ्या हालचालींवर नजर रोखून राहिली होती.

'काय चाललंय तुमचं इथं? माझ्यामागं इथं पण कशाला आलात?'

झादारोव एकदम पुढे झाला व गदगदलेल्या आवाजात म्हणाला, 'आन्तोन, कॉलनीत परत चला!'

क्षणभर माझे काळीज धडकले, 'आता पुन्हा आणखी काय झालं?'

'काहीच झालं नाही. पण आपण परत फिरू या!'

'अरे पण झालंय काय तुम्हाला? बोला तरी!'

झादारोव पुढे होऊन म्हणाला, 'तसं झालं काहीच नाही; पण तुमचं ते पिस्तूल द्या बरं इकडं. एवढी कृपा करा!'

'अरे, पण कशासाठी ते तर सांग!'

माझ्या डोक्यात प्रकाश पडला व मी मोठयाने हसलो

'जरूर माझं पिस्तुल देतो; पण मला पिस्तुलच कशाला हवं? मी हवं तर मला टांगून घेऊ शकतो किंवा तळयात उडी पण घेऊ शकतो!'

झादारोव्ह मोठयाने हसला, त्याचे हसणे साऱ्या जंगलभर दुमदुमले.

'पण खरं सांगू? आम्हाला वाटलं की, तुम्ही स्वतःवर गोळी झाडून घेणार आहांत; पण तसं काही झ लं नाही. ठीक आहे, तुम्ही पाहिजे तितका वेळ फिरा! चला रे पोरांनो कॉलनीत!'

त्याचे असे झाले की, मी जेव्हा फिरायला निघालो तेव्हा सारोकाने मला पाहिले होते. तो धावत डॉर्मिटरीत गेला व साऱ्या मुलांना ओरडून सांगत सुटला, 'अरे चला, जंगलाकडे. आन्तोन जगलात गेले आहेत. ते स्वत.वर गोळी झाडून घेणार असं वाटत!'

त्याचे बोलणे पुरे व्हायच्या आतच सगळे जंगलात येऊन दाखल झाले.

संध्याकाळी सारेजण विचित्र मन.स्थितीत दिसत होते. एकटा काराबानोव उगाचच इकडून तिकडे फिरत होता.

झादारोव तोंडावर उसने हसू आणून फिरत होता. आप्रिस्को कोझीरच्या कॉटवर पडून अक्षरशः रडत होता. सारोका कुठे तरी दडून बसला होता.

अखेरीस झादारोव म्हणाला, 'चला, आपण सारेजण गमावलेला डाव खेळू या!' शिक्षणतंत्र काय विचित्र रूप घेते पहा! चाळीस मळक्या कपडयातली, अर्धवट उपाशी पोरे डाव खेळत होती. अगदी हसून-खिदळून. सोबतीला होता मिणमिण तेलाचा दिवा. फक्त त्या खेळांत अभाव होता तो पारंपारिक चुंबन घेण्याच्या उपचाराचा. ◻

## प्रकरण विसावे

# घोड्यांच्या बदल्यात शेतकीयंत्र

उंदाच्या उन्हाळ्यात शेतीच्या कामासाठी घोड्यांची फार जरुरी होती लॅंडी व बॅंडिट हे दिवसेंदिवस तसे निकामी होत चालले होते. दररोज कालिनासाहेब सोविएत सरकारला शिव्यांची लाखोली वाहात व क्रांतीविरुद्ध बोलत असत. यांना काहीही करता येत नाही असा त्यांचा आरोप असे.

त्यांचे म्हणणे असे की, 'शेती करायची तर औताला काय जुंपणार हो? घोडे हे हवेतच. हे काय घोडे आहेत? म्हणजे दिसायला घोडे आहेत; पण जरा काम केलं की थकतात, बैठक मारतात. त्यांच्याकडून कसं काम घेणार? त्यांची कीवच येते. मुकी जनावरं बिचारी!'

ब्राटचिन्कोचे आपले सरळ असे होते की, त्याला घोडे आवडत, कारण ते मुके घोडे आहेत म्हणून. थोडेही जादा श्रम त्याच्या आवडत्या घोड्यांना पडले की, त्याला भयंकर दु:ख होई. तो म्हणे, 'अशा स्थितीत तुम्ही कसा नांगर ओढू देता?'

कालिनासाहेबांचा आरडाओरडा त्यांच्या पथ्यावरच पडत असे. तो घोड्यांना कामच करू देत नसे. नव्या कॉलनीत घोड्यांचे तबेले वगैरे आम्ही दुरुस्त करून घेतले होते; पण त्यात बांधायला घोडेच नव्हते. पेरणीचे दिवसही जवळ येत चालले होते; पण आम्ही काय करणार?

एक दिवस कचेरीत मी चेरनेन्कोजवळ गप्पा मारीत होतो. बोलता बोलता मी घोड्यांची गोष्ट काढली, 'आम्ही ठरलेल्या सामुग्रीवर चालवून घेऊ हो; पण घोड्यांचं काय? एवढी जमीन आहे आमच्याजवळ; पण फुकट जातेय आणि आमचे शेजारी पाजारी आमच्यावर जास्तच चिडतात.'

चेरनेन्कोने जरा विचार केला, 'अरे थांबा, मला एक कल्पना सुचलीय. आमच्याकडे सध्या काटकसरीची मोहीम आहे. आम्हाला ते सर्व घोडे लागत नाहीत. आम्ही तात्पुरते तीन घोडे तुम्हाला देऊ. त्यांना खायला घालणं वाचेल व तुमचंही काम भागेल. चला, आपण आमच्या पुरवठा खात्याच्या प्रमुखांना भेटू व ही योजना त्यांच्यापुढे ठेवू.'

आम्ही पुरवठा खात्याकडे गेलो. हे गृहस्थ मोठेच व्यवहारी दिसले. त्यांनी सांगितले, 'हो, घोडे मिळतील; पण ते भाड्यानं मिळतील. नुसतेच नाही. तुम्ही आम्हाला महिन्याला पाच मण धान्य व छोट्याशा घोड्याच्या गाडीची चाकं त्या बदल्यात दिली पाहिजेत. तुमच्याकडं चाकं वगैरे दुरुस्त करण्याचं काम चालतंच. खरं की नाही?'

'अहो महाशय, आम्हाला काय उपाशी मारायचा बेत आहे काय? आम्ही कोण आहोत हे माहीत आहे ना?' मी त्यांना विचारले.

'हे पहा, मी इथं धर्मादाय खातं उघडलेलं नाही. तुम्ही कोणीही असा. माझी अट कायम. आमचे घोडे कसे आहेत ते पहा. देखणे व छान. तुम्ही त्यांच्याकडून चोपून काम करून घ्याल व त्यांचं चिपाड कराल हे मला पक्कं माहीत आहे. अटी कबूल असल्यास घोडे घेऊन जा. यात जराही फरक होणार नाही.'

मी त्याला पाच मणच काय, पण शंभर मण धान्य द्यायला सुद्धा तयार होणे भाग होते. तसेच सगळ्या शहरातल्या गाड्यांची चाकेही बसवून देणे कबूल करणे भाग होते. कारण त्या बदल्यात घोडे हे मिळायलाच हवे होते.

नंतर त्या साहेबांनी लगेच करारनामा लिहून काढला तो असा— 'अमुक अमुक घोडे गॉर्की कॉलनीच्या ताब्यात राहतील. मुदत संपताच ते घोडे व ती गाडी आमच्या खात्याला म्हणजे कामगार व शेतकी देखरेख खात्याला दिली जाईल. ठरलेल्या मुदतीच्या बाहेर जर ते वापरले तर प्रत्येक घोड्यामागे दहा पौंड जास्त धान्य द्यावे लागेल. हा करारनामा कॉलनीकडून नीट पाळला न गेल्यास त्यांना घोड्यांच्या किंमतीच्या पाचपट दंड भरावा लागेल' वगैरे...

दुसऱ्या दिवशी कालिनासाहेब व आन्तोन मोठ्या दिमाखाने कॉलनीत परत आले. आमची छोटी मंडळी मोठ्या उत्सुकतेने सकाळपासून दरवाजावर बसून होती. आम्ही सारेजणच अगदी ताटकळत बसलो होतो. शेलापुतीन व तोस्का यांनी प्रथम ही मिरवणूक पाहिली. ते लगेच त्या घोड्यांवर बसले सुद्धा. कालिनासाहेब अगदी भारावून गेले होते. त्यांना जणू हसायला किंवा बोलायलाही येत नव्हते. ब्राटचिन्कोने मात्र या नव्या घोड्यांचे फारसे कौतुक किंवा अगत्य दाखविले नाही. त्याच्या दृष्टीने आम्ही शहरातून आणलेल्या या तीन घोड्यांशिवाय जगातील सगळी जनावरे तुच्छच होती. कालिनासाहेब गाडीतून उतरले व अंगावर पडलेला धुरळा झटकीत ब्राटचिन्कोला त्या नव्या घोड्यांची देखरेख करायला त्यांनी सांगितले, 'ही अस्सली जनावरं आहेत. साधीसुधी नाहीत हं!'

ब्राटचिन्कोने आपले लाडके जुने घोडे लांब नेऊन ठेवले. नव्या घोड्यांसाठी कालिनाला चांगले खोगीर आणायला सांगितले. एकीकडे आपल्या हाताखालच्या पोरांना तो हुकूम सोडीत होता. मध्येच कालिनासाहेबांना तो म्हणाला, 'इतके दिवस ठीक होते, पण आता या घोड्यांना चांगले खोगीर घेऊन या; कारण हे असली जनावर आहे.'

हे घोडे अगदी काळेभोर, उंचनीच व अंगापिंडाने भरलेले होते. त्यांची नावेही मोठी आकर्षक होती— लायन, फाल्कन व मेरी मुलांना ती फारच आवडली.

लायन काही तेवढा चांगला नव्हता. तो नुसता दिसायलाच चांगला होता. तो लगेच दमत असे. शेतीकामाला त्याचा फारसा उपयोग होत नव्हता. फाल्कन व मेरी हे दोघे मात्र चांगले होते. ते खरोखरच भरपूर काम देत असत. या घोड्यांना गाडीला जुंपून आजुबाजूच्या लोकांचे डोळे दिपवावे अशी ब्राटचिन्कोची फार इच्छा होती; पण ते जमणे शक्यच नव्हते. कारण नांगरणीचेच काम त्यांना दिवसभर पुरत असे.

कालिनासाहेब दररोज संध्याकाळी जमिनीच्या नांगरणीचा व पेरणीचा अहवाल देत असत; परंतु त्यांना एका गोष्टीचे वैषम्य वाटे. ते म्हणत, 'हे एवढे चांगले घोडे त्या कामगार व शेतकरी नियंत्रण खात्याच्या मालकीचे असावेत व काहीही तक्रार त्यांच्या-

विरुद्ध करता येऊ नये, हे फारच वाईट. हे लोक काहीही आरोप करायला कमी करणार नाहीत. पुन्हा तक्रारींची दाद कोण घेणार ?'

शेवटी एकदाचे नव्या कॉलनीचे उद्घाटन झाले. एक घर दुरुस्त केले होते. त्यात सहा मुलांना रहायला पाठवले. तिथे त्यांच्यावर देखरेख ठेवायला किंवा त्यांचे जेवण बनवायला कोणीही ठेवले नव्हते. भांडारातून वस्तू नेऊन त्यांचे तेच बनवीत. त्यांना कामेही वाटून दिली होती. मळयाची व इमारतीची दुरुस्ती करायची, तसेच तलावातून ये-जा करणाऱ्या होड्यांवर देखरेख करायची. घोड्यांची पागा सांभाळायची. घोडे दोन ठेवले होते व आफ्रिस्को त्यांचे दाणा-पाणी, खरारा वगैरे बघत होता. ब्राटचिन्को जुन्या कॉलनीतच राहिला होता. कारण त्याला तिथे जास्त करमायचे; पण दररोज तो नव्या कॉलनीत फिरून सारे ठीकठाक बघून येई. आफ्रिस्कोलाच नव्हे, तर साऱ्याच जणांना त्याच्या त्या भेटीचा व टेहेळणीचा धाक वाटत असे.

नव्या कॉलनीत पेरणीचे काम मात्र जोरात चालू होते. साठ एकर म्हणजे काय थोडीथोडकी जमीन नव्हती. आम्ही त्यात गहू, जव वगैरे लावले होतेच. शिवाय थोड्या भागात बटाटे व बीट लावले होते. अर्थात शेतकी विषयाचे आम्हाला कोणालाच ज्ञान नव्हते. त्यामुळे कुठल्याही तऱ्हेने आखणी करून वगैरे आम्ही काही केले नव्हते. आम्हाला हेच सारे करता करता नाकी नऊ यायचे. तरी बरे, आमच्या कॉलनीत चांगली साठ मुले होती.

कोलोमाकवरून रात्रंदिवस सारखी ये-जा चालू असे. मुले तिकडे कामाला जात व परत येत. तसेच आमच्या गाड्याही सारख्या ये-जा करीत. बाहेरच्या गाड्या इमारतीचे व बांधकामाचे सामान घेऊन कॉलनीत येत. कालिनासाहेबांनी एक छोटासा छकडा कुठून तरी मिळवला होता व ते त्यातून ये-जा करीत. ब्राटचिन्को मात्र लायन-वर बसून नव्या कॉलनीत फेरफटका करीत असे

रविवारच्या दिवशी कॉलनीतले झाडून सारे लोक–शिक्षक-शिक्षिका वगैरे–कोलोमाक नदीवर आंघोळीसाठी जमत. शेजारच्या गोन्च्यारोवका व पिरागोवका गावचे लोकही त्या छोट्या नदीवर येत. विशेष म्हणजे या दोन्ही गावांतली सुखवस्तू, सधन शेतकऱ्यांची मुलेही थोडी थोडी आमच्या मुलांबरोबर मिसळायला लागली होती. नदीच्या दुसऱ्या तीरावर आमच्या मुलांनी एक लाकडी धक्का तयार केला होता व त्यावर आम्ही एक बावटा रोवला. त्या बावटयावर 'जी. सी.' (गॉर्की कॉलनी) अशी अक्षरे काढली होती. छोटा बावटा लावलेली हिरव्या रंगाची एक छोटी होडी दिवसभर नदीवर येरझारा घालीत असे. मित्का झेलची व वित्का बॅगोयावेलेन्स्की हे दोघे होडी चालवीत. आमच्या कॉलनीतल्या कल्पक मुलींनी इकडचे तिकडचे कापडाचे तुकडे जमवून त्यांना खलाशांसारखे कपडे शिवून दिले होते. उद्देश हा की, कोलोमाकवर गॉर्की कॉलनीचे प्रभुत्व आहे, हे सिद्ध व्हावे. आसपासच्या लोकांना आमच्या कॉलनीतल्या मुलां-विषयी थोडी असूया वाटे. कोलोमाकच्या परिसराला या सगळ्यामुळे जणू एखाद्या क्लबचेच स्वरूप आले होते. खुद्द कॉलनीत खरोखर चांगले चैतन्य वाटत असे. आजूबाजूच्या गावांतले लोक दुरुस्तीसाठी गाड्या आणीत. कालिनासाहेब सारखे कोणावर तरी गुरगुरत रहात. ब्राटचिन्कोची सतत कुरबूर चालू असे. त्याच्या जोडीला काराबानोव, झादारोव व वेलुखिन यांचे खळाळून मोकळे हसणे, पाईन वृक्षांच्या राईत वाऱ्याचे संगीत, सारोका व गलातेन्को यांच्या दुःखद आठवणी या साऱ्यांची सरमिसळ झाली होती.

आता आमच्याकडे बरीच स्वच्छता झाली होती. मच्छर-माशा, उवा या साऱ्यांचा आम्ही नायनाट केला होता. कॉलनी खूपच साफ-सूफ दिसे. दुमानीपासून ते भिंतींपर्यंत जिथे जिथे म्हणून दुरुस्तीची जरुरी होती ती जोड लावून नीटनेटकी करण्याचा प्रयत्न केला गेला होता. डॉरमिटरीतून त्याच जुन्या कॅपकॉट्स होत्या; पण आता त्यांचा उपयोग फक्त झोपण्यासाठी करीत होतो. त्यावर कोणीही बसायचे नाही, असा कडक नियम केला होता. बसण्यासाठी लाकडाची बाके बनविली होती. जेवणघरातही लाकडाची बाके व टेबले बनविली होती. आमच्याच छोट्या कारखान्यात बनविलेल्या सुऱ्यांनी ती रोज खरडली जात.

आणखीही काही सुधारणा केल्या होत्या. कालिनासाहेबांनी सुचविलेल्या गोष्टी पार पाडल्या होत्या. आमचा जुना लोहार-मित्र गॅलोवन याला आम्ही त्याच्या भयंकर दारू पिण्याच्या सवयीमुळे काढून टाकला होता. तो गिन्हाइकांशी पण फार वाईट तऱ्हेने वागे. त्याने जाताना आपली अवजारे मागितली नाहीत. ती मिळणार नाहीत याबद्दल त्याला खात्री असावी. त्याने जाताना जळजळीत उद्गार काढले ते असे :

'शेवटी सारे मालक इथून तिथून सारखेच. कारागिरांना लुबाडणं हे जणू काही तुमचं ध्येयच !'

आमच्या वेलुखिनने त्यावर न रागावता समर्पक उत्तर दिले, 'अरे, असं कसं म्हणतोस मित्रा ? तू एका वर्षापेक्षा जास्त दिवस आमच्याकडे काम केलंस व अजूनही तुला कसं समजत नाही ?'

'तेच तर मी म्हणतोय !' गॅलोवन म्हणाला.

'ही सारी उत्पादनाची साधनं आहेत व त्याची मालकी मार्क्सिस्ट तत्त्वज्ञानाप्रमाणे कष्ट करणाऱ्या कामगारांकडे असते. अशी माणसं कोण आहेत माहीत आहे का ? झादारोव, वेर्शनेव व कुझमा लेशी हे त्यांचे खरेखुरे मालक आहेत !' असे म्हणून त्याने अभिमानाने सर्वांकडे बोट दाखविले. त्यानंतर गॅलोवन निघून गेला.

आता लोहारखात्याचा प्रमुख म्हणून सेमियान बगदानेन्कोची नेमणूक केली. त्याचे घराणेच लोहारकाम करणारे रेल्वे वर्कशॉप-मध्ये त्याचे बाप-दादा काम करीत असत. सेमियानने खात्यात कडक शिस्त लावली होती. सारे काही स्वच्छ असे. त्यांची अवजारे चांगली मांडून ठेवलेली असत. जमिनीवर जराही कचरा सापडायचा नाही. एखाद्या गृहिणीप्रमाणे सारे सामान जागच्या जागी व्यवस्थित ठेवलेले असे, शिवाय गिन्हाइकाशी तो सौजन्याने वागे.

'अहो, इथे घासाघीस करायला हे काही चर्च नाही,' असे तो लोकांना सांगे. त्याला लिहिता-वाचता येई व तो बोलताना वाईट भाषा वापरीत नसे. तो स्वतः अतिशय स्वच्छ व व्यवस्थित राही.

आमच्या लोहारखात्यात तसे पुष्कळ काम होते आता आजुबाजूची बहुतेक सारी लोहारांची छोटी दुकाने बंद झाली होती; पण चाके बनवायचे काम जोरात चालत असे. कारण त्याला सतत मागणी होती. कोझीर दोन मुलांच्या मदतीने ते चालवी.

कामगार–शेतकरी अर्थखात्याला नवीन प्रकारची चाके करून

पाहिजे होती. त्यांना त्या चाकांवर रबरी धावा लावून हव्या होत्या. कोझीरने रबरी धावा बसवून चाके बनविली नव्हतीच. त्यामुळे त्याला हे सारे विचित्र वाटले रोज संध्याकाळी रबरी धावांची चाके कशी बनवायची याबद्दल तो चर्चा करीत बसे. 'अहो, रबरी धावा कधी ऐकल्या होत्या कोणी ? बिचारा ख्रिस्त आणि त्याचे शिष्य तर पायीपायीच जात आता लोकांना लोखंडी धावा असलेल्या चाकांच्या गाड्या नकोशा झाल्या आहेत.'

कालिनासाहेब त्याच्यावर गरम होत असत, 'तुझी तरी कमाल आहे बाबा. आगगाड्या आणि मोटारी पाहिल्या आहेस का कधी ? तुझा येशू ख्रिस्त गेला असेल पायी, त्याला अडाण्याला ही सुधारणा माहीत नसेल, किंवा असेल तो असाच कोणी लफंगा. त्याला कोणी गाडीत बस म्हटले असते तर तो नक्कीच चालत गेला नसता. तुझ्यासारख्याला हे मूर्खासारखे बोलणे शोभत नाही '

कोझीर बिचारा कालिनासाहेबांच्या व्याख्यानाने शरमिंदा होई. स्वत:शीच तो पुटपुटे– 'देवाच्या दयेने मला रबरी धावेचे एक चाक तरी पहायला मिळेल का ? मिळाले तर फार बरे होईल. त्याला आस किती असतात ते तरी कळेल.'

'अरे, पण तू त्या कामगार–शेतकरी देखरेख खात्यात स्वत: जाऊन पाहून ये. जा.'

'काय साहेब, मी एवढा म्हातारा माणूस कुठं जाऊ तिथं ?'

जुलै महिन्यात चरनेन्कोच्या मनात आमच्या मुलांना काही कार्यक्रम दाखवून करमणूक करायची इच्छा झाली. ते म्हणाले, 'आपल्याकडे थिएटरमध्ये चांगल्या नर्तकी आल्या आहेत. त्या छान कार्यक्रम करतील. एखाद्या संध्याकाळी त्यांचा कार्यक्रम ठेवा. आपल्या मुलांची करमणूकही होईल.'

'तसं झालं तर फारच छान होईल ' मी म्हटले.

'एक गोष्ट लक्षात ठेवा. त्यांना नीट वागणूक द्या हो. नाही तर तुमची ही उनाड कार्टी त्यांना घाबरवून सोडतील. त्यांना आणायची काय व्यवस्था कराल ?'

'आमची बग्गी पाठवून देऊ त्यांना आणायला.'

'कसली तुमची बग्गी ? ती नाही चालणार. असे करा. तुमचे घोडे पाठवा आणि आमच्या गाडीतून त्या येतील. रस्त्यावर एखादा गार्ड ठेवा हं. कारण त्यांना कोणीही पळवील. त्या फारच छान आहेत !'

अखेर एक दिवस त्या नर्तकी येऊन थडकल्या. त्या नुसत्या भीतीने चुरमार झाल्या होत्या. ब्राटचिन्को त्यांना सारखा धीर देत होता, 'घाबरता कशाला ? तुमच्याजवळ चोरण्यासारखं काही नाही. थंडीचे दिवस असते तर तुमचे कोट कदाचित कोणी चोरले असते.'

भरीत भर म्हणजे आमच्या गार्डने झाडीतून एकाएकी डोकावून पाहिले आणि त्या बाया मूर्च्छितच झाल्या. कॉलनीत आल्याबरोबर प्रथम त्यांना औषध द्यावे लागले.

कार्यक्रम कसा तरी झाला; पण त्यांचे नृत्य अगदीच सुमार झाले. आमच्या पोरांना तर बिलकुल आवडले नाही. त्यातली एक जरा अगदी तरुण होती. तिने तर दिवसभर कॉलनीत आपल्या उघड्या पाठीचे प्रदर्शन केले व साऱ्यांशी फटकून वागली. दुसरी जरा मोठी होती. ती आमच्याकडे सारखी भेदरलेल्या नजरेने बघायची. ब्राटचिन्कोला त्याची फार चीड आली. तो सर्वांना उद्देशून म्हणाला, 'घोड्यांना उगाचच इकडून तिकडे दोन वेळा दौडवलं. असली हजार पात्रं मी शहरातून आणली असती !'

'अरे, पण तुझी ती पात्रं नाचू शकली नसती.' झादारोव म्हणाला.

'अरे जा रे, कोण म्हणतं असं ?'

एकातेरीना पियानो वाजवायला बसली होती. तो पियानो आमच्या डॉरमिटरीत तसाच धूळ खात पडून होता. तिला तशी वाजवायची फारशी सवय नव्हती व बॅले संगीत वाजवायची तर सवय नव्हतीच. त्या बायांना जरा चूक सुधारून घ्यायची अक्कल नव्हती. शिवाय त्यांना दुसऱ्या कोठल्या कार्यक्रमाला जायची पण फार घाई झाली होती. कसाबसा एकदाचा कार्यक्रम संपला.

रात्री कार्यक्रम संपल्यावर गाडी जुंपण्याचे काम चालू होते. ब्राटचिन्कोची कुरबुर सारखी चालूच होती. त्या बायांना आपण वेळेवर पोचणार नाही याची खात्री होती. त्यामुळे त्या अगदी हिरमुसल्या झाल्या होत्या. त्यांना आमच्या कॉलनीबद्दल नक्कीच तिटकारा वाटला असेल. त्यांचे कौतुक न करणारी आमची मुले, तसेच हे अनोखे वातावरण यामुळे त्या अगदी बुजून गेल्या होत्या व अगदी रडकुंडीला आल्या होत्या. त्यातच सारोका गाडीवानाच्या जागी बसून राहिला होता व 'आपण गाडी चालवणार नाही,' असे मधूनमधून बडबडत होता.

त्यावरून ब्राटचिन्को चिडला व बाहेरचे पाहुणे आहेत, त्यांच्यादेखत बोलू नये याचे भानही त्याला राहिले नाही. तो सारोकावर खेकसला, 'तुला काय वाटतं ? तू ड्रायव्हर आहेस का नर्तकी आहेस ? जाणार नाही म्हणजे काय ? चल मुकाट्यानं !'

शेवटी एकदाचा सारोका निघाला. घोड्यांचा लगाम खेचला गेला व गाडी हालली. त्या नर्तकींना हायसे वाटले. सारोकाच्या खांद्यावरची बंदूक पाहून त्या घाबरल्या. गाडी हालली, पण पुन्हा थांबली. ब्राटचिन्को परत ओरडला, 'थांब जरा, अरे काय गाडी जुंपलीय. अनेकदा सांगितलं असेल तुला की, फाल्कन नेहमी आपल्या उजव्या बाजूला व रेड डाव्या बाजूला ठेव म्हणून. परत नीट जुंप त्यांना !'

सारोकाने सावकाशपणे बंदूक काढून ती त्या नर्तकींच्या पायाजवळ ठेवली. मुळमुळू रडण्याचा बारीक आवाज ऐकू येऊ लागला.

माझ्यामागे काराबानोव उभा होता. तो म्हणाला, 'झालं का यांचं रडणं सुरू ? मला वाटलं होतं की, कदाचित् त्या आमच्यासमोर रडणार नाहीत; पण आमच्या पोरांनी तेही त्यांना करायला लावलं.'

आणखी पाच मिनिटांनी गाडी पुन्हा सुरू झाली. आम्ही आमचे हात वर करून सैनिकी पद्धतीने त्यांना निरोप दिला. प्रतिसाद मिळणार नाही याबद्दल आमची खात्री होती. त्या खडबडीत रस्त्यावर रबरी धावा असूनसुद्धा गाडीला हिसके बसत होते. गाडी वेग घेणार इतक्यात, 'थांबा, कृपा करून थांबा !' असं ओरडत आमच्या मागून कोणी तरी धावत आला. सारोकाने लगाम खेचला. त्या धक्क्यामुळे एक नर्तकी सीटवरून खाली घसरली. 'मी अजिबात विसरलो हो ! कृपा करून मला त्या चाकांचे आस मोजू द्या !'

ही व्यक्ती म्हणजे दुसरी तिसरी कोणी नसून आमचा कोझीरच

होता. तो खाली वाकून चाके तपासू लागला. गाडीतून रडण्याचा आवाज आता मोठ्याने येऊ लागला होता.

'कोझीरवाबा, तुमची धन्य आहे. आता बाजूला व्हा!' असे म्हणून काराबानोवने कोझीरला बाजूला व्हायला सांगितले. आता मात्र हद्द झाली. मी शेवटी रागाने सारोकाला 'गाडी सुरू कर,' म्हणून हुकूम केला व सारोकाने फाल्कनवर चाबूक हाणला. गाडी एकदाची चालू झाली. मुलांनी मोठ्याने हसायला सुरुवात केली. काराबानोवला तर हसता हसता दम लागला. ब्राटचिन्कोसुद्धा मनापासून हसला.

'त्यांना रस्त्यावर दरोडेखोरांनी थांबवावं, म्हणजे आणखी गंमत येईल. मग त्यांचा कार्यक्रम तिथंच संपेल!'

कोझीर तिथे उभा राहून पाहात होता. त्याला मुलांच्या हसण्याचे कारण समजेना व चाकांचा आस का मोजू दिला नाही तेही समजेना!

या साऱ्या गडबडीत सहा आठवडे केव्हा संपले ते कळलेच नाही. तो पुरवठाअधिकारी बोलल्याप्रमाणे येऊन थडकला.

त्याने घोड्यांची विचारपूस केली. 'काय, आमचे घोडे कसे काय आहेत?'

'ते सारे जिवंत आहेत!'

'ते परत कधी करता?' असे विचारताच ब्राटचिन्कोचा चेहरा एकदम उतरला. तो म्हणाला,

'त्यांना परत पाठवा म्हणता? त्यांना परत पाठविलं तर इथं काम कोण करील?'

'महाशय, आपण तसं कंत्राट केलं आहे म्हटलं आणि गहू केव्हा देता आम्हाला?'

'गहू अजून शेतातच उभा आहे. अजून कापणी-मळणी सगळंच व्हायचंय!'

'त्या चाकांचं काय झालं?'

'कसली घेऊन बसलात चाकं?' अहो, आमच्या लोहाराला किती आस लागतात व किती अंतरावर ते बसवायचे तेच अजून कळलं नाही!'

पुरवठाअधिकारी स्वतःला फार मोठे समजत होते. 'कंत्राटाप्रमाणे आजपासून रोज १० पौंड गहू तुम्ही शिक्षा म्हणून द्यायला हवेत,' असे दिमाखाने सांगून ते निघून गेले.

त्यांची गाडी गेल्याच्या दिशेकडे पाहत ब्राटचिन्को रागाने म्हणाला, 'हलकट आहे नुसता!'

या कंत्राटाच्या भानगडींमुळं आम्ही अगदी त्रासून गेलो. आम्हाला घोडे तर हवे होतेच; पण त्या बदल्यात सारे पीक त्यांना द्यायला कसे जमणार होते?

कालिनासाहेब नेहमीप्रमाणे गुरगुरत होते, 'या चोरांना मी बिलकूल गहू देणार नाही! म्हणे महिन्याला १५ मण. आता प्रत्येक दिवशी १० पौंड याप्रमाणे मागणी करायला यांच्या बापाचं काय जातं? या चोरांना एक दाणाही मी देणार नाही! त्यांना कागदावर आकडेमोड करणं सोपं असतं; पण प्रत्यक्षात इथं येऊन बघा म्हणावं. यांना घोडेही द्या आणि धान्यही द्या! काहीही मिळणार नाही! त्यांना म्हणावं कुठूनही मिळवा; पण आमच्या उत्पन्नातला एक दाणाही मिळणार नाही!'

पोरेही त्या कंत्राटाबद्दल चिडली होती, 'पीक उभं वाळलं तरी चालेल; पण यांना काहीएक द्यायचं नाही. पाहिजे तर त्यांना कापणी व मळणी करू दे!'

ब्राटचिन्कोने या प्रश्नांची मिळवणी खालीलप्रमाणे केली, 'घोडे मिळणार नाहीत. त्यांना गहू, राय, बटाटे सारं पाहिजे तरी घेऊन जाऊ दे!'

जुलै महिना उजाडला. पोरे शेतातले तण उपटीत होती. कालिनासाहेबांची कुरबूर चालू झाली.

'या मुलांना अजून गवत नीट उपटता येत नाही. अजून केवढं तरी काम राहिलंय. राय आपण सात एकरांत, गहू आठ एकरांत पेरलाय. शिवाय मका व ओट ही पण तयार व्हायची आहेत. आपल्याला एक यंत्र हवंच!'

'ते कसं शक्य आहे, कालिनासाहेब? पैसे कोठून आणायचे?'

'तेही खरंच आहे. पूर्वी हार्वेस्टर दोन ते अडीचशे रुपयांना मिळे!'

'ठीक आहे. हार्वेस्टर नको. रीपर आणा!'

संध्याकाळी त्यांनी एक कणीस चोळून दाणे आणले. 'आता मात्र आपल्याला दोन दिवसांच्या आत कापणी संपवायलाच हवी. आता थांबून चालणार नाही!'

या वेळेला नव्या पिकाच्या स्वागताचा समारंभ आपण अवश्य करायचा असे आम्ही ठरवले. अनेक लोकांना आम्ही आमंत्रणे पाठविली. पटांगणात पाना-फुलांच्या माळा लावण्यात आल्या.पताका व कमानी उभारण्यात आल्या; पण कालिनासाहेबांची भुणभुण चालूच होती, 'आपण डोळ्यांदेखत पिकाचा नाश करणार. आपण पाखरांची धन करणार!'

धार लावायचे काम जोरात चालू ठेवले होते व कालिनासाहेबांची ते समजूतही काढीत होते, 'नाही साहेब, आपण आपल्या जुन्या पद्धतीनं अगदी चांगलं करू, समजलं? हे मुश्किल करतात त्यापेक्षाही जास्त चांगल्या तऱ्हेनं करू शकू. आपल्या खुरप्यांना आठ मुलांनी या कामगिरीवर नेमणूक केली होती.

समारंभाच्या दिवशी पहाटे ब्राटचिन्कोने मला भलतेच लवकर उठवले. 'आन्तोन, एक म्हातारा कापणीचं यंत्र घेऊन आलाय आणि तो विचारतोय की, तुम्ही ते विकत घेता का?'

'त्याला जायला सांग. अरे, पैसे कुठले आणायचे? आपली परिस्थिती तुला माहीत नाही का? आपण कसंबसं भागवतो!'

'नाही आन्तोन, तो म्हणतो, काही तरी बदलोला द्यावं. ते यंत्र घ्या व त्याला त्याच्या बदल्यात घोडा हवाय!'

मी कपडे करून खाली गेलो. खरोखरच तिथे कापणीचे यंत्र पटांगणात ठेवलेले दिसले. नुकताच रंग वगैरे लावलेला असावा. सारी मुले त्याच्याभोवती गोळा झाली होती. कालिनासाहेब आळीपाळीने जरा रागीट दृष्टीने माझ्याकडे, त्या यंत्राकडे व त्याच्या मालकाकडे पहात होते.

'ह्याला कोणी बोलावलं इथं? हा काय आपली गंमत करायला आलाय?'

यंत्राचा मालक चांगला भला माणूस दिसला. त्याने छानपैकी

दाढी ठेवली होती. घोड्यांना सोडून तो माझ्याकडे आला.

'काय हो महाशय, तुम्ही हे का विकत आहात ?'

'मला माझ्या पोराचं लग्न करायचंय. माझ्याकडे दोन यंत्रं आहेत. मला एक ठेवणार व हे दुसरं विकणार! माझ्या मुलाला मला लग्नात घोडा द्यायचाय!'

काराबानोव माझ्यामागे उभा होता. तो माझ्या कानात कुजबुजला, 'आन्तोन, हा खोटं बोलतोय. मी याला ओळखतो!'

त्याने म्हाताऱ्याला विचारले, 'तुम्ही स्तारात्स्वेवोये गावातले आहात का ?'

'अगदी बरोबर आणि तू रे कोण ? पानासचा मुलगा सेमियान काराबानोव तर नव्हे ?'

'अर्थातच. तोच मी! म्हणजे तुम्ही आमेलचेन्को खरं ना ?तुमच्या दोन यंत्रांपैकी एक सरकार ताब्यात घेईल अशी भीती वाटते तुम्हाला, होय की नाही ?'

'थोडंसं ते खरं आहे; पण मला खरोखर माझ्या मुलाचं लग्न करायचंय. त्याला एक घोडा द्यायचाय!'

'मला वाटल, तुमचा मुलगा दरोडेखोरांच्या टोळीत आहे!'

'नाही रे बाबा, तसं नाही हं. भलतंसलतं बोलू नकोस!'

सेमियानने वाटाघाटीचे काम आपल्या अंगावर घेतले. बराच वेळ ते दोघे कुजबुजत राहिले. मधूनच एकमेकांच्या पाठीवर थापा मारीत होते. सेमियान अगदी कसलेल्या मुरब्बी शेतकऱ्याप्रमाणे दिसत होता व त्या म्हाताऱ्यालाही सेमियानच्या हुषारीबद्दल आदर वाटत असलेला दिसला.

अर्ध्या तासानंतर मी, ब्राटचिन्को, बुरुन, झादारोव व कालिनासाहेब आपापसात चर्चा करीत होतो. बाकीची मुले कौतुकाने त्या यंत्राकडे पहात होती. जणू काही अशी यंत्रे व ती वाळगणारे लोकही असतात याचे त्यांना आश्चर्यच वाटत असावे.

सेमियानने थोडक्यात म्हाताऱ्याची बाजू सांगितली. 'त्याच्या स्तारात्स्वेवोये गावाला शेतकऱ्यांच्या सामानाची झडती व्हावयाची आहे व कदाचित हे यंत्र—बदल्यात काही न देता—तो गमावून बसेल. त्याला लग्न करायचंय व घोडा घेतला तर तो काही जप्त होणार नाही!'

'खरं-खोटं त्यात्रं तो जाणे. आपल्याला काय करायचंय ? पण हे यंत्र आपण घालवता कामा नये. आजच आपण त्याचं उद्‌घाटन करू या!' झादारोवने जाहीर केले.

'अरे, पण कुठला घोडा द्यायचा ? लॅडी व बॅंडिट कुचकामी आहेत!'

'रेड देऊन टाकू!' असे काराबानोवचे म्हणणे पडले.

झादारोव म्हणाला, 'चला, रेड देऊन टाकू. त्याच्या बदल्यात एवढं यंत्र मिळतंय!'

त्याबरोबर ब्राटचिन्को चिडला, 'रेडला का म्हणून द्यायचं ?'

काराबानोव मध्ये पडला व म्हणाला, 'भलतंच, रेडला कसं द्यायचं बाबा ? तोच एक चांगला घोडा आहे. आपण लायन देऊ. तो दिसायला चांगला आहे व दौड करायला पण चांगला आहे.'

सेमियानने संमतीदाखल कालिनासाहेबांकडे पाहिले. कालिना तावातावाने उठत म्हणाला,

'मला असल्या उठाठेवी करायला वेळ नाही!' असे म्हणून तो आपल्या खोलीकडे गेला.

कालिनाच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून सेमियानने डोळे मिचकावले. तो म्हणाला, 'आन्तोन, नाही म्हणू नका. सारं काही ठीक होईल; पण हे यंत्र घ्याच! पैसे कसेही करून आपण फेडू शकू!'

'अरे, ते घोड्याचे मालक आपल्याला तुरुंगात टाकतील!'

'तुम्हाला काय म्हणून तुरुंगात टाकतील ? शेवटी हे यंत्र घोड्यांपेक्षा जास्त उपयोगी आहे. त्यातूनही घोड्यांऐवजी ते यंत्र नेतील. त्यांचा तोटा होणार नाही. आपण आपलं कापणीमळणीचं काम करून घेऊ. नाही तरी तो लायन चांगला नाहीचं आहे.'

मुलांनी माझ्याकडे जळजळीत नजरेने पाहिले.

यावर झादारोव सहेतुक हसला, 'खरंच छान कल्पना आहे.' बुरुन काहीच बोलला नाही. तो नुसताच हातात रायचा तण धरून एकीकडे चघळत हसत होता.

ब्राटचिन्को मात्र खुष झाला. त्याचे डोळे आनंदाने चकाकले, 'खरंच, त्या कामगार–किसान देखरेखखात्याला आपण घोड्यांऐवजी त्यांच्या गाडीला जुंपायला एक यंत्र देणार. खरा विनोद हं!'

सारी मुले माझ्याकडे आशेने पहात होती.

'असंच करा आन्तोन, तुम्हाला फार तर तुरुंगात टाकतील; पण फार नाही— एखादा आठवडाच!'

आता मात्र बुरुन गंभीरपणे म्हणाला, 'काही झालं तरी तो घोडा आपल्याला द्यायलाच हवा. आपण जर ही अदलाबदल केली नाही तर सारेजण आपल्याला मूर्खात काढतील. ते कामगार–किसान देखरेखखात्याचे लोक पण!'

मी बुरुनकडे वळून घोडा आणून द्यायला सांगितले. ब्राटचिन्को व बाकी सारे पागेकडे धावले. यंत्राचा मालक घोडा पाहून खुष झाला. कालिना मला म्हणाले, 'तुमचं काय डोकं फिरलंय ? आयुष्याचा कंटाळा आलाय ? ते पीक आणि कॉलनी खड्डयात जाऊ दे! तुम्ही आपली मान फुकट अडकवून घेतली.'

'अरे, जाऊ दे कालिना. आपल्याला कापणी–मळणीला यंत्र मिळालं. पुढचं पुढं पाहू.'

एका तासाने तो यंत्राचा मालक लायन घोड्याला घेऊन निघून गेला. त्यानंतर दोन तासांनी चेरनेन्कोसाहेब आमच्या ठरलेल्या समारंभासाठी हजर झाले त्यांनी ते यंत्र पाहिले व म्हणाले, 'अरे वा! हे कुठून पैदा केलेत तुम्ही लोकांनी ?'

सगळी मुले गप्प झाली. मी पण चाचरतच चेरनेन्कोला म्हटले, 'असंच मिळालं.'

ब्राटचिन्कोने टाळ्या वाजवून थोड्याशा उड्या मारल्या. तो पुढे येऊन चेरनेन्कोना म्हणाला, 'कसं का असेना. आज आम्हाला ते मिळालंय खरं. तुम्हीच त्याचं उद्‌घाटन करा बरं!'

'मी करू म्हणता ? ठीक आहे. जुन्या आठवणी परत ताज्या होतील.'

मुले चेरनेन्कोबरोबर यंत्राची साफसफाई वगैरे करीत राहिली. या सगळ्या क्रिया झाल्यावर चेरनेन्को त्यावर चढला व त्याने ते चालू केले. काराबानोव आनंदाने टाळ्या पिटीत म्हणाला,

'यंत्राचा खरा मालक चालवतोय'

इतक्यात कामगार–किसानखात्याचा तो पुरवठाअधिकारी आला. तो लायन घोड्याची चौकशी करीत सगळीकडे फिरला. ‘लायन कुठं दिसत नाही ?’

ब्राटचिन्कोने त्याला नव्या कॉलनीच्या दिशेने बोट दाखवले, ‘चांगला सुखरूप आहे. उद्यापासून आम्ही तिकडे कापणीला सुरुवात करणार आहोत. म्हणून त्याला आम्ही विश्रांती द्यायचं ठरवलंय.’

मुलांनी चेरनेन्कोला अगदी जेवणाच्या टेबलाच्या मुख्य पाहुण्याच्या जागी बसवले. त्याच्यापुढे सारे खाद्यपदार्थ ठेवले व त्याला बोलण्यात गुंतवून ठेवले.

‘तुम्ही कापणीयंत्र घेतलंत हे बरं झालं एका अर्थी !’

‘बरोबर केलं ना आम्ही ?’ मुलांनी विचारले. ‘आम्ही बरोबर केलं याच्याशी तुम्ही सहमत आहात तर !’

‘अगदी बरोबर.’

‘बरं. आता सांगा की घोडा चांगला की कापणीयंत्र चांगलं ?’ ब्राटचिन्कोने डोळे मिचकावीत विचारलं.

‘ते गरजेप्रमाणे ठरवावं लागेल– दुसरं असं की, कुठचा घोडा चांगला ? समजा, आमच्या लायनसारखा तो असला तर ?’

तो पुरवठाअधिकारी, चेरनेन्को व ब्राटचिन्कोचे बोलणे कान देऊन ऐकत राहिला. इतक्यात काराबानोव मोठ्याने हसला. त्याला हसू आवरेना म्हणून त्याने टेबलाखाली तोंड लपविले. सारेजणच हसू लागले. पुरवठाअधिकारी कावरेबावरे होऊन बघू लागले चेरनेन्कोला या साऱ्याचा अर्थ समजेना.

‘लायनचं काही झालं का ?’ त्यांनी विचारले

मी शक्यतो गंभीरपणे सांगितले, ‘आजच– आता आम्ही लायनला देऊन त्या बदल्यात हे यंत्र घेतलं.’

पुरवठाअधिकारी खुर्चीत कोलमडला. चेरनेन्को ‘आ’ वासून माझ्याकडे बघतच राहिला. पुरवठाअधिकाऱ्याकडे वळून तो म्हणाला, ‘वा ! कापणीयंत्राच्या बदल्यात घोडा दिला !’

तो पुरवठा अधिकारी परत आपल्या खुर्चीतून उठला व गरजला, ‘ही म्हणजे चक्क फसवणूक झाली. याला गुंडगिरी व खोडसाळपणा म्हणतात !’

एवढ्यात चेरनेन्को मजेदारपणाने हसला व म्हणाला, ‘अरे चोरांनो, तुम्ही खरोखरच का असं केलंत आणि आम्ही हे कापणीयंत्र घेऊन काय करणार रे ?’

‘आपल्याजवळ आपलं कंत्राट तर आहेच. पाचपट नुकसानभरपाई घेऊ !’ पुरवठाअधिकारी संतापून म्हणाला.

त्यावर चेरनेन्को म्हणाला, ‘तुम्ही तसं काहीही करू शकत नाही हं !’

‘काही करायचं नाही म्हणजे काय ?’

‘होय. मी सांगतो म्हणून करायचं नाही आणि जास्त काही बोलू नकोस. अरे, त्यांना कापणी करायचीय. त्यांचं धान्य हे तुमच्या पाच पट शिक्षेपेक्षा जास्त महत्त्वाचं आहे. सगळ्यात कौतुकाची गोष्ट म्हणजे असं करताना त्यांना तुझी किंवा माझी जराही भीती वाटली नाही. ह्यांनी केलं ते योग्य केलं असा त्यांना भरपूर विश्वास आहे. आता हे यंत्र आपण त्यांना समारंभानं बहाल करू.’

या सगळ्यामुळे आनंदित होऊन पोरांनी चेरनेन्कोला उचलून एक-दोन वेळा हवेत उडवले. शेवटी तो एकदाचा कपडे सारखे करीत आपल्या पायांवर उभा राहिला.

ब्राटचिन्को त्याच्याजवळ जाऊन हळूच म्हणाला, ‘साहेब, मेरी आणि फाल्कनचं काय ? ते आम्ही परत करायचे ?

‘अर्थातच. त्यांचा मोठा प्रश्नच आहे.’

ब्राटचिन्कोने पुरवठाअधिकाऱ्याकडे पाहिले. तेव्हा तो गुरगुरला, ‘होय, ते परत करायचेत.’

‘मी परत करणार नाही !’ असे ब्राटचिन्कोने निर्धाराने सांगितले. चेरनेन्कोने यावर रागाने बजावले, ‘आता तुमच्याकडे कापणीयंत्र आहे, तेव्हा घोडे परत केलेच पाहिजेत !’.

‘तुमचं ते कापणीयंत्र तुम्हालाच लखलाभ होवो. त्याला काय आम्ही काराबानोवला जोडायचा काय ?’ असे म्हणून ब्राटचिन्को रागारागाने टेबलाकडे वळला.

चेरनेन्को स्तंभितच झाला. तो म्हणाला,

‘काय पण विलक्षण कार्टी आहेत !’

सगळीकडेच शांतता पसरली.

चेरनेन्को पुरवठाअधिकाऱ्याकडे पहात म्हणाला, ‘आपण दोघांनी आपल्याला भलत्याच कोड्यात अडकवून घेतलंय. ते घोडे आता आपल्याला हप्तेबंदीनं ह्यांनाच विकले पाहिजेत.’

‘पाणचट कार्टी आहेत झालं. तरीही ती चांगली आहेत. तुमचा तो रागावणारा मुलगा कुठे आहे रे ?’

ब्राटचिन्को गवताच्या ढिगाऱ्याखाली पडून राहिला होता. चेरनेन्को त्याच्याजवळ जाऊन म्हणाला,

‘अरे, आम्ही ते घोडे तुला विकत दिलेत बरं का ?

‘फार महाग नाही ना पडणार ?’ असे ब्राटचिन्कोने विचारले.

‘नाही, नाही. तुम्ही सवडीनं पैसे द्या !’

‘तुम्ही तसे चांगले हुषार आहात हं !’ ब्राटचिन्को म्हणाला.

‘मलाही तसंच वाटतं.’ चेरनेन्को म्हणाला.

‘तुमच्या पुरवठाअधिकाऱ्यापेक्षा खचितच जास्त हुषार आहोत.’ ब्राटचिन्को म्हणाला.

(क्रमशः)

# क्लोरोफॉर्म

## कमालीचे एकांगी रेखाटन

डॉ. अरुण लिमये यांचं 'क्लोरोफॉर्म' हे पुस्तक एका अनन्यसाधारण पार्श्वभूमीने नटलेलं आहे. डॉक्टरी व्यवसायातील 'धंदेवाईक' जीवन यशस्वीरीत्या जगलेली एक व्यक्ती कॅन्सरसारख्या गंभीर रोगाची शिकार बनते; पण तरीदेखील, आपल्या जीवनाची संध्याकाळ समोर दिसत असतानाही गडबडून न जाता अशा स्वरूपाचं लेखन करते, हे विशेष मानायला पाहिजे.

गेल्या काही वर्षांत वैद्यकीय व्यवसाय सर्वच बाजूंनी बदलत चाललेला आहे. आपल्या व्यावसायिक प्राविण्याने पेशंट बरे होवोत न होवोत, त्याची पर्वा न करता, पेशंटच्या खिशातून कमीत कमी वेळात जास्तीत जास्त पैसे आपल्या पोतडीत कसे भरता येतील आणि दोन वर्षांत गाडी, पाच वर्षांत माडी या वेगाने आपली आर्थिक भरभराट कशी होईल याचाच ध्यास घेऊन 'धंदा' सुरू केल्यावर त्यातला 'धंदेवाईकपणा' अनिवार्य ठरतो. सरळ मार्गाने पैसा मिळण्यास पडणाऱ्या मर्यादा काही आडमार्ग चोखाळून ओलांडता येतात. एखाद्या उद्योगसमूहाच्या ताळेबंदाप्रमाणे आपली गुंतवणूक व त्यावरील नफा यांचा मेळ बसवण्यासाठी– विशेषतः नर्सिंग होम व मॅटर्निटी होम चालवणारी मंडळी– काय काय नवीन क्लृप्त्या शोधून काढतात, हाही आज एक स्वतंत्र संशोधनाचा विषय होऊ शकेल. वैद्यकीय व्यवसायातील हा बदल आता सामान्य माणसालाही जाणवू लागला आहे आणि याला आवर कसा घालता येईल, हा प्रश्न समाजातील काही सुजाण नागरिकांप्रमाणेच काही तत्त्वांचा अंगिकार करून वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांनाही आज भेडसावत आहे. अशा वेळी प्रस्तुत विषयावर प्रकाश टाकणाऱ्या कोणत्याही पुस्तकाचं, 'काही मंडळी' जरी नाराज झाली तरी, इतर समाजाकडून स्वागतच होईल, हेही उघड आहे. असं वाटत असतानाच डॉ. अरुण लिमये यांचं 'क्लोरोफॉर्म' हे पुस्तक हातात पडलं.

परंतु, हा 'व्यवसाय करताना अपघाताचे खूप रोगी मिळतात, म्हणून आपण हमरस्त्यावर नर्सिंग होम काढले,' किंवा 'रुग्णाची आर्थिक सुबत्ता कळल्यावर आपण कमी बिल केलं म्हणून मला वाईट वाटलं,' किंवा 'कन्सल्टंटचं प्रचंड बिल पाहून माझं मस्तकच खवळलं मग मी काय केलं? नर्सिंग होमच्या बिलाच्या तिप्पट बिल करून पेशंटला दिलं,' ह्या व अशा अनेक विधानांनी डॉ. लिमये यांनीदेखील अशी कबुली दिलेली आहे की, त्यांनी स्वतःदेखील एका सामान्य धंदेवाईक डॉक्टरप्रमाणेच अनेक वर्षे केवळ धंदा केला आणि तरीही दुसऱ्या बाजूला डॉक्टरसाहेब म्हणतात, 'वैद्यकीय व्यवसायातील व्यवसाय संपून त्याचा 'धंदा' बनू लागला, याची आजही मनाला फार खंत वाटते. असे घडू नये, अशी मनापासूनची इच्छा आहे.' म्हणजे, स्वतःच व्यवसायाचा 'धंदा' करायचा, धंदा केल्याचं दुःखही करायचं आणि मग पलायनवाद स्वीकारून डॉक्टरी व्यवसायच सोडून द्यायचा, हा लिमयांच्या जीवनातील आणि वर्तनातील सर्वांत मोठा 'विनोद' आहे. एक प्रकारची hypocracy त्यामागे दिसते. काही वर्षं धंदा केल्यावरही वैद्यकीय 'व्यवसाय'च करायचा होता तर लिमयांना त्यांनी समाजाला लुबाडून मिळवलेले पैसे समाजाला परत करून, कुठे तरी खेड्यात जाऊन पुन्हा उजळ माथ्याने वैद्यकीय व्यवसाय सुरू करता आला असता व त्यामुळे 'समाजपरिवर्तना'ची सुरवात त्यांच्यापासूनच झाली असती किंवा वैद्यकीय व्यवसायात राहून डॉ. प्रकाश आमट्यांप्रमाणे काही भरीव कार्य लिमयांनी केले असते तर इतरांना उपदेश करण्याचा काही नैतिक अधिकारही त्यांना प्राप्त झाला असता; पण लिमयांनी तसं केलं नाही. उलट त्यांनी डॉक्टरी व्यवसायातून पळच काढला व ते राजकारणात शिरले. साधा झोपडपट्टीतला दवाखाना चालवणंदेखील किती कठीण आहे, हे डॉक्टरसाहेब स्वतःच्या अनुभवांवरूनच कबूल करतात; परंतु त्या दवाखान्याचा उपयोग राजकीय कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी करण्याचा त्यांचा धूर्तपणा मात्र कौतुकास्पद आहे.

तसंच ही सर्व चर्चा करत असताना हेही लक्षात ठेवलंच पाहिजे की, लिमयांचा गंभीर आजार ही गेल्या दोन-तीन वर्षांमधील बाब आहे; पण 'समाजप्रबोधना'चा किडा मात्र त्यांच्या डोक्यात १९७१ सालापासूनच वळवळत होता. तेव्हा जर त्यांनी मनात आणलं असतं तर या काळात लिमये प्रामाणिकपणे व्यवसाय निश्चितच करू शकले असते.

लिमयांची राजकीय कारकीर्ददेखील त्यांच्या चळवळ्या आणि बंडखोर मनाच्या पार्श्वभूमीवरच तयार झाली आहे; पण 'युक्रांद'द्वारा त्यांनी केलेली आंदोलनेदेखील दलित पँथर किंवा 'अभाविप'सारख्या मजबूतपणे बांधलेल्या विद्यार्थी व युवक संघटनांच्या सहकार्यामुळेच यशस्वी झाली. 'युक्रांद'ला अनुयायीदेखील मोजकेच मिळाले, हे स्वतः लिमयेदेखील मान्य करतात. 'युक्रांद'ची स्थापना करताना 'आम्ही सत्तेबद्दल कोणतीही अभिलाषा न ठेवता राजकीय कार्य करणार आहोत,' अशी 'प्रतिज्ञा' करणारी युक्रांदमधील मंडळी आज आमदारपद स्वीकारत आहेत आणि निवडणुकीच्या मार्गाने समाजपरिवर्तन केवळ अशक्य आहे, हे गेल्या २७ वर्षांच्या अनुभवाने सिद्ध झाले आहे, असं म्हणणारे लिमयेच जनता पक्षाचं महाराष्ट्राचं चिटणीसपद भूषवत होते. राजकारणात जाऊन आपण समाजपरिवर्तन करू, ही लिमयांची अपेक्षाही, सध्याची एकूण राजकीय परिस्थिती पाहाता, फोल ठरण्याचीच शक्यता जास्त आहे.

निरनिराळ्या लफड्या-कुलंगड्यांचं रकानेच्या रकाने भरून वर्णन करणाऱ्या 'गॉसिप' लिखाणाचं सध्या पेव फुटलेलं आहे; परंतु सर्व समाजाचेच हितसंबंध ज्यात गुंतलेले आहेत अशा वैद्यक व्यवसायावरही 'गॉसिपिंग'च्याच शैलीत लिमयांनी लिहिल्यामुळे पुस्तकातले अनेक चांगले विचारही लेखकाच्या या थिल्लरपणामुळे बऱ्याच वेळा विरून जातात. लिमयांना आलेले वैविध्यपूर्ण अनुभव व त्या अनुभवांवरील त्यांचं स्वतःचं चिंतन निश्चितच उद्बोधक आणि अनुकरणीय आहे. 'याच जीवनानुभवाच्या जोरावर 'आहारनिद्राभय-

मैथुनं च' या कोषातून बाहेर पडण्याचा मी प्रयत्न करीत आहे,' असंही लिमये म्हणतात; पण त्याच वेळी जमेल तिथे आपल्या लिखाणाला 'सेक्स'ची झालर लावून ती प्रकरणे सामान्य वाचकांसाठी 'सुरस आणि चमत्कारिक' करण्याचीही पराकाष्ठा ते करतात. अन्यथा, त्यांच्याकडे बायकोला मानसिक विकारावर इलाज करण्याकरता घेऊन येणाऱ्या एका माणसाने तिच्यासाठी किती आणि कशा प्रकारच्या बॉडचा कुठे खरीदल्या, याचा अभ्यास डॉक्टरसाहेबांनी कसा केला, हेही एक गूढच राहातं.

आत्मकथनामध्ये वैयक्तिक जीवनातील किती आणि कोणत्या गोष्टी लेखकाने लिहाव्यात, याची मर्यादा ज्या त्या लेखकाने स्वतः घालून घ्यायची असते. या पुस्तकात ही मर्यादा पाळलेली तर दिसत नाहीच, उलट काही विषय वाजवीपेक्षा अधिकच चर्चिले गेले आहेत. उदा० गर्भपात, ऑपरेशन, अॅनेस्थेशिया इत्यादी गोष्टींबाबत लिहिताना ह्यातील बराचसा भाग सामान्य वाचकांपुढे ठेवणे टाळता आले असते, इष्ट ठरले असते. लिमयांनी जे काही लिहिले आहे त्यातून सामान्य माणसाला ज्ञान होण्याऐवजी, अर्धवट ज्ञानातून निर्माण होणाऱ्या अनेक प्रकारच्या काळज्या आणि भीतीव्यतिरिक्त काहीही फायदा होणार नाही. गर्भपात करून घेणारी स्त्री—मग ती विवाहित असो किंवा अविवाहित—मानसिकदृष्ट्या किती खचते, हे लिमयांनी कधी पाहिलेलेच नसावे. तसंच गर्भपाताकडे एक सामाजिक समस्या या दृष्टिकोनातून न पाहता त्यामागील फक्त अर्थकारण या पुस्तकात रंगवले गेले आहे.

'व्हिजिटस्'बद्दल श्री. लिमये म्हणतात की, बहुतेक डॉक्टरमंडळी आपल्या व्हिजिटस् सर्व 'कारखाना' संपल्यावर आपल्या सोयीप्रमाणे व पेशंटच्या गैरसोयीच्या वेळी आटोपतात. धंद्याच्या टायमाला कोण जाईल? लिमयांना असे म्हणावयाचे आहे का की, दवाखान्याच्या वेळात आलेल्या पेशंटसूना तसंच ताटकळत डॉक्टरने व्हिजिटस्साठी हिंडत राहावे व दवाखान्यात आलेल्या पेशंटस्ची गैरसोय करावी? अर्थात अतिशय अत्यवस्थ रुग्णासाठी अथवा अपघाताच्या वेळी कोणीही सूज्ञ डॉक्टर हातातले काम सोडून धावत जाईल, यात शंका नाही. जे सर्वसंमत व रूढ ते सारेच चूक, अशी चळवळ्या लोकांची भूमिका असते. कारण त्यांची विचाराची पद्धतच निराळी असते. लिमयांनी व्हिजिटस्बद्दल केलेलं मतप्रदर्शन हे याचं उत्तम उदाहरण आहे.

विषबाधेवर लिहिताना लिमये म्हणतात की, रॉकेल आणि गॅमेक्सिन या विषबाधांवरील उपचारांची योग्य माहिती मला नव्हती. तरी देखील मला योग्य वाटली ती उपाययोजना मी रॉकेल प्यायलेल्या एका मुलावर केली; पण ती चुकीची होती, हे नंतर ध्यानात आले. रोज शोध लागणाऱ्या नवनवीन रासायनिक द्रव्यांच्या विषबाधेची माहिती सर्व डॉक्टर्सना अपेक्षित नाही; पण रॉकेलसारख्या द्रव्याच्या विषबाधेबद्दलही लिमयांना काही माहीत नसावे, ही कीव करण्यासारखी गोष्ट आहे. (त्यातच लिमयांनी आपले फॉरेन्सिक मेडिसिन व कापसाच्या ज्ञानाबद्दलची फुशारकी अन्य ठिकाणी मारलेली आहेच.) खरे म्हणजे ज्या विषाची आपल्याला माहिती नाही त्याचा रुग्ण सरकारी अथवा अन्य खाजगी रुग्णालयात पाठविणे योग्य झाले असते अथवा एखाद्या अनुभवी डॉक्टरचा फोनवरूनही सल्ला घेणे शक्य झाले असते; पण असे करण्यातील आर्थिक तोटा कुठला धंदेवाईक डॉक्टर सहन करील?

या व अशा अनेक घटनांचा व विधानांचा परामर्ष घेण्यासाठी दुसरा 'परीक्षण-ग्रंथ'च लिहावा लागेल; पण काही गोष्टींचा परामर्ष घेणे अनिवार्य आहे. लिमये म्हणतात की, व्यावसायिक गोष्टींबद्दल लिहिताना त्यांनी सत्य मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे; पण खरं पाहिलं तर बऱ्याच वेळा लिमयांनी सत्य न सांगता अर्धसत्यच सांगितलं आहे—कदाचित बऱ्याच वेळा त्यांना तेवढेच उमगलेले असावे. वैद्यकीय व्यवसाय सर्व बाजूंनी खचत असताना व्यावसायिक मूल्ये पायदळी न तुडवता, काही विशिष्ट तत्त्वाने हा व्यवसाय करणारी डॉक्टर मंडळीही पुष्कळ आहेत. पुण्यात कै. डॉ. कमलाबाई चितळे यांनी शाळेतल्या मुलांच्या वैद्यकीय तपासणीचे काम करीत असताना स्वतःचे ६०-७० हजार रुपये खर्च केले. त्यात त्यांचा कुठलाही स्वार्थ नव्हता किंवा डॉ. कॅप्टन नागो चाफेकर यांनी 'ज्ञानेश्वर तुकाराम मिशन' कोणत्याही पाश्चिमात्य मिशनऱ्याच्या चिकाटीने (त्यात धार्मिक प्रचाराचा भाग न आणता) पस्तीस वर्षं चालवलं. मुंबईत डॉ. मंडलिकांनी केलेलं सामाजिक, राजकीय व वैद्यकीय कार्य सर्वश्रुत आहे; पण त्यांच्या राजकीय कार्यात लिमयांचा गाजावाजा वा थिल्लरपणा नव्हता ही सर्व उदाहरणे जुन्या लोकांची आहेत. नवीन डॉक्टर मंडळीही याच प्रकारची कामं करत आहेत. त्यांचे हे कार्य बराच वेळ आणि सातत्याने झाल्यावर समाजाला त्यांच्याविषयीही कृतज्ञता वाटल्याशिवाय राहणार नाही.

'महापालिकेत निम्मे सभासद गाढव आहेत, असे म्हणण्याऐवजी निम्मे सभासद गाढव नाहीत,' या विधानाप्रमाणेच लिमयांनीही 'सर्वच डॉक्टर असे असतात असे नाही,' हे वाक्य सर्वत्र पेरले आहे व आपली कायद्याच्या कचाट्यातून सुटका करून घेतली आहे. या ठिकाणीही सत्य सांगण्याचा प्रयत्न करताना मरणालाही न भिणाऱ्या लिमये यांनी कायद्याला भ्यावे, हे मात्र दुर्दैव आहे.

डॉक्टरसाहेबांनी मेडिकल कॉलेजचे रेखाटलेले चित्रही अतिशय एकांगी आहे. त्यांनी स्वतःच असे म्हटले आहे की, कॉलेजजीवनात ते एका स्वप्नमय वातावरणात तरंगत होते. अभ्यासापेक्षा जिमखान्यावरच त्यांचा वेळ जास्त जात होता. अशा रंगेल आणि फुलपाखराचे जीवन जगणाऱ्या लिमयांना त्याच काळात अतिशय वेगळे जीवन जगणाऱ्यांची जाणीव होणे अशक्यच होते. एके काळी समाजातील फक्त उच्चभ्रू वर्गातल्या मुलांनाच मुंबईसारख्या ठिकाणी राहून वैद्यकीय शिक्षण घेणे शक्य होते; पण महाराष्ट्रात वैद्यकीय महाविद्यालयं जसजशी वाढू लागली, तसतसे अधिकाधिक मध्यम वर्गीय मेडिकल कॉलेजमध्ये येऊ लागले. आपले आई-वडील स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन आपल्यासाठी पैसे पाठवतात, या जाणीवेने मन लावून अभ्यास करणारे, आपल्याजवळ असणारी एकच एक शर्ट-पॅन्ट रात्री धुऊन दिवसा वापरणारे, रोज काही मधुमेहाच्या रुग्णांच्या घरी जाऊन त्यांना 'इन्सुलीन' देऊन त्यावर गुजराण करणारे, संध्याकाळी शिकवण्या व रात्री नाइट स्कूलमध्ये शिक्षकाचे काम करणारे मेडिकलचे विद्यार्थी,

लिमये बी. जे. मेडिकलमध्ये होते तेव्हाही तिथेच होते; पण लिमयांना ते कसे जाणवणार? घरची आर्थिक स्थिती उत्तम असल्याने मेडिकलला लागणारी बहुतेक सर्व पुस्तके लिमयांनी विकत घेतली व फक्त किन्सेचा 'स्त्री-पुरुष लैंगिक संबंधां'चा अहवाल पाहण्यासाठी ते लायब्ररीत गेले. अशा वेळी एकही पुस्तक घेण्याची ऐपत नसल्यामुळे कॉलेजच्या लायब्ररीतील पुस्तकांवर सारा अभ्यास करणारे विद्यार्थी लिमयांना कसे दिसणार?

'क्लोरोफॉर्म' वाचून वाचकांची अशी कल्पना होईल की, मेडिकलचे सारेच विद्यार्थी पोरी फिरवतात किंवा ते सर्रास होस्टेलवर बाया आणतात किंवा रात्रीचे पुण्यात दाणेआळीत व मुंबईत फरास रोडला हिंडतात. मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे हे अतिरेकी वर्णन म्हणजे लिमयांच्या विकृत मनोवृत्तीचं प्रतिबिंब आहे. माशी ही 'समाजवादी' असते. ती मिठाईवर आणि विष्ठेवर सारख्याच आवडीने बसते आणि रोग फैलावते; पण गिधाडे मात्र कुजक्या-नासक्या मांसाचाच फडशा पाडतात. काही चांगल्या गोष्टींचा शोध घेण्यापेक्षा समाजातील वाईट गोष्टीच 'हलो अप' करून त्यावर नाटक—सिनेमांचा धंदा करणाऱ्या कुशल लेखकांची एक जात मराठीत सध्या निर्माण झाली आहे. मेडिकल कॉलेजचे 'क्लोरोफॉर्म'मधील वर्णन याच थाटाचे झाले आहे. वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी व डॉक्टर हे समाजाचाच एक भाग असल्यामुळे समाजातल्या सर्व थरांचे प्रातिनिधिक प्रमाण त्यांच्यातही असणारच. त्याचप्रमाणे शिक्षणक्षेत्र, शेती, अभियांत्रिकी, व्यापार, इतर कुशल तंत्रज्ञान या साऱ्या क्षेत्रांतील माणसांवरही समाजाच्या जडण-घडणीची जबाबदारी आहेच; पण डॉक्टरने गरिबांना मोफत औषधोपचार करावेत, मदत करावी, खेड्यात जाऊन व्यवसाय करावा असं म्हणणारा समाज खेड्यातले रस्ते करण्यासाठी किंवा गरिबांना घर बांधून देण्यासाठी इंजिनिअर्सनी मोबदला घेऊ नये, असं म्हणताना मात्र कधीच ऐकलेलं नाही. डॉक्टर हा सामान्य माणसापेक्षा फार वेगळा मानून त्याच्याविषयी समाजाने फार अवास्तव अपेक्षा ठेवल्यामुळे त्याचा अपेक्षाभंगच अधिक होताना दिसतो. तसंच एकीकडे राजकीय क्षेत्रातील व सरकारी यंत्रणेतील भ्रष्टाचार आटोक्याबाहेर चालला आहे. वैद्यकीय क्षेत्रही यापासून अलिप्त राहू शकलेलं नाही. प्रवेशाच्या वेळी द्यावी लागणारी कॅपिटेशन-फी, जागा मिळवण्यासाठी द्यावी लागणारी जबरदस्त पागडी, इतर अनेक वाढते खर्च यासकट व्यवसायाला सुरुवात करणाऱ्या डॉक्टरकडून सर्वस्वाचा त्याग करून व्यवसाय करण्याची अपेक्षा ठेवली तर निराशा अटळच आहे.

उलट मला असं वाटतं की, आपल्यासाठी समाजाने फार मोठा पैसा खर्च केला आहे, तेव्हा आपला व्यवसाय आणि संसार सांभाळताना समाजातल्या आर्थिकदृष्ट्या पीडित समाजाचेही आपण काही देणे लागतो, अशी भावना जरी प्रत्येक डॉक्टरने ठेवली व आपणाकडे उपचारासाठी येणाऱ्यांच्या असहायतेचा गैरफायदा न उठवता उपचार केले तरी वैद्यकीय व्यवसायात 'समाजप्रबोधना'ला सुरुवात झाली, असं म्हणता येईल.

'क्लोरोफॉर्म'मध्येच लिमयांनी वारंवार म्हटले आहे की, 'लहानपणी सेवा दलामध्ये झालेले संस्कार आणि आमच्या घरातील राजकीय पार्श्वभूमी यामुळे मी घडलो!' हे जर खरं असेल तर मग अशा सुसंस्कृत माणसानेदेखील एखाद्या सामान्य डॉक्टराप्रमाणे वैद्यकीय व्यवसायाचा 'धंदा' कसा केला, हा प्रश्न मात्र पुस्तकभर भेडसावत राहातो आणि अनुत्तरितही!

—डॉ. मु. कृ. गोडबोले

क्लोरोफॉर्म
डॉ. अरुण लिमये
ग्रंथाली वाचक चळवळ
पृष्ठे १९९
मूल्य १८ रु.

---

## कॉंग्रेस : पृष्ठ ७ वरून

कॉंग्रेस मेळाव्यात या प्रश्नावर काय निर्णय घेतला जातो यावरच कॉंग्रेसची भावी वाटचाल कोणत्या दिशेने रहाणार, हे स्पष्ट होणार आहे.

जनता पक्षाला कॉंग्रेसच्या सहकार्याची कितपत आवश्यकता वाटते, या प्रश्नाचाही विचार करायला हवा. चरणसिंग गट फुटून निघण्याचा संभव दिसत होता त्या वेळी आपले सरकार टिकविण्यासाठी जरूर पडल्यास चव्हाण गटाचा पाठिंबा मिळविण्याच्या दृष्टीने चाचपणी झाली होती. आता ती निकड राहिलेली नाही. जनता पक्षातील फुटीचा धोका टळला, असा याचा अर्थ नाही. त्या पक्षात सध्या निराळाच पेचप्रसंग निर्माण होऊ पहात आहे. जनसंघाविरुद्ध बाकी घटक एकत्र येऊन जनसंघाला अलग पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत. जनसंघाविरोधी आघाडीमध्ये इंदिरा कॉंग्रेसचेही सहकार्य घ्यावे, असे काही गटांना वाटत आहे. पण इंदिरा कॉंग्रेसचे सहकार्य घेण्याचीही कल्पना पक्षाच्या बहुसंख्य सभासदांना मान्य होण्याची शक्यता नाही. भांडणे भांडायची पण तुटेपर्यंत ताणावयाचे नाही, अशा पद्धतीने जनता पक्षातील घटक पक्ष सध्या वागत असल्याचे दिसते. त्यातून पक्षाची एकजूट टिकेल; पण प्रभावी शिस्तबद्ध पक्ष निर्माण होणार नाही. तसेच सारख्या भांडणांमुळे सर्वसामान्य जनतेच्या मनातूनही जनता पक्ष उतरू लागेल. हे स्पष्ट दिसत असले तरी नेते त्यापासून धडा घेत असल्याचे दिसत नाही.

रंगभूमी

# काळोख देत हुंकार

## नव्या लाटेतलं आणखी एक अपत्य

यंदाच्या महाराष्ट्र नाट्यमहोत्सवात तृतीय पारितोषिक मिळालेलं सोलापूरच्या नाट्य-आराधना या संस्थेचं 'काळोख देत हुंकार' हे नाटक नुकतंच पुण्यात सादर केलं गेलं. त्यामुळे साहजिकच या नाटकाबद्दल बरीच उत्सुकता होती आणि अपेक्षाही!

पडदा वर जातो आणि रंगमंचावर दोन झोपडया व एक पाळणा दिसतो. जोडीला वातावरणनिर्मितीसाठी 'संपूर्ण रामायण' सिनेमातल्या अशोकवनात शोभाव्यात अशा झाडाच्या हवेत लोंबकळणाऱ्या फांद्या. या पार्श्वभूमीवर एका झोपडीतली स्त्री – शिरमी – काही तरी काम करत असलेली. मधूनच समोरच्याच झोपडीतल्या तानीशी खास शहरी ग्रामीण भाषेत बोलणं चालू. इतक्यात जुम्मनचाचा या महंमद पैगंबरचा जावईच शोभेल अशा मुस्लीम व्यक्तीचा शेर-शायरी आणि कुराणातले उतारे एकाआड एक म्हणत प्रवेश मग दोन 'अडाणी बायां'ना त्याचं ब्रह्मज्ञानावरील निरूपण. रात्र बरीच झालेली, तरी दोघींचे नवरे परत न आलेले. शिरमीच्या नवऱ्याला–नारबाला – खास झोपडपट्टीतली व्यसनं, तर तानीचा नवरा भुत्या म्हणजे 'मिळे हो झोपडीतही भगवान'चा अस्सल नमुना! ती सबंध झोपडपट्टीच अशा मानवजातीच्या निवडक वैशिष्टयांनी भरलेली; पण 'कंबख्त पेटके लिये कुछ ना कुछ करना पडता है.' या उक्तीचा बळी ठरून बहुतेकजण बांधकामावर मजूर. झोपडपट्टीच्या रिवाजानुसार शिरमी – नारबाला तीन मुलं झालेली; चवथ्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी स्थिती – (सबंध नाटकभर विंगेतून लक्षात येईल अशा तऱ्हेने हेलकावे दिले जाणारा पाळणा हे बहुधा याचंच प्रतीक असावं.) पण यांच्याच बरोबरचे, समोरच्याच झोपडीत राहणारे व चिडल्यानंतर एकमेकांना यथेच्छ बडवणारे तानी – भुत्या मात्र अपत्यहीन! अर्थात याला कारण भुत्याच – हा गौप्यस्फोट मात्र नंतर होतो–एकदा केव्हा तरी तानी भयंकर आजारी पडते. तेव्हा तिला औषध-पाणी करता यावं म्हणून पैशाची गरज भासते. एक पत्नीव्रती भुत्या मानेवर भूत बसल्यागत जो उठतो तो कुटुंबनियोजन केंद्रावर जाऊन स्वतःचं ऑपरेशनच करून येतो! अर्थात त्याच्या बदल्यात शंभर रुपये (आणि एक शर्टही?) मिळतो आणि तानीचा जीव वाचतो. जुम्मनचाचाच्याच अध्यक्षतेखाली हा 'कन्फेशन'चा विधी पार पडतो.

झोपडपट्टीत राहात असले तरी शिरमी – नारबाची संसाराची स्वप्नं भव्य, दिव्य, उदात्त – पोराला विंजिनियर, कान्ट्रॅक्टर, किमान मुकादम तरी करण्याची! पण अशी स्वप्नं साकार करायची म्हणजे पैसा हवाच. बरं, घरात तर पोराला दूध पाजायलासुद्धा पैसा नाही! मग पुलाच्या बांधकामावरच्या मुकादमाचे पाय धरले जातात. मुकादम साहेबाला खूष करायला शिरमीला रात्री बंगल्यावरच यायला सांगतो.

दुसऱ्या दिवशी शिरमीकडे जग – झोपडपट्टीतलं – पाठ फिरवतं. शिरमी दुःखी-कष्टी होते. मुकादम जास्तच सोकावतो. काही कारण नसताना जुम्मनचाचाही हिंदीमिश्रित मराठीत उर्दू वचनं बोलतच असतो.

पुलाचं बांधकाम दोनदा कोसळतं. तेव्हा तिसऱ्या वेळी एक पायाळू मूल बळी द्यायचं ठरतं. अर्थात असं मूल शिरमी-नारबाचंच! मुकादम तीन हजार रुपये द्यायला तयार होतो; पण शिरमी तयार नसते. दोघांच्या वादात ते पोर तापानं फणफणून मरूनही जातं. पोराकरता जुम्मनचाचाने उदार हस्ते दिलेली दुधाची बाटली शिरमी धक्का लावून पाडते. पडदाही पडतो.

हे नाटक काय सांगतं? तर संयोजकांच्या किंवा निर्मात्यांच्या म्हणू हवं तर, मते– 'जन्म' आणि 'मृत्यू' ही दोन टोकं म्हणून स्वीकारली तर आयुष्याच्या प्रवासात आणि प्रवाहावर भुकेपोटी आपण किती पूल बांधू जातो आणि ढासळणारे पूल सावरण्यासाठी कळत-नकळत किती गोष्टींचे बळी देतो व पर्यायाने भूक वाढवतो.

तरीही काही प्रश्न उरतातच–

अर्धवट जळलेल्या प्रेतासारखे–

अकाली मेलेल्या मुलांसारखे–

अनपेक्षित ढासळलेल्या पुलांसारखे–

आपण उद्याच्या सूर्याची स्वप्नं पाहात आजच्या काळोखात भरकटत राहायचं!

काळोख!!

अनामिक भीतीचा, नैराश्याचा, आशंकेचा, दुर्दैवाचा, यातनांचा–

या काळोखाच्या जबरदस्त हुंकारात आत्म्याचा ओंकार तर पुसला जाणार नाही?

या नाटकातून हे सांगायचं होतं; पण मग हे असं स्पष्ट सांगूनच भागलं नसतं का? त्याच्यासाठी एवढं 'नाटक' कशाला? पण आज काल झोपडपट्टी, दलित, तळागाळातील समाज यांच्या उत्थापनाचे जे कार्य समस्त मंडळींनी चालवलं आहे, त्याचाच आधार घेऊन स्पर्धेच्या दृष्टीने पन्नास टक्के सहानुभूती अगोदरच मिळविण्याच्या धूर्तपणाचा हा भाग नसेल ना, अशी शंका हे नाटक पाहिल्यावर येते.

श्री. वामन तावडे यांची 'द कन्स्ट्रक्शन' या नावाची एक अतिशय सुंदर, अंगावर काटा आणणारी एकांकिका आहे. माझ्या आठवणीप्रमाणे शाहू कॉलेजच्या कुंदन डांगी व वनमाला डांगीने ती पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत अत्यंत प्रभावीपणे सादर करून वादग्रस्त निर्णयात दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानलं होतं. याच एकांकिकेचं बीज घेऊन त्याला जमेल तितक्या बाजूंनी, न जमलं तरी ताणून, श्री. दिलीप परदेशी यांनी हे स्पर्धेसाठीचं दोन अंकी नाटक लिहिलं आहे, असं वाटतं. काही वाक्यं तर इतकी समांतर जातात की, 'द कन्स्ट्रक्शन'चाच भास व्हावा–अर्थात फक्त भासच!

दिग्दर्शनाच्या प्रांतात श्री. मुनीर धामलीक यांनी काही गुळगुळीत प्रतीके वापरून आपलं अस्तित्व दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. कलाकारांपैकी शिरमीची भूमिका करणारी वनमाला किणीकर, श्री गुरुराज अवधानीचा जुम्मनचाचा आणि डॉ. विलास सलगरकरांचा मुकादम उल्लेखनीय!

यंदाच्या महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेत या नाटकाने तिसरा क्रमांक मिळवला. प्रथम क्रमांक मिळविणारे रत्नाकर मतकरींचं 'लोककथा' ७८ हेही आदिवासी-दलितांवरील अत्याचारांचं अतिशय भेदक चित्रण करणारं नाटक. साहित्याच्या इतर क्षेत्रांमध्येही याच विषयाची लाट आज उसळलेली दिसते; पण या नव्या लाटेतलं, लाटेचा फायदा घेऊन तरंगणारं एक अपत्य, या पलीकडे 'काळोख देत हुंकार'चं विशेष महत्त्व जाणवत नाही.

–प्रतिनिधी

चित्रपट परीक्षण । सदानंद बोरसे

# मेरी बिवी की शादी

## नावापुरताच विनोदी

'वाजे पाऊल आपुले' हे विश्राम बेडेकर लिखित नाटक सदुसष्ट साली रंगभूमीवर आले. त्या नाटकाची मुद्रित प्रत त्याच साली ऑक्टोबर महिन्यात प्रसिद्ध झाली. या दोन्ही ठिकाणी विश्राम बेडेकरांनी प्रामाणिकपणे या नाटकाच्या मुळाचा— नॉर्मन बराश व कॅरॉल मूर लिखित 'सेंड मी नो फ्लॉवर्स' या नाटकाचा उल्लेख केलेला आहे.

हे नाटक अगदी जसेच्या तसे अगदी भगवंत आणि व्यंकट या पात्रांच्या नावांसकट उचलताना आणि उचलून त्याचे अवमूल्यन करण्याचा अक्षम्य गुन्हा करताना मात्र रजत रक्षित आणि मंगेश कुलकर्णी यांनी पटकथेचे श्रेय स्वतःच उपटले आहे.

आजारपणाचा सोस असलेला भगवंत भारतेंदू नावाचा एक प्राध्यापक. ('वाजे पाऊल 'मध्ये प्रा. भगवंतराव मुस्कुटे) आपल्या डॉक्टरचे दुसऱ्या रोग्याबद्दलचे बोलणे ऐकून तो आपल्या पत्नीचे आपल्यानंतर काय होईल, या काळजीत पडतो. मग तिची नीट व्यवस्था लावण्यासाठी त्याचे चालू झालेले प्रयत्न, त्यातून होणारे घोटाळे आणि शेवटी सगळे व्यवस्थित पार पडून होणारा सुखांत. अशी ही 'वाजे पाऊल 'चीच कथा कथेत पात्रांची व काही प्रसंगांची अनावश्यक भर टाकून उचलली आहे.

'मेरी बिवी 'चे दिग्दर्शक रजत रक्षित यांचा हा दुसरा चित्रपट. 'दामाद' या त्यांच्या पहिल्या चित्रपटामुळे त्यांच्याबद्दल मनात फारच आशा उत्पन्न झाल्या नसल्या, तरी पारच गयाबीता माणूस वाटला नव्हता; सुधारणेला भरपूर वाव होता आणि अनुभवातून सुधारणा होईल असेही वाटले होते. 'मेरी बिवी 'त त्यांनी हा वाव आणखी वाढवला आहे. आपल्या प्रत्येक चित्रपटाने त्यांनी हा वाव असाच वाढता ठेवला तर लवकरच सुधारणा अशक्यप्राय होऊन बसेल.

खरे म्हणजे चित्रपटाच्या माध्यमात नाटकाच्या माध्यमापेक्षा सर्वच दृष्टींनी भरपूर वाव होता; पण नाटकात एकाच ठिकाणी घडणाऱ्या घटना वेगवेगळ्या ठिकाणी घेण्याशिवाय रजित रक्षितांनी माध्यमातील बदल फारसा मनावर घेतलेला नाही. कल्पनादृश्ये हे रजत रक्षितचे एक वैशिष्ट्य. निदान 'दामाद'मधील काही चांगल्या कल्पनांमुळे तसे वाटले तरी होते; पण 'मेरी बिवी 'मधील कल्पनादृश्ये म्हणजे मात्र— अरे, विनोद नको पण कल्पनादृश्ये आवर, असा प्रकार. संपूर्ण चित्रपटात प्रेक्षकाच्या चेहऱ्याची इस्त्री फारशी बिघडत नाही, ती चित्रपटाच्या अतिशय पसरटपणामुळे आणि या पसरटपणाला मुख्यतः कारणीभूत आहेत ही कल्पनादृश्ये. अत्यंत अयोग्य जागी टाकलेली, अत्यंत अनावश्यक आणि अत्यंत ताणलेली ही कल्पनादृश्ये आधीच बाकी चित्रपटामुळे 'यावे की न यावे' असा विचार करीत असलेल्या 'हसू' नावाच्या गरीब बिचाऱ्या प्राण्याला पार लांब फेकून देतात. चित्रपटामुळे अधिक स्वातंत्र्य मिळूनही त्याचा उपयोग झाला नाही, त्याचे एक प्रमुख कारण हा पसरटपणा आणि ही अनावश्यक कल्पनादृश्ये. १. व्यंकटने आपली बायको माहेरी गेली असताना स्वतःच्या स्वयंपाकघरात केलेला गचाळपणा, म्हटलेले 'रामदुलारी मायके गयी' हे गाणे आणि त्यावेळचे कल्पनादृश्य. (यात व्यंकटची बायको व सासरा अशी अनावश्यक पात्रांची लगेच भर पडते.) २. भगवंताला आठवणारे तरुणपणीचे प्रसंग. ३. आपण मेल्यानंतर बायकोवर कोणत्या निरनिराळ्या आपत्ती कोसळतील याची भगवंताने रंगविलेली दृश्ये— विशेषतः एक— ज्यात प्रिया 'इन्हीं लोगोंने ले लीना,' 'My heart is beating' आणि एका इंग्रजी ट्यूनवर नाचते— तो प्रसंग. अशी कित्येक भिकार व नको ती कल्पनादृश्ये उदाहरणादाखल सांगता येतील. त्यांचे कर्तृत्व एकच— चित्रपटाच्या पंधरा रीळांच्या लांबीत त्यांचा वाटा सिंहाचा आहे.

कल्पनादृश्यांखालोखाल चित्रपट नकोसा करण्यात वाटा उचलला आहे गाण्यांनी. 'रामदुलारी मायके गयी' या एका गाण्याचा वर उल्लेख केला; पण बिचाऱ्या अशोक सराफ, प्रीती गांगुली व भगवान यांनी ते गाणे विनोदी म्हणजे चित्रपटाच्या अपेक्षित प्रकृतीस पूरक ठरेल असे करण्याचा तरी प्रयत्न केला आहे; पण अन्य दोन गाणी म्हणजे विनोद नामक जीवजंतू पटकन बाहेर काढणारी रेचकेच आहेत. त्यांपैकी एक गाणे रवींद्र जैन यांनी लिहिले आहे. म्हणजे त्यांच्या अन्य चित्रपटांतील गाण्यांपैकी एक तरी हमखास ज्या प्रकारचे असते, तसले— राधा, श्याम, मथुरा, गोकुळ आणि त्यांचे वरच्या म्हणजे अध्यात्मिक वगैरे पातळीवर चाललेले प्रेम वगैरे—'शाम की बाहों में राधिका खेले.' आणि दुसरे म्हणजे बागडू हीरो व हिरॉईनने बाग, समुद्रकिनारा इत्यादी हमखास गाणे होणाऱ्या ठिकाणी झालेले गाणे—'मुझसे शाम सुहानी कहती है प्रेमकहानी.' चित्रपटातील विनोदाला असे दोन गाण्यांचे दोन बलदंड खांदे मिळाले आहेत.

याशिवाय इतर चित्रपटांतून पाहिलेला तोचतोचपणा (उद. आधी रडणारा नायक दाखवून मग तो कांदे कापतो आहे, असे दाखविणे, आज-काल तर चित्रपटातच नव्हे तर प्रत्यक्षातही रडणारा प्रत्येक माणूस पाहिला की तो रडताना त्या जोडीने कांदेही कापत असावा, असे मला वाटू लागते.) किंवा 'मेरी बिवी 'मध्येच आलेला तोचतोचपणा (उदा.—अमोल पालेकरच्या चित्रपटातील असंख्य लकबी) हे प्रकारही चेहऱ्याची घडी अधिक पक्की व इस्त्री अधिक कडक करणारे आहेत.

चित्रपटातील अभिनेत्यांबद्दल तर लिहिणेच नको. अशोक सराफ यांनी रंगवलेला व्यंकट हा दारुडा वकील फक्त झकास. त्यांच्या हिंदीवर अजूनही मराठी पगडी आहेच; पण एकूण त्यांचे काम फारच झकास. वनमाली या पात्राचे काम केलेल्या अभिनेत्याचा एक उल्लेख करावासा वाटतो; कारण त्याच्या एका विनोदाला थोडेसे हसल्याचे मला अंधुक आठवते. ('पाकीज़ा' चित्रपटातील गाण्यांबद्दल विचारल्यावर ही व्यक्ती 'इन्हीं लोगोंने ले लीनाऽऽदुपऽऽट्टा मेऽऽऽराऽऽऽऽ' असे तुलसीदासाच्या दोह्याच्या चालीवर म्हणून दाखवते) बाकी—भगवानला बिचाऱ्याला 'अलबेला 'च्या पुण्याईवर लोक अजून नाचायला लावतात. अमोल पालेकरचे काम काही थोडे प्रसंग वगळता त्याच त्या लकबी आणि मुख्य म्हणजे तेच ते अडखळत बोलणे यामुळे भयंकर रटाळ, कंटाळवाणे. आता लिहिण्यासारखा राहिलेला एकमेव माणूस म्हणजे 'introducing' दिलीप

कुलकर्णी. त्यांनी अचिन शर्माचे काम केले आहे. मूळ अच्युत कर्वे (म्हणजे चित्रपटातील अचिन शर्मा) हा कसा आहे? तर अत्यंत उमदा, उत्साही, extrovert, बेपर्वा आणि रंगेल असामी, picnic personality, एका शब्दात–अचाट. तर चित्रपटातील अचिन शर्मा कसा आहे–फक्त कपड्यांपुरताच रंगेल. बाकी सतत एक त्रासिक भाव चेहऱ्यावर ठेवणारे दिलीप कुलकर्णी अचाट न वाटता भरल्या संसाराचा गाडा उपाशीपोटी ओढणारे पुचाट कारकून वाटतात. त्यांचेही बोलणे 'मरांदी' वा 'हिंठी' आहेच. शिवाय उत्साहीपणा दाखविण्यासाठी त्यांनी शोधून काढलेले हसणे, घोड्याचे खिकाळणे, बैलाचे हंबरणे व तरसाचे हास्य (हे मी चित्रपट पाहीपर्यंत ऐकले नव्हते.) यांच्या मिश्रणावर ताण करणारे आहे. शिवाय आपला हा शोध प्रेक्षकापर्यंत नीट पोहोचविण्यासाठी ते वाक्यानंतर वेगळे हसतात. उदाहरणार्थ–'तू खिलाएँगी तो मैं पत्थर भी खाऊँगा.' दोन–तीन क्षण शांतता आणि मग 'हहावखा खॅखॅहा हा:!'

चित्रपटातील मराठी अभिनेत्यांच्या बोलण्याबरोबरच आणखी एक मराठमोळी बनलेली हिंदी गोष्ट म्हणजे संवाद. संवादलेखनात रजत रक्षितांबरोबर मंगेश कुलकर्णीही सहभागी असल्याने त्यांनी संवादांमध्ये 'माझा मऱ्हाठाचि बोल कौतुके, राष्ट्रभाषासही पैजा जिंके' अशी होड लावली आहे. मराठीत जवळच्या मित्राला वा माणसाला एकवचनी म्हणजे 'तू' संबोधत असले तरी हिंदीत 'तू'चा वापर अनादर दाखविण्यासाठी मुख्यत: होतो. जवळीक असली तरी, 'तुम'चाच वापर केला जातो. (हिंदी गाणी याला अपवाद.) 'मेरी बिवी'तील बहुतेक संवाद मात्र थेट मराठीच्या वळणावर 'अरे-तुरे'त चालतात. बाकी ठिकाणीही असाच प्रकार. म्हणजे 'तुम गुनाह कुबूल कर लो'च्या ऐवजी 'तू गुन्हा कबूल कर ले' आणि अशोक सराफ म्हणतातही अगदी 'तू गुन्हा'च्या चालीवर.

छायाचित्रणाच्या बाबतीतही नंतरच्या फिल्टरिंगमध्ये पाहता पाहता निळे पाय पिवळे बनविणे असे चमत्कार आहेत.

एकूणच 'मेरी बिवी की शादी' या नावापलीकडे या चित्रपटाच्या क्षेत्रात विनोद फिरकतच नाही.


☐




"कठीण आणि खरखरीत टूथ पावडरी तुमच्या हिरड्या नि दातांना इजा करू शकतात..."

**कोलगेट टूथ पावडरने तुमच्या दातांचे नि हिरड्यांचे संरक्षण करा — नि श्वास दुर्गंधीही थांबवा!**






कोलगेट टूथ पावडर अत्यंत बारीक आणि पांढरीशुभ्र असते. तुमच्या हिरड्यांचे हळुवारपणे मालिश करीत असतानाच, तिच्यातील सौम्य तकाकीदायक द्रव्याने तुमच्या दातांवरील कीटण दूर होऊन, दात अधिक स्वच्छ व शुभ्र बनतात. कोलगेट टूथ पावडरचा विपुल फेस दातांच्या फटींत आरपार शिरतो आणि त्यामुळे दुर्गंध दूर होऊन दंतक्षय करणाऱ्या किडींचा नायनाट होतो.

**कोलगेट टूथ पावडरने तुमच्या कुटुंबियांना आधुनिक दंत संरक्षण द्या. त्यांना तिचा पेपरमिंटचा थंडगार स्वाद खचितच आवडेल.**

TP.G.30 MR

# इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, पुणे

'प्रशांत' ४९/ए/२३, एरंडवणा, पुणे ४०० ००४.

संस्थेत खालील जागा ताबडतोब भरावयाच्या आहेत. त्यासाठी १० एप्रिल १९७९ पूर्वी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**( १ ) सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा प्रकल्प**

**संशोधन अधिकारी : पाच जागा :** उमेदवार कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर असणे आवश्यक. पदव्युत्तर शिक्षणास अधिक पसंती. ग्रामीण क्षेत्रातील सामाजिक कार्याचा अनुभव आवश्यक. सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाचा अथवा प्रशिक्षणाचा अनुभव असणाऱ्यांना तसेच प्राथमिक अथवा माध्यमिक शाळातून अध्यापनाचा अनुभव असणाऱ्यांना अधिक पसंती. पगार दरमहा रु. ७५० (एकत्रित) विशेष पात्रता असणाऱ्यांना अधिक पगाराची शक्यता आहे. या सर्व जागा तात्पुरत्या स्वरूपाच्या आहेत. परंतु त्या पाच वर्षे चालू राहण्याची शक्यता आहे. निवडलेल्या उमेदवारांना पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये काम करावे लागेल.

**( २ ) राज्य साधन केंद्र**

**साहित्य निर्मितीसाठी विशेष तज्ञ : एक जागा :** उमेदवार मराठी विषयातील एम्. ए. आणि भाषाशास्त्र पदविकाधारक असण आवश्यक. ज्यांना मुले किंवा प्रौढ यांचेसाठी असलेल्या साहित्यनिर्मितीचा (लेखक, संकलक इ.) अनुभव आहे अशांना अधिक पसंती. पगार दरमहा रु. १००० (एकत्रित) विशेष पात्रता असणाऱ्यांना अधिक पगाराची शक्यता. ही जागा तात्पुरती आहे. परंतु पाच वर्षे चालू राहण्याची शक्यता आहे.

**संशोधन सहाय्यक : चार जागा :** कोणत्याही विद्याशाखेतील पदव्युत्तर शिक्षण आवश्यक. अध्यापन अथवा संशोधन कार्यातील अनुभवास अधिक पसंती. पगार दरमहा रु. ५०० (एकत्रित) सर्व जागा तात्पुरत्या, परंतु त्या पाच वर्षे चालू राहण्याची शक्यता आहे.

उमेदवारांनी नाव, पत्ता, वय, शिक्षण, पूर्वानुभव इत्यादी तपशीलासह १० एप्रिल १९७९ पूर्वी अर्ज करावेत. **पाकिटावर ज्या जागेसाठी अर्ज केला आहे त्या जागेचा स्पष्ट उल्लेख करावा.**

संचालक